# १

## संघराज्य प्रणालीचे बदलते स्वरूप

**प्रकरणाची रचना**

**१.० उद्दिष्टे**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ भारतीय संघराज्याची वैशिष्टये**

**१.३ भारत - एकात्म शासन पद्धती**

**१.४ केंद्र - राज्य संबंध**

**१.५ केंद्र - राज्य संबंध : केंद्र शासनाचा विशेषाधिकार**

**१.६ घटक राज्यांची स्वायत्तता**

**१.७ सरावासाठी प्रश्न**

**१.८ संदर्भ सूची**

---

## १.१ भारतीय संघराज्य

---

### उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासामुळे आपल्याला केंद्र-राज्य संबंधातील विविध पैलूंची माहिती होईल.

- शासनसंस्थांचे स्वरुप
- भारतीय संघराज्याचे स्वरुप
- राज्यघटनेतील केंद्र-राज्य यांच्यातील अधिकारांची विभागणी स्पश्ट होईल.
- आणिबाणीच्या काळातील केंद्र सरकारचे अधिकार
- राज्यांच्या स्वायत्ततेचा प्रश्न
- केंद्र - राज्य संबंधातील बदलते प्रवाह

### प्रस्तावना

साधारणपणे राजकीय व्यवस्थेचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे संघराज्य आणि दुसरा एकात्म शासन व्यवस्था होय. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत कॅनडा ही संघराज्याची तर इंग्लंड हे एकात्म शासन पद्धतीचे उदाहरण आहे. एकात्म शासन पद्धतीमध्ये राज्यघटनेने सर्व सत्ता एकाच मध्यवर्ती सरकारकडे (केंद्र सरकार) सोपविलेली असते. केंद्रसरकार त्याच्या इच्छेनुसार प्रादेशिक सत्तेचे अधिकार कमी-जास्त करु



munotes.in

शकते. याउलट संघराज्य व्यवस्थेत दुहेरी शासनव्यवस्था असते. एक म्हणजे केंद्र सरकार आणि त्याशिवाय घटक राज्यांची वेगळी शासनसंस्था असते. या दोन्ही शासनांमध्ये अधिकार विभागणी केलेली असते. संघराज्य व्यवस्थेत केंद्र आणि राज्य सरकारांचा दर्जा समान असतो. कोणतेही शासन दुसऱ्यापेक्षा श्रेश्ठ नसते तर दोन शासनांमध्ये अधिकार विभागणी करणारी राज्यघटना सर्वश्रेश्ठ असते. राज्याचा भौगोलिक आकार मोठा असेल आणि विविधता (उदा. जात, धर्म, वंश, संस्कृती, प्रदेश इ.) असेल तर संघराज्य व्यवस्था उपयुक्त ठरते. एखादी राज्यव्यवस्था संघराज्यात्मक आहे किंवा नाही हे खालील निकशांवरुन ठरवता येते.

१) केंद्र व राज्य अशी दुहेरी शासनव्यवस्था असणे.

२) केंद्र व राज्य यांच्यात अधिकारांची सुस्पश्ट अशी विभागणी असणे.

३) केंद्र व राज्य यांच्यातील अधिकार विभागणीची स्पश्ट नोंद असणारी लिखित राज्यघटना असणे.

४) केंद्र व राज्य यांच्यात तसेच राज्य विरुद्ध राज्य यांच्यात संघर्श निर्माण झाल्यास तो निवारण करणारी तटस्थ, निपक्ष न्याययंत्रणा असणे.

वरील निकश ज्या राज्यव्यवस्थेमध्ये दिसतात ती राज्यव्यवस्था संघराज्यात्मक व्यवस्था असते. संघराज्यात्मक व्यवस्थेचे दोन प्रकार आहेत.

१ केंद्रोत्सारी संघराज्य

२ केंद्राकर्शी संघराज्य

ज्या संघराज्य व्यवस्थेत केंद्राकडून राज्यनिर्मितीची प्रक्रिया घडते ती केंद्रोत्सारी संघराज्य व्यवस्था होय. शिवाय ज्या व्यवस्थेत अनेक राज्ये एकत्र येऊन मध्यवर्ती केंद्र सत्तेची निर्मिती करतात त्या व्यवस्थेला केंद्राकर्शी संघराज्य व्यवस्था म्हणता येईल. भारतात फाळणीजन्य परिस्थितीमुळे केंद्रोत्सारी पद्धतीचे संघराज्य निर्माण झाले आहे.

## १.१ भारतीय संघराज्य व्यवस्था

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संघराज्यीय पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संघराज्य रचनेचे सर्वात ठळकपणे नजरेत भरणारे वैशिष्टय म्हणजे केंद्र शासनाचे प्राबल्य होय. भारतीय संघराज्याची रचना १९३५ च्या कायद्यावर आधारीत आहे. मात्र स्वातंत्र्योत्तर काळातील एकात्मतेला तडा देणा-या घटनांमुळे भारतीय संघराज्य वैशिष्टयपूर्ण ठरले आहे. भारतीय संघराज्याची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

### भारतीय संघराज्याची वैशिष्टये

#### राज्यांचा संघ :

भारताची शासनपद्धती संघराज्यात्मक असली तरी "भारत हे संघराज्य आहे" असा शब्दप्रयोग राज्यघटनेत आढळत नाही. उलट "भारत हा राज्यांचा संघ असेल" अशी तरतूद करण्यात आली आहे. कारण संघराज्यीय रचनेत राज्यांना फुटून निघण्याचा अधिकार असतो. भारतात अशा प्रकारचा अधिकार राज्यांना नाही. थोडक्यात म्हणजे भारताचे संघराज्य केंद्रोत्सारी पद्धतीचे असून राष्ट्रांची एकता व सामर्थ्य यांना महत्व देणारे आहे.

**सत्तेचे केंद्रीकरण :**

भारताचे शासन संघराज्यात्मक असले तरी घटक राज्यांची स्वायत्तता मर्यादित आहे. घटक राज्यांच्या अधिकारांच्या तुलनेत केंद्रीय सरकारला अधिक प्रमाणात अधिकार आहेत. राज्याची रचना केंद्रीकरणाची नसली तरी प्रवृत्ती केंद्रीकरणाची आहे. आणिबाणीत तर संघराज्याचे रूपांतर एकात्म राज्यांत होते.

**अधिकार विभागणी :**

भारतात केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकार यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आली आहे. घटनेत त्यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यानुसार काही विषय केंद्राकडे (केंद्रसूची), काही विषय राज्यांकडे (राज्यसूची) व काही विषय दोहोंकडे (मध्यवर्ती सूची) सोपविण्यात आले आहेत. या अधिकार विभागणीत केंद्र सरकारला झुकते माप मिळाले आहे.

**लिखीत व ताठर राज्यघटना :**

भारतात केंद्र व घटकराज्य सरकार यांच्यात अधिकार विभागणी करण्यात आली असून राज्यघटनेने प्रत्येक सरकारचे अधिकार व क्षेत्र ठरवून दिले आहे. कोणत्याही सरकारला आपले अधिकार एकतर्फी वापरता येवू नयेत किंवा दुस-यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करता येवू नये म्हणून लिखीत व ताठर राज्यघटना निर्माण करण्यात आली आहे.

**स्वतंत्र न्यायमंडळ :**

केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार किंवा दोन घटक राज्य सरकारांमध्ये अधिकार विषयक वाद निर्माण झाला तर न्यायनिवाडयासाठी स्वतंत्र न्यायमंडळाची तरतूद घटनेने केली आहे. आत्तापर्यंत ब-याच वेळा न्यायालयाने ही भूमिका यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

**एकच राज्यघटना :**

अमेरिकेत संघराज्याची राज्यघटना व राज्य सरकारांची राज्यघटना वेगवेगळ्या आहेत. याउलट भारतात संपूर्ण देशाची व घटक राज्यांच्या वेगवेगळ्या राज्यघटना नाहीत. संपूर्ण देशासाठी विस्ताराने लिहिलेली एकच राज्यघटना असून केंद्र व राज्य सरकारचे स्वरूप अधिकार व कार्ये स्पष्ट केली आहेत.

**दुहेरी नागरिकत्व नाही :**

अमेरिकेच्या संघराज्यात प्रत्येक नागरिकाला दुहेरी नागरिकत्व देण्यात आले आहे. प्रत्येक व्यक्ती पहिल्यांदा घटक राज्याची नागरिक असते. भारताचे नागरिकत्व एकेरी स्वरूपाचे आहे. प्रत्येक व्यक्ती संपूर्ण देशाची नागरिक असते. भारतात घटकराज्यांच्या नागरित्वाची निराळी कल्पना नाही.

**आणिबाणीत एकात्म राज्य :**

भारतीय संघराज्याची कल्पना लवचिक स्वरूपाची आहे. शांततेच्या काळात भारत हे संघराज्य असते. तर आणिबाणीच्या काळांत मात्र ते एकात्म स्वरूपाचे असते. परकीय आक्रमण झाल्यास किंवा परकीय आक्रमणाची शक्यता निर्माण झाल्यास राष्ट्रपती आणिबाणी जाहीर करू शकतात. तसेच घटक राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोलमडल्यास राष्ट्रपती राजवटीची आणि आर्थिक आणिबाणीची तरतूद घटनेत अंतर्भूत आहे. आणिबाणीच्या परिस्थितीत केंद्र सरकारचे अधिकार मोठया प्रमाणात वाढतात. केंद्र सरकारच्या आज्ञा राज्य सरकारला मान्य कराव्या लागतात.

munotes.in

**प्रबळ केंद्र सरकार :**

केंद्र सरकारला राज्यांसाठी राखून ठेवलेल्या (राज्यसूची) विषयांत हस्तक्षेप करता येतो. त्या विषयासंबंधी कायदा करता येतो. घटक राज्याचा कार्यकारी अधिकारी असलेला राज्यपाल हा केंद्र सरकारचा दूत असतो. त्याच्यामार्फत राज्य सरकारचे नियंत्रण करता येणे शक्य असते.

**घटक राज्यांना समान प्रतिनिधीत्व नाही :**

अमेरिकेतील घटकराज्यांना सीनेटवर (वरीष्ठ सभागृह) समान प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. प्रत्येक घटकराज्याचे दोन प्रतिनिधी सीनेटवर निवडून पाठवले जातात. सीनेट प्रमाणेच राज्यसभा हे भारतीय संसदेचे वरीष्ठ सभागृह आहे. या सभागृहांत कोणत्या घटक राज्याचे किती प्रतिनिधी निवडून पाठवावेत हे राज्यघटनेने ठरवून दिलेले आहे. राज्यसभेवर घटक राज्यांना समान प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नाही. उदा. महाराष्ट्राचे १९ सभासद तर गुजरातचे सभासद राज्यसभेत पाठविले जातात.

**संसदेचे विशेष अधिकार :**

भारताच्या संसदेला नवीन घटकराज्यांची निर्मिती करण्याचा, अस्तित्वात असलेले घटकराज्य नष्ट करण्याचा, घटकराज्याचे क्षेत्र कमी-अधिक करण्याचा अधिकार आहे. म्हणजेच घटकराज्यांचे अस्तित्व संसदेच्या निर्णयावर अवलंबून आहे. अर्थात अशा प्रकारचा बदल करताना मात्र घटनादुरूस्ती करणे आवश्यक असते.

भारताच्या संघराज्याची वरील वैशिष्टये अभ्यासल्यावर एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे भारतीय संघराज्य अमेरिकेच्या संघराज्याहून निराळे आहे. त्यामुळे भारताच्या संघराज्याला संघराज्य म्हणणे कितपत योग्य आहे असा प्रश्न उपस्थित केला जातो. थोडक्यात भारतीय संघराज्य हे केंद्रोत्सारी आहे असे म्हणावे लागते.

**'भारतात एकात्म शासनसंस्था आहे" :**

जगातील कोणत्याही संघराज्यात्मक देशात विकेंद्रीकरणाची प्रवृत्ती आढळते. संघराज्य शासनपद्धतीत अशी सत्ताविभागणी आवश्यकही असते. परंतु भारतीय संघराज्यामध्ये रचनेकडे पाहिल्यास असे दिसते की भारतात केंद्रसत्ता प्रबळ आहे. केवळ आणिबाणीच्या परिस्थितीतच एकात्म शासन असते व इतर वेळी मात्र संघराज्यात्मक शासन असते हे म्हणणे पूर्णांशाने बरोबर नाही. भारतात केंद्र सरकारकडे सत्तेचे केंद्रीकरण झाले आहे या केंद्रीकरणाला अनेक घटनात्मक उपाययोजना तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक राजकीय प्रक्रिया कारणीभूत ठरल्या आहेत. त्यांचा पुढीलप्रमाणे वेध घेता येतो.

भारतीय घटनेने केलेली अधिकारांची विभागणी केंद्र शासनाला झुकते माप देणारी आहे. केंद्रसूचीत ९७ विषय, राज्यसूचीत ६६ तर समवर्तीसूचीत ४८ विषयांचा समावेश आहे. केंद्रसूचीवर केंद्र सरकारचे पूर्ण नियंत्रण आहे. शिवाय राज्यसभेच्या संमतीने केंद्र सरकार राज्यसूचीतील विषयांत हस्तक्षेप करू शकते. तसेच समवर्तीसूचीतील विषयांसंदर्भात केंद्र व राज्य सरकार यांच्यात मतभेद निर्माण झाल्यास केंद्राचाच कायदा प्रमाण मानला जातो. या तरतुदीने केंद्राचे पूर्ण प्राबल्य दिसून येते.

दोन या अधिक राज्यांनी जर असा ठराव केला की, एका विशिष्ट अधिकारासंबंधी संसदेने कायदा करावा. तर अशा वेळी संसद त्या विषयासंबंधी कायदे करू शकते. इतरही राज्य त्या कायद्याचा अंगिकार करू शकतात. मात्र अशा कायद्यात दुरूस्ती करणे संसदेच्याच अखत्यारीत असते.

आणिबाणीच्या काळात कोणत्याही अधिकार विषयासंबंधी कायदा करण्याची सत्ता संसदेला प्राप्त होते. आणिबाणी उठवल्यानंतर सहा महिने हे कायदे अस्तित्वात राहतात.

केंद्रसूची, राज्यसूची व समवर्तीसूची या तिन्ही सूचींमध्ये जे विषय अंतर्भूत केलेले नसतील ते सर्व उर्वरीत अधिकार किंवा शेषाधिकार घटनेने केंद्र शासनाला दिले आहेत.

आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास राज्यसूचीतील कोणत्याही विषयांवर संसदेला कायदा करता येतो.

राज्य सरकारने राज्यसूचीतील विषयासंबंधी केलेले काही कायदे राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्याचा अधिकार घटनेने राज्याच्या राज्यपालांस दिला आहे. राष्ट्रपती अशा कायद्यांना नकाराधिकार (Veto) वापरुन ते रद्द ठरवू शकतात. किंवा शिफारशीनिशी फेरविचारासाठी पाठवून देवू शकतात.

राज्याने आपली कार्यकारी सत्ता संसदीय कायद्यांचे पालन होईल अशा पद्धतीने वापरावी. अशा दृष्टीने केंद्र सरकार राज्य सरकारांना निर्देश देवू शकते.

केंद्रशासनाच्या कक्षेत येणा-या कोणत्याही बाबीचे प्रशासन करण्याची जबाबदारी राज्यशासनावर सोपविण्याचा अधिकार संविधानाने संघशासनाला दिला आहे.

परकीय आक्रमण किंवा बंडाळी यापासून राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी केंद्रसरकारची असते. राज्याची घटनात्मक यंत्रणा कोसळल्याच्या कारणावरून विशिष्ट राज्यांत राष्ट्रपती राजवट लावण्याचा अधिकार घटनेने केंद्र सरकारला दिला आहे.

आर्थिक अधिकारांच्या वाटणीतही केंद्र शासनाचेच पारडे जड आहे. राज्याची वित्तसाधने मर्यादित असल्यामुळे त्यांचा आर्थिक मदतीसाठी केंद्रशासनावर अवलंबून राहण्याशिवाय गत्यंतर नाही.

आर्थिक आणिबाणी पुकारून राज्याची आर्थिक स्वायत्तता पूर्णपणे नष्ट करणे, केंद्रशासनाला शक्य असते.

देशातील कायदा व सुव्यवस्थेची अंतिम जबाबदारी केंद्र सरकारची आहे. त्यामुळे राज्याच्या अधिकार क्षेत्रांत आवश्यक तो हस्तक्षेप करण्याचे प्रचंड अधिकार केंद्रशासनाला लाभले आहेत.

अशाप्रकारे घटनेने केंद्र शासनाला कमालीचे वर्चस्व दिले असून राज्यांना केंद्राविरूद्ध कोणतेच संरक्षण दिलेले नाही. कायदेविषयक आणि प्रशासकीय अशा दोन्ही बाबतीत केंद्रसरकार वरचढ आहे. राज्यांना आखून दिलेल्या अधिकारक्षेत्राला कात्री लावण्याच्या अनेक शक्यता घटनेतच अंतर्भूत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल पाहता त्या सर्व शक्यता (आर्थिक आणिबाणी वगळून) प्रत्यक्षात उतरल्या असून राज्यांची स्वायत्तता उत्तरोत्तर कमी झाली आहे.

उपयुक्त बाबींबरोबर प्रत्यक्ष व्यवहारांत केंद्र शासन वरचढ ठरण्यास आणखीही काही गोष्टी पूरक ठरल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

१. घटना अंमलात आल्यानंतर अनेक वर्षे केंद्र व राज्य या दोन्ही पातळीवर एकच राजकीय पक्ष (कॉंग्रेस पक्ष) सत्तारूढ होता. केंद्र पातळीच्या तुलनेत राज्यपातळीवरील नेतृत्व जसजसे कमकुवत होत गेले. तसतसा केंद्र पातळीवरचा वरचढपणा वाढत गेला.

२. सामाजिक व आर्थिक नियोजन हा विषय जरी केंद्रसूचीत असला तरी १९५० साली केंद्रशासनाने नियोजन आयोगाची नियुक्ती केल्यापासून आयोगाचे अधिकार व कार्ये वाढतच गेली. आयोगाचे प्रत्यक्ष वर्चस्व जरी राज्यांच्या कारभारावर निर्माण झाले नसले तरी सुद्धा निरनिराळ्या परंपरांमुळे त्याचे

महत्व वाढले आहे. नियोजन आयोगाच्या सूचनेनुसार १९५२ मध्ये राष्ट्रीय विकास परिषद स्थापन करण्यात आली. आणि नियोजन क्षेत्रातील सल्ला व पुनर्विलोकन याविषयीचे सर्वोच्च अधिकार तिला देण्यात आले. या परिषदेत प्रधानमंत्री, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, नियोजन आयोगाचे सदस्य आणि कॅबिनेट केंद्रीय मंत्री यांचा सामावेश असतो. प्रत्येक राज्यात राज्य नियोजन मंडळ स्थापन करून त्यामार्फत नियोजन आयोग राज्यांच्या नियोजन आयोगांवर नियंत्रण ठेवतो. विकास योजनांच्या या उपक्रमांतून सत्तेचे अमाप केंद्रीकरण व केंद्र सरकारचे वर्चस्व निर्माण झाले आहे.

३. केंद्र व राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाबाबत पंच म्हणून वित्त आयोग कार्यरत आहे. मात्र वित्त आयोगाच्या शिफारशीसुद्धा अनेक वेळा राज्यांवरती अन्याय करणा-याच असतात. अलिकडेच चंद्राबाबू नायडूंच्या नेतृत्वाखाली तेरा राज्यांची वित्त आयोगाच्या शिफारशीं संदर्भात जाहीरपणे बंडाचा पवित्रा घेतला आहे.

४. सामान्यत: संघराज्य रचना ताठर स्वरुपाची असते. परंतु भारतात मात्र घटनाकारांनी परिस्थितीनुसार रचना बदलण्याची तरतूद करून ठेवली आहे. त्यानुसार आणिबाणीच्या काळात इथे एकात्म शासनपद्धती अस्तित्वात येते. तसेच राज्यांची कार्यक्षेत्र बदलण्याचा नावे बदलण्याचा अधिकार केंद्र शासनाला आहे. घटनेतील या तरतूदींचा विचार केल्यास असे दिसते की, राज्य सरकारे म्हणजे भारतीय राज्यव्यवस्थेच्या उपव्यवस्थाच (Sub-system) आहेत. घटनेने आखून दिलेल्या मर्यादांमध्ये राज्यांना आपला कारभार करावा लागतो.

५. भारतात प्रशासकीय रचनेत केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोग अशा दोन पातळया आहेतच शिवाय देशाची व्यवस्था सुरळीत चालावी या हेतूने घटनाकारांनी एका अखिल भारतीय सेवेचीही तरतूद केली आहे. (I.A.S.) (I.P.S.) सारख्या अधिका-यांची भरती अखिल भारतीय पातळीवरुन केली जाते. हे अधिकारी केंद्र शासनाच्याच नियंत्रणाखाली असतात. केंद्राच्या संमतीशिवाय या अधिका-यांवर कारवाई करता येत नाही.

६. संघराज्याच्या संदर्भात राज्यपालाची घटनेने ठरवून दिलेली भूमिका अनेक वेळा आक्षेपार्ह वाटते. राज्यपाल हा घटक राज्याचा घटनात्मक प्रमुख असणे अपेक्षित आहे. पण प्रत्यक्षात मात्र तो केंद्र शासनाचा हस्तक असल्याचा अनुभव राज्यांना येतो. विशेषत: ज्या राज्यांत विरोधी पक्ष सत्तारूढ असतात. तेथे राज्यपालांची भूमिका संशयास्पद असते. केंद्रातील सत्ताधा-यांच्या इच्छेनुसार तो राज्य सरकार डळमळीत करू शकतो वा त्यांची अडवणूक करू शकतो.

वरील सर्व विवेचनांवरून असे लक्षात येते की, भारताचे संघराज्य संघराज्याच्या मूळ तत्वांपासून विचलित झाले आहे. भारतीय संघराज्यात केंद्रसत्ता अतिशय बलवान बनली आहे. के. पी. मुखर्जी यांना भारतीय संघराज्याचे वर्णन करताना ''भारतात एकात्म शासनसंस्था आहे'' असे म्हटले आहे. के. सी. व्हिअर यांच्या मते भारत हे संघराज्य नसून आभासात्मक संघराज्य आहे.

## १.२ घटक राज्यांची स्वायत्तता

भारताने १९५० साली संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार केला असला तरी भारतात केंद्रसत्ता प्रबळ असल्याने केंद्र राज्य संबंध सलोख्याचे, सहकार्याचे राहिलेले नाहीत. त्यांच्यात तणाव वा संघर्ष निर्माण झालेले दिसतात. केंद्र सरकारने वेळोवेळी राज्य सरकारच्या अधिकारांवर आक्रमण केलेले दिसते. पक्षहित, स्वार्थ

यामुळे केंद्र सरकारने राज्य सरकारांची स्वायत्तता धोक्यात आणली. १९६७ नंतरच्या निवडणुकीनंतर घटक राज्यांची स्वायत्तता जपली जावी. तसेच त्यांच्या अधिकारांत वाढ व्हावी यासाठी काही समित्या नेमल्या गेल्या. त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

**राजमन्नार समिती :**

१९६९ साली केंद्र राज्य संबंधातील तणाव, संघर्ष कमी करण्याच्या हेतूने तामिळनाडू शासनाने राजमन्नार समिती नियुक्त केली होती. या समितीने १९७१ साली आपला अहवाल सादर करून खालील शिफारशी केल्या.

१. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री किंवा त्यांच्या प्रतिनिधींचा सामावेश असलेले आंतरराज्यीय मंडळ नेमण्यात यावे.

२. घटक राज्यांवर परिणाम करणारे कोणतेही विधेयक आंतरराज्य मंडळाच्या सल्ल्याशिवाय संसदेत मांडले जावू नये.

३. राज्यमंत्री मंडळाशी चर्चा, विचार विनीमय करूनच राज्यपालाची नेमणूक करण्यात यावी. राज्यपाल पदावर नेमणूक करण्यात आलेल्या व्यक्तीची दुस-या कोणत्याही पदावर पुन्हा नेमणूक करू नये. तसेच निवृत्तीनंतर राज्यपालांची इतर कोणत्याही पदावर नियुक्ती करू नये.

४. घटक राज्यांच्या कारभाराबाबत राष्ट्रपतींची राज्यपालांना कायम स्वरूपाच्या सूचना देण्याची तरतूद असावी.

५. केंद्र शासनाने आणिबाणी विषयक अधिकार काढून घेण्यात यावेत. त्यासाठी घटनेतील ३६५ वे कलम रद्द करावे.

६. राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मंत्र्याने कारभार करावा ही घटनेतील कलम १६४ मधील तरतूद रद्द करण्यात यावी.

७. राज्यांच्या संमतीशिवाय केंद्र सरकारी सैन्य वा राखीव पोलीस राज्यांत पाठवू नयेत.

८. राज्यसभेवर घटक राज्यांना समान प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

९. केंद्रसूची व समवर्तीसूचीतील काही विषयांचा सामावेश राज्यसूचीत करावा.

१०. वित्त आयोग ही कायम यंत्रणा करण्यात यावी आणि घटक राज्यांनी केंद्रावर फारसे अवलंबून न राहता कार्य करता येईल अशा पद्धतीने उत्पन्नाच्या बाबी सुपूर्द कराव्यात.

११. घटक राज्यांच्या कक्षेत येणा-या सर्व विषयांसाठी घटक राज्यांची उच्च न्यायालये हीच अंतिम निर्णय देणारी न्यायालये असावीत. घटनेचा अर्थ लावण्याबाबतचे खटले मात्र सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविण्यात यावेत.

अशाप्रकारे विविध सूचना राजमन्नार समितीने केल्या असल्या तरी त्या सर्वच योग्य व उपयुक्त आहेत असे म्हणता येत नाही. कारण राज्यांची स्वायत्तता, सत्ता कशी वाढविता येईल हाच एकमेव हेतू या समितीच्या शिफारशींप्रमाणे असलेला दिसतो.

१९७७ साली प. बंगाल सरकारने नेमलेल्या प्रशासकीय सुधारणा समितीने सुद्धा वरील प्रकारच्याच शिफारशी केल्या. शिवाय केंद्रासाठी व राज्यांसाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग असावेत. अखिल भारतीय सेवा निर्माण

करण्याचा राज्यसभेचा हक्क राज्यांच्या स्वायत्ततेला बाधा आणतो. म्हणून तो अधिकार रद्द करावा. अशी वेगळी शिफारस या समितीने केली होती. राजमन्नवार समितीने केलेल्या शिफारशींवर प्रसिद्ध कायदेपंडीत नानी पालखीवाला यांनी टीकात्मक भाष्य करताना या शिफारशींबाबत शंका उपस्थित केली होती.

याशिवाय २३ ऑगस्ट १९७७ मध्य अमृतसर येथील अकाली दलाच्या बैठकीत जो सुप्रसिद्ध आनंदपूरसाहेब प्रस्ताव स्वीकारण्यात आला त्यामध्ये सुद्धा केंद्र शासनाचे अधिकार मर्यादीत असावेत असे सुचविण्यात आले होते. केंद्राकडे परराष्ट्र, संरक्षण, दळणवळण, चलनव्यवस्था एवढेच विषय असावेत व बाकीचे सर्व घटकराज्यांकडे सोपविले जावेत अशी सूचना केली आहे. या प्रस्तावाचा विचार करण्यासाठी शासनाने सरकारीया आयोग नेमला. १९८३ साली या आयोगाने आपला अहवाल सरकारकडे सुपूर्त केला. या अहवालात घटक राज्यांच्या स्वायत्ततेबाबत सखोल विचार व परीक्षण करण्यात आले आहे. काही चांगल्या शिफारशींबरोबरच राज्यांवर अन्याय करणा-या शिफारशीसुद्धा सुचविण्यात आल्या आहेत. राज्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याबरोबरच सरकारीया आयोगाने केंद्र सरकार प्रबळ होण्याच्या दृष्टीने अनेक शिफारशी केल्या आहेत. वास्तविक केंद्र व राज्य संबंधासारख्या महत्वाच्या प्रश्नावर एका व्यक्तीचा आयोग नेमणे कितपत योग्य होते असा आक्षेप या प्रकरणी घेतला जातो. तसेच आपल्याला गैरसोयीच्या वाटण्या-या शिफारशी संसदेतील बहुमताच्या जोरावर फेटाळण्याचा प्रयत्न केंद्र शासनाने केला आहे तरीसुद्धा सरकारीया आयोगाच्या शिफारशी अतिशय मौलिक आहेत हे नाकारता येत नाही.

अलिकडच्या काळात केंद्रात संमिश्र आघडयांची सरकारे सत्तारूढ होत आहेत. तर दुस-या बाजूला भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व वाढत आहे. अनेक घटक राज्यांत प्रादेशिक पक्ष सत्तेवर आहेत तर तुलनेने केंद्र सरकार कमकुवत बनले आहे. परिणामी घटक राज्यांच्या स्वायत्ततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येत आहे. अलिकडच्या काळात चंद्राबाबू नायडूंच्या नेतृत्वाखाली सुमारे १३ राज्यांच्या मुख्यमंत्र्याची वित्त आयोगाच्या अन्यायी शिफारशीं संदर्भात बंड पुकारण्याचा इशारा दिला होता. ही गोष्ट केंद्र राज्य संबंधाच्या संदर्भात दुर्लक्षून चालणार नाही. थोडक्यात संघराज्य प्रणालीच्या खऱ्याखुऱ्या वाटचालीकडे येथून पुढे सुरुवात होणार हे निश्चित.

## १.३ केंद्र व राज्य बदलते संबंध

केंद्र व राज्य यांच्यातील अधिकार विभागणीवरुन संघराज्याचे स्वरूप ठरत असते. भारतीय संघराज्यातही घटनेच्या अकराव्या भागात वैधानिक, १२ व्या भागात आर्थिक संबंधाची तरतूद केली आहे. ही अधिकारांची विभागणी करताना घटनाकारांनी सैद्धांतिक चौकटी डोळ्यासमोर न ठेवता आपल्या देशांतील परिस्थिती, अडचणी व समस्यांचे भान ठेवून स्वतंत्र पद्धती अवलंबली आहे. भारतात केंद्र सूची, राज्यसूची व समवर्ती सूची अशा तीन भागांत केंद्र व राज्य यांच्यातील संबंधावर अधिकार विभागणी करण्यात आली आहे. भारतातील केंद्र-राज्य संबंध पुढील प्रकारे अभ्यासता येतात.

**वैधानिक संबंध :**

संघसूची भारतीय संसदेला सबंध देशासाठी ज्या विषयासंबंधी कायदे करता येतात त्यांचा अंतर्भाव यात केला आहे. ते सहा गटात विभागता येतात.

१. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने सबंध संघराज्य हेच एक एकक असल्याने आंतरराष्ट्रीय संबंधाशी निगडीत असलेले सर्व अधिकार विषय घटनाकारांनी संसदेच्या (संघसूचीत) अखत्यारीत ठेवले आहेत. उदा. परराष्ट्र धोरण, तह व करार, नागरीकत्व, आयात-निर्यात, संयुक्त राष्ट्रांशी संबंधीत बाबी इ.

२. संरक्षण विषयक अधिकारही संघशासनाच्याच कक्षेत मोडतात. कारण संपूर्ण राष्ट्राच्या दृष्टीने त्यांचे महत्व असते. उदा. संरक्षण, लष्कर, हत्यारे, बंदुका, दारूगोळे, लष्करी साहित्याचे कारखाने, अणुशक्ती, खनिजे, गुप्तचर खाते इ.

३. तिसऱ्या गटांत आंतरराज्य दळणवळणाशी संबंधीत बाबींचा सामावेश करता येईल. उदा. रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, जलमार्ग, किनाऱ्यावरील वाहतूक, बंदरे, व्यापारी, नौकानयनांचे प्रशिक्षण, हवाई वाहतूक, विमानतळ, पोस्ट व तार खाते, टेलिफोन व बिनतारी यंत्रणा, दूरचित्रवाणी, आकाशवाणी व इतर संदेशवहन प्रकार इ.

४. संपूर्ण संघराज्याच्या हितसंबंधावर ज्याचा परिणाम होतो अशा आर्थिक बाबींसंबंधी कायदे करण्याचा अधिकार संघाला आहे. उदा. आंतरराज्य व्यापार विनिमय, भारतीय रिझर्व बॅंक, चलन, विमा, राष्ट्रीय कर्जे, परदेशी कर्जे, चेक्स, कॉपी राईट, ट्रेडमार्क, वजने व मापे, तेल विहिरी, पेट्रोल इ.

५. पाचव्या गटांत स्वरूपत:च संघसूचीत समाविष्ट झालेल्या अधिकार विषयांचा अंतर्भाव करता येईल. उदा. केंद्रीय लोकसेवा आयोग, संघसेवा, राष्ट्रपती व राज्यपालाचे भत्ते व सवलती, हिशेब तपासणी, उच्च व सर्वोच्च न्यायालय, निर्वाचन मंडळ इ.

६. सहावा प्रकार उर्वरीत वा शेषाधिकारांचा करता येईल. राज्यसूची वा समवर्ती सूचीत ज्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही असे सर्व विषय.

**राज्यसूची :**

राज्यसूचीतील बहुसंख्य विषय प्रादेशिक स्वरूपाचे व महत्वाचे आहेत. संघसूची व समवर्ती सूची या दोन्ही प्रदीर्घ व समावेशक असल्याने राज्यसूचीवर आपोआपच मर्यादा पडली. या सूचीन्वये राज्याला - सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस, कनिष्ठ न्यायालये, तुरूंग, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, विद्यापीठ, मादक पेये, धरणे, पाणीपुरवठा इ. बाबतीत कारभार पाहता येतो.

**समवर्ती सूची :**

संघ व राज्ये या दोहोंसाठी सामाईक असलेल्या या अधिकार सूचीत एम. व्ही. पायली यांनी ''संधीप्रकाश क्षेत्र'' म्हटले आहे. कारण उभयपातळीवरील निधीमंडळे त्यासंबंधी कायदे करू शकतात.

या सूचीचे तीन गटात वर्गीकरण करता येते.

१. पहिल्या गटात कायदा व सुव्यवस्थेशी निगडीत बाबी समाविष्ट करता येतील. उदा. फौजदारी कायदा व कार्यपद्धती, प्रतिबंधक स्थानबद्धता, लवाद व दिवाणी कामाची पद्धती, न्यायालयांची बेअदबी इ.

२. दुसऱ्या गटात व्यक्तीगत हक्कांविषयीच्या बाबी अंतर्भूत करता येतील. उदा. विवाह, घटस्फोट, अर्भके व अज्ञान मुले, मृत्यूपत्रे, मालमत्तेचे हस्तांतरण, खतपत्रे व दस्तऐवज यांची नोंद, दिवाळखोरी, विश्वस्त निधी इ.

३. तिसऱ्या गटात सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतील बाबींचा अंतर्भाव करता येईल. उदा. नियोजन, व्यापारी व औद्योगिक मक्तेदारी, कामगार संघटना, मजूर समस्या, सामाजिक सुरक्षितता, विमा रोजगार इ.

समवर्ती सूचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार उभय सरकारांना असला तरी जेव्हा त्या कायद्यात विसंगती निर्माण होईल तेव्हा संघाचाच कायदा प्रमाण मानला जातो. तेथे राज्यांना फारसा वाव नाही.

munotes.in

याशिवाय संविधानाने राज्यसूचीतील अन्य विषयांबाबतीत पुढीलप्रमाणे संघशासनाचे प्राबल्य प्रस्थापित केले आहे.

१. राष्ट्रीय हितासाठी राज्यसभेच्या निर्णयाने राज्यसूचीतील कोणत्याही विषयांवर केंद्राला कायदा करता येतो. (मुदत १ वर्ष)

२. आणिबाणीची उद्घोषणा जारी असताना राज्यसूचीतील कोणत्याही बाबींसंबंधी विधीविधान करण्याची शक्ती संसदेला ३५० व्या कलमाने दिली आहे.

३. वरीलपैकी कोणत्याही कारणास्तव संसदेने राज्यसूचीतील केलेल्या कायद्यांची राज्यांनी त्यासंबंधी केलेले कायदे विसंगत असतील तर संसदेचे कायदे अधिक प्रभावी ठरतील. अनुच्छेद २५१.

४. दोन वा अधिक घटकराज्यांच्या संमतीने राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर संघ त्या राज्यांसाठी कायदे करू शकतो.

५. आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करण्यासाठी गरज भासल्यास संसद राजसूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करू शकते. अनु. २५३.

६. राज्यसूचीतील अधिकार बाबींसंबधी राज्यविधीमंडळाने पारीत केलेली काही विधेयके राष्ट्रपती आपला अंतिम नकाराधिकार वापरून रद्द ठरवू शकतो.

संघराज्यातील सर्व तरतुदींचा संघ व राज्ये यांच्यातील वैधानिक संबंधांवर खूपच परिणाम झाला आहे. भारतीय संविधानाने जी वैधानिक अधिकारांची वाटणी संघ व राज्ये यांच्यात केली आहे ती बारकाईने तपासल्यास इथे अत्यंत सामर्थ्यशाली संघसत्ता निर्माण केलेली स्पष्टपणे आढळते. उघडपणे तर प्रचंड अधिकार तिला दिलेले आहेतच शिवाय प्रछत्र स्वरुपातही आपली इच्छा राज्यांवर लादण्याच्या संधी तिला संविधानकारांनी देवून ठेवल्या आहेत. राज्यसूचीतील अनेक बाबी अशा आहेत की ज्यातून शासनावरच्या फक्त जबाबदाऱ्याच वाढतात, अधिकार वाढत नाहीत आणि काही अशा आहेत की, ज्या राष्ट्रीयदृष्टया महत्वाच्या ठरवून संघशासन कोणत्याही क्षणी हिरावून घेवू शकते.

**प्रशासकीय संबंध :**

घटनेच्या अकराव्या भागातील दुसऱ्या प्रकरणांत केंद्र व राज्य यांच्यातील प्रशासकीय संबंध विशद केले आहेत.

भारतीय संविधानाने प्रशासकीय सत्तेच्या वाटणीबाबत पाच नियमांचा अवलंब केलेला आढळतो.

१. संघ शासनाची प्रशासकीय सत्ता त्याच्या विधीविषयक सत्तेशी समकक्ष असेल.

२. घटक राज्यांची विधीविषयक सत्ता यांच्या विधीविषयक सत्तेशी समकक्ष असेल. समवर्ती सूचीतील कोणत्याही विषयावर संसद कायदा करू शकते पण त्यांच्या अंमलबजावणीचा अधिकार मात्र घटक राज्यांकडेच असतो.

३. संघशासनाला आपली सत्ता राज्यसरकारला प्रदत्त करता येते.

४. संघशासन सुनिश्चितपणे संघीय कायदे अंमलात यावेत यादृष्टीने घटक राज्यांना प्रशासकीय संदर्भात मार्गदर्शन करू शकते.

५. संघशासन सर्वस्वी आपल्या अखत्यारीत असलेल्या बाबींशी संबंधीत असलेले कायदे अंमलात आणण्यासाठी राज्यशासनाला आदेश देवू शकते. संसदेचीही मान्यता संघशासनाला घ्यावी लागत नाही.

हे पाचही नियम केंद्राचे प्राबल्य निर्माण करतात. याशिवाय संघ व राज्यांतील प्रशासकीय संबंध निर्धारीत करणाऱ्या पुढील संविधानिक अनुच्छेदांचा या संदर्भात विचार केला जातो.

१. २५६ व्या कलमानुसार संसदेने वा राज्याने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी सुकर व्हावी म्हणून संघशासन राज्यांना मार्गदर्शन करू शकते.

२. २५७ व्या कलमांनुसार प्रत्येक राज्याची शासनशक्ती अशा प्रकारे वापरली जाईल की त्यायोगे संघसत्तेच्या शासनशक्तीच्या वापराला प्रत्यवाय वा बाधा येणार नाही. यादृष्टीने आवश्यक ते निर्देश संघसत्ता राज्यांना देवू शकेल. उदा. रेल्वेमार्गांची देखभाल.

३. २५६ व्या अनुच्छेदानुसार संघाच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही बाबींसंबंधीची कार्ये संघशासन राज्यशासनावर व त्यांच्या अधिकाऱ्यांवर सोपवू शकते. संघीय कायदा राबविण्यासाठी आवश्यक तो प्राधिकार व शक्ती राज्यशासनाला वा संबंधीत अधिकारी वा प्राधिकरण यांना प्रदान करता येतात. त्यासाठी लागणारा जादा खर्चही दिला जातो.

४. अनुच्छेद २६२ नुसार संसदेला कायद्याद्वारे कोणत्याही आंतरराज्यीय नदीच्या पाण्याचा वापर, वाटा किंवा त्यावरील नियंत्रण याबाबतच्या कोणत्याही तंटयाच्या वा तक्रारीच्या निवाडयाची तरतूद करता येईल. अशा तंटयाबाबत सर्वोच्च अथवा अन्य न्यायालच अधिकारीता वापरू शकणार नाही. अशी व्यवस्थाही संसदेस कायद्याद्वारे करता येईल.

५. २६७ व्या कलमानुसार राज्याराज्यांत उद्भवलेल्या तंटयाबाबत सल्ला देणे, शिफारशी करणे इ. कामांसाठी राष्ट्रपती आंतरराज्य परिषद नेमू शकतो. तिची रचना, स्वरूप, कामे तो आदेशाद्वारे ठरवू शकतो.

६. अनुच्छेद ३१२ नुसार राज्यसभा अखिल भारतीय सेना राष्ट्रहितार्थ आवश्यक वा समायोजित ठरवू शकते. या सेवांत केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत भरती करुन त्यांची नेमणूक राज्य शासनयंत्रणेत केली जाते. त्याचे वेतन व वर्ग संघशासन निश्चित करणे. मात्र ही देण्याचे कार्य राज्य करते. त्यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कारवाईच्या सल्ल्याने संघसरकारचे गृहमंत्रालयच करू शकते.

७. ३५५ व्या कलमानुसार परचक्र व अशांतता यापासून प्रत्येक राज्याचे संरक्षण करणे व प्रत्येक राज्याचे शासन संविधानानुसार चालवले जाईल याची खात्री करून घेणे संघ शासनाचे कर्तव्य असेल.

८. ३५६ व्या अनुच्छेदानुसार राष्ट्रपती राज्यांवर ''संविधानिक यंत्रणा कोसळली आहे'' अशा निमित्ताने आणिबाणी लादू शकतो. संघशासनाने पाठवलेल्या सूचना व मार्गदर्शन राज्यशासनाने पाळलेच पाहिजे. त्यात कुचराई करणाऱ्या विरूद्ध शिक्षेचा अधिकार राष्ट्रपतींस आहे.

या संविधानातील या सर्व उपबंधांचा स्पष्ट अर्थ असा की, प्रशासकीय बाबतीत संघाचा अधिकार राज्यांच्या तुलनेत प्रचंड मोठा आहे.

munotes.in

### आर्थिक संबंध :

संघ व राज्य या दोहोंना स्वतंत्र व स्वायत्त अर्थसाधने उपलब्ध नसतील तर संघराज्यातील इतर अधिकार विभागणीला काहीच अर्थ राहणार नाही. म्हणून संघराज्याच्या दृष्टीने या दोन पातळ्यांवरील आर्थिक संबंध लक्षात घेणे आवश्यक असते. संविधानात १२ व्या भागात या संबंधीचे विवेचन आहे.

१. काही कर लावणे व वसूल करणे राज्य शासनाच्या कक्षेत असते. उदा. जमीन महसूल, राज्यात बनलेली मादक पेये, स्थानिक मालावरील कर, वृत्तपत्र वगळता अन्य जाहिरातींवरील कर, वाहन कर, व्यवसाय कर, डोईपट्टी, चैनीच्या वस्तूंवरील कर इ.

२. काही कर संघशासन लावते व वसूल करते. उदा. शेतजमिनी वगळता अन्य संपत्तीच्या उत्तराधिकाराबाबतची शुल्के, रेल्वे, समुद्र वा हवाई मार्गे नेल्या जाणाऱ्या मालांवरील वा उतारूंवरील सोफा कर, रेल्वेप्रवासभाडी व वाहतूक यावरील कर.

३. काही कर संघशासन लावते व वसूल करते. मात्र त्यांचे संघ व राज्यात वितरण केले जाते. उदा. शेती उत्पन्नाहून अन्य उत्पन्नावरील कर.

४. काही शुल्के संघशासन लावते पण त्यांची वसूली व विनीयोजन राज्यशासन करते. उदा. औषधे व प्रसाधन साधनांवरील अबकारी शुल्क.

५. काही कर लावणे, वसूल करणे व विनीयोजन करणे संघाच्याच अधिकारांत असते. उदा. रेल्वे, टपाल व तार, दूरध्वनी, परकीय चलन, नाणी, आयकर, लॉटरी, रिझर्व बॅंक इ.

६. संघराज्य क्षेत्र व संघीय परीलाभ यांत टाकावयाच्या रकमा वगळून बाकीचे आयकराचे उत्पन्न संघ व राज्य यांच्यात, वेगवेगळ्या राज्यांत वाटण्याचा राष्ट्रपतीस अधिकार असून वित्त आयोगाच्या सल्ल्याने तो हा अधिकार वापरीत असतो.

७. आर्थिक संबंधाबाबत संघशासनाकडून राज्यास मिळणारा आर्थिक मदतीचा व अनुदानांचा निर्देश करावा लागेल. कारण अशा साह्याखेरीज राज्ये कारभार करूच शकत नाहीत.

८. संचित निधीच्या तारणावर संसदेच्या कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेत पैसे उधार घेण्याची शक्ती संघशासनास आहे राज्यशासनाने देशांतर्गतच पैसे उधार घेवू शकतात. आधीच्या कर्जाची परतफेड होण्यापूर्वी संघशासनाच्या परवानगीवाचून नवी कर्जे राज्यांना कर्ज दिले जावू शकते.

९. राज्याने आपले हिशोब कोणत्या प्रकारे ठेवावेत हे नियंत्रण व महालेखापाल ठरवून देतो.

१०. करांच्या उत्पन्नाची संघ व राज्ये यांच्यात वाटणी, अनुदानामागील तत्वे व राष्ट्रपतीने विचारलेल्या अन्य बाबी इ. संबंधी सल्ला देण्यासाठी वित्तआयोग असतो.

आर्थिक संबंधातही झुकते माप केंद्रालाच आहे. राज्यांची आयसाधने कमालीची मर्यादीत असल्याने त्यांना केंद्रावर अवलंबून रहावे लागते. वित्त आयोगामुळे तर भारताची संघराज्य रचनाच धोक्यात येवू शकते. संघसरकार विरोधी पक्षीय राज्यांना सापत्नभावाची वागणूक देवून आर्थिक आणिबाणी घोषीत करू शकतो.

### केद्र–राज्य संबंधाबाबत केद्र शासनाचा विशेषाधिकार

ज्या विषयांचा स्पष्ट उल्लेख केंद्रसूची, राज्यसूची व समवर्तीसूचीत करण्यात आलेला नाही अशा विषयांना शेषाधिकार म्हणतात. भारतात हा शेषाधिकार केंद्र शासनाने दिला आहे. घटना कर्त्यांनी अत्यंत सावधानतेने

व विचारपूर्वक विषयांची सूची केली असली तरी भविष्यकाळांत बदलत्या परिस्थितीत कोणकोणते नवे प्रश्न निर्माण होतात त्यासंबंधीचा अधिकार केंद्र सरकारला आहे. तशा प्रकारची तरतूद घटनेच्या २४८ व्या कलमात करण्यात आली आहे.

**राज्यसूचीतील विषयासंदर्भात कायदे करण्याचा संसदेचा अधिकार :**

राज्यसूचीतील विषयासंदर्भात कायदे करण्याचा अधिकार जरी राज्यविधीमंडळाला असला तरी काही विशेष परिस्थितीत भारतीय संसदेला राज्यसूचीतील विषयासंदर्भात कायदे करता येतात. घटनेच्या २४९ व्या कलमानुसार राज्यसभेच्या विशेष परवानगीने राष्ट्रीय हिताच्या संदर्भात महत्वाच्या विषयावर संसद कायदा करू शकते. आणिबाणीच्या काळातही संसदेला राज्यसूचीतील विषयासंदर्भात कायदा करता येतो. मात्र तो आणिबाणीनंतर सहा महिन्यांपर्यंतच लागू राहतो. घटनेच्या २३२ व्या कलमानुसार घटक राज्यांची विनंती केल्यास संसद संबंधीत राज्यांसाठी कायदे करू शकते. तसेच २५३ व्या कलमानुसार परराष्ट्रांशी करार, तह करताना संसद राज्यसूचीतील विषयांत हस्तक्षेप करू शकते. राज्यातील राष्ट्रपती राजवटीच्या काळात संसद राज्यासाठी कायदा करू शकते.

**घटक राज्यांच्या उत्पन्नाच्या बाबी :**

घटक राज्यांना जमीन महसूल, शेती उत्पन्नावरील कर, शेतजमिनीच्या मालमत्तेवरील वारसा कर, जमिनी व इमारतीवरील कर, विजेवरील कर, खाणकामासंबंधीचे कर, चैनीच्या वस्तूंवरील कर, रस्ते व अंतर्गत जलवाहतुकीवरील कर, करमणूक कर, जुगारावरील कर, पशूवरील कर इ. बाबींपासून उत्पन्न मिळते. तसेच केंद्र शासनाचे कर राज्य सरकार गोळा करते व नंतर त्यातील वाटा केंद्राकडून घेत असते.

**वित्त आयोगाची रचना व कार्ये**

भारतीय राज्यघटनेच्या २८० व्या कलमानुसार वित्त आयोगाची तरतूद करण्यात आली आहे. घटनेचा अंमल सुरू झाल्यानंतर दोन वर्षांच्या काळात आणि त्यानंतर दर पाच वर्षांनी किंवा राष्ट्रपतींस आवश्यक वाटेल तेव्हा राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमणूक करू शकतात. वित्त आयोगाच्या अध्यक्षाची व चार सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते. घटनेतील तत्वानुसार केंद्र व राज्य यांच्यातील उत्पन्नाची वाटणी ठरवणे, भारताच्या संचित निधीतून घटक राज्यांना द्यावयाच्या अनुदानाची तत्वे ठरविणे, राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राष्ट्रपतींना सल्ला देणे इ. कार्ये वित्त आयोगाला करावी लागतात.

## १.४ सरावासाठी प्रश्न

१. भारतीय संघराज्याची प्रमुख वैशिश्टये स्पष्ट करा.

२. ''भारतीय संघराज्य केंद्र प्रधान संघराज्य आहे'' - चर्चा करा.

३. भारतीय संघराज्यातील केंद्र - राज्य संबंध स्पष्ट करा.

४. भारतीय संघराज्याची घटनात्मक तरतूद व स्वरुप यांची चर्चा करा.

५. घटक राज्यांची स्वायत्तता - टिपण लिहा.

## १.५ संदर्भ सूची

१) भोळे भा.ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर

२) पाटील बी. बी., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३) जाधव तुकाराम आणि शिरापूरकर महेश, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध खंड १, युनिक ॲकॅदमी, पुणे, २०११

४) नवलगुंदकर शं. ना., भारतीय गणराज्याचे शासन, निराली प्रकाशन, पुणे

५) वराडकर र. घ., भारतीय शासन आणि राजकारण, निराली प्रकाशन, पुणे, २०१६

❖❖❖

munotes.in

# २

## पक्षीय राजकारण आणि निवडणुका

**प्रकरणाची रचना –**


२.१. राष्ट्रीय पक्ष

२.२. प्रादेशिक पक्ष

२.३. १९८९ नंतरच्या निवडणुकीतील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या कामगिरीचे विश्लेषण

२.४ सरावासाठी प्रश्न

२.५ संदर्भसूची


## २.१ राजकीय पक्ष

### प्रस्तावना

आजच्या काळातील लोकशाही राज्यव्यवस्थेत राजकीय पक्ष हे अभिन्न अंग बनले आहे. राजकीय पक्ष जनतेच्या इच्छा आकांक्षा व मागण्या सुसंघटित करण्याचे कार्य करतात. राजकीय पक्ष विशिष्ट विचार प्रणाली किंवा कार्यक्रम घेऊन लोकांपुढे जातात. लोकांना जी विचारप्रणाली किंवा कार्यक्रम आवडला त्या पक्षाला पाठिंबा देतात. राजकीय पक्षांच्या विविध उपक्रमात कोणत्या ना कोणत्या माध्यमातून लोक क्रियाशील होतात. म्हणून लोकांच्या राजकीय सहभागावर प्रभाव टाकणारा सर्वात मोठा महत्त्वाचा घटक राजकीय पक्ष असतो. राजकीय पक्षामुळे लोकांना राजकीय शिक्षण मिळते.

लोकशाहीत निवडणूक प्रक्रियेला खूप महत्त्व असते. निवडणुकीत उमेदवार उभे करून जनतेची मते आपल्या पक्षाच्या उमेदवाराला अधिकाधिक मिळवण्यासाठी राजकीय पक्ष प्रचार यंत्रणा उभारतात. जनतेचे प्रतिनिधी म्हणून आपले उमेदवार निवडून आणून शासनसत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. संसदीय शासन व्यवस्थेत तर सत्ताधारी पक्षाच्या प्रमाणेच विरोधी पक्षालाही महत्त्वाचे स्थान असते. विरोधी पक्ष सत्तारूढ पक्षाच्या राज्य कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करतो. राजकीय पक्षांचा सनदशीर मार्गावर विश्वास असतो. सत्ता प्राप्त करण्यासाठी निवडणुकीत सहभाग सत्ता प्राप्त केल्यानंतर राज्य राज्यकारभार सांभाळण्याचे कार्य तसेच विरोधी पक्ष म्हणून सत्तारूढ पक्षाला विरोध करण्याचे कार्य किंवा सत्तारूढ पक्षाला नियंत्रित करण्याचे कार्य तसेच आपल्या पक्षाच्या ध्येय धोरणाच्या प्रचार-प्रसाराचे कार्य इत्यादी सर्व कार्य राजकीय पक्ष संविधानिक मार्गाने करण्याचा प्रयत्न करीत असतात.

### राजकीय पक्ष: व्याख्या व अर्थ

राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी राजकीय पक्षाचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे स्पष्ट केला आहे. सोळाव्या शतकापर्यंत 'राजकीय पक्ष' हा शब्द वापरला जात नव्हता बोलींग ब्रोक यांनी अठराव्या शतकात राजकीय पक्ष संबंधी केलेले लिखाण हे राजकीय पक्ष संबंधीचे लिखाण होय. त्यानंतर आधुनिक काळात राजकीय पक्षाचा अभ्यास हा महत्त्वाचा अभ्यास विषय बनला. हयुम, एडमंड बर्क, रॉबर्ट मिकेल्स, मॉरिस दुवर्जर व वुमन यांनी यासंबंधी अभ्यासपूर्व लिखाण केले.

munotes.in

राजकीय पक्षासंबंधी काही विचारवंतांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे-

१) एडमंड बर्क यांच्या मते, "सर्वांना मान्य अशा विशिष्ट तत्त्वानुसार संघटित रित्या प्रयत्न करून राष्ट्रांचे हितसंबंध हितसंवर्धन करण्याच्या हेतूने एकत्र आलेल्या व्यक्तींची संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय."

२) गेटेल यांच्या मते, "अधिक व्यापक व सर्वसमावेशक स्वरूपात लोकमत तयार करून शासकीय पातळीवर ते प्रत्यक्षात आणण्याचे कार्य करणारा गट म्हणजे राजकीय पक्ष होय."

३) सारतोरी यांच्या मते, "राजकीय पक्ष म्हणजे जो निवडणुकीत उभा राहतो व सार्वजनिक पदासाठी निवडणुकीच्या माध्यमातून उमेदवार निवडून आणण्यास समर्थ असतो असा गट होय."

वरील व्याख्यान वरून आपल्याला असे म्हणता येईल की राजकीय पक्ष म्हणजे असा गट जो की सार्वजनिक हिताच्या पूर्तीसाठी सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करत असतो. या गटात एकत्र येणारे लोक विविध हितसंबंधाचे असू शकतात. मात्र सार्वजनिक क्षेत्राच्या बाबतीत त्यांचा समान दृष्टीकोन असतो. असे समान दृष्टी असलेले लोक एकत्र येतात आणि आपली समान ध्येयधोरणे अमलात आणण्याच्या दृष्टीने सत्ता ताब्यात घेण्यासाठी किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्यापेक्षा भिन्न मते धारण करणाऱ्या गटांशी स्पर्धा करतात. राजकीय पक्षाचा मुख्य उद्देश संविधानिक मार्गाने सत्ता प्राप्त करून आपली ध्येय-धोरणे शासनाची ध्येय-धोरणे म्हणून अमलात आणण्याचा प्रयत्न करतात.

## भारतीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये

भारतात ब्रिटिश राजवटीत ज्याप्रमाणे संसदीय शासन पद्धती व संघराज्य राज्य व्यवस्थेचा विकास होत गेला त्याप्रमाणे पक्ष पद्धतीला सुद्धा निश्चित आकार येत गेला. भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप पाश्चात्त्य व साम्यवादी पक्ष पद्धती होऊन वेगळे आहे. कारण भारतीय पक्ष पद्धतीला येथील समाजाच्या प्रदेश, भाषा, धर्म, जाती इत्यादी विभिन्नतेची पार्श्वभूमी आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान यामुळे विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात काँग्रेस पक्ष आपला प्रभाव टिकवून ठेवू शकला. विसाव्या शतकाच्या शेवटी काँग्रेस पक्षाला भारतीय जनता पक्षाकडून मोठे आव्हान उभे केले गेले. म्हणूनच काळाच्या ओघात भारतीय पक्षपद्धतीचे स्वरूप सातत्याने बदलत असलेले दिसते. कधी काँग्रेसचे एकमुखी वर्चस्व असलेली एक-प्रबळ-पक्ष-पद्धती तर कधी प्रादेशिक पक्षांचा प्रभाव असलेली पक्षपद्धती तर कधीही व्दिपक्षपद्धती कडे वाटचाल करत असलेली पक्षपद्धती असे संमिश्र स्वरूप भारतीय पक्ष पद्धतीचे राहिले आहे.

खालील वैशिष्ट्यांवरून भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप विशद करता येईल.

१) **बहुपक्षपद्धती :** भारतात बहुपक्षपद्धती निर्माण झाली असून निवडणूक आयोगाच्या नोंदीनुसार भारतात सात राष्ट्रीय पक्ष आहेत, ५८ प्रादेशिक पक्ष आहेत, आणि १७८६ नोंदणीकृत पक्ष आहेत. १९९६ नंतर केंद्रीय मंत्रिमंडळ ही आघाडी स्वरूपाची होती. १९९८ मध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (NDA) एकूण २४ राजकीय पक्ष सहभागी होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या स्वबळावर सरकार स्थापन करू शकेल एवढ्या जागा (२८२) निवडून आल्या. मात्र तरीही सरकार NDA चे बनले. सप्टेंबर २०१५ मध्ये NDA मध्ये ३५ घटक पक्ष सहभागी होते. यात तेरा प्रादेशिक पक्ष होते. दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी

आघाडी युपीए२००४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत स्थापन झाली. संयुक्त पुरोगामी आघाडीत १४ राजकीय पक्ष सहभागी होते. यावरून भारतात बहुपक्षपद्धती अस्तित्वात आलेली असलेली दिसते. मात्र यात भाजपा आणि काँग्रेस हेच राष्ट्रीय पातळीवर दोन बलाढ्या पक्ष उरलेले असल्यामुळे भारतात व्दिपक्षपद्धती पक्षपद्धती कडे वाटचाल करीत असलेली दिसते.

२) **पक्षांतर्गत अस्थिरता :** भारतात पक्षांतर्गत अस्थिरता असल्यामुळे कोणताच पक्ष पक्षांतर्गत बंडखोरी पासून सुटू शकला नाही. ज्या पक्षाची सत्ता केंद्र किंवा राज्यांमध्ये येते, त्या पक्षात मोठ्याा प्रमाणात दुस-या पक्षातील बंडखोर उमेदवारांची भरती होताना दिसते. एका पक्षाने दुसऱ्या पक्षाशी किंवा गटाशी आघाडी करणे, पुढे त्या आघाडी पासून दूर जाणे, आणि पुन्हा त्याच आघाडीत सामील होणे असे प्रकार सातत्याने होत असताना दिसते.

३) **प्रभावशाली विरोधी पक्षांचा अभाव :** भारतात बहुपक्षपद्धती असल्यामुळे एकही पक्ष प्रबळ विरोधी पक्षाची भूमिका बजावताना दिसत नाही. राष्ट्रीय पातळीवर भाजपाच्या नेतृत्वाखाली NDA तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील UPA अशा आघाड्याा स्थापन झाल्या, परंतु या आघाडीतील घटक पक्षांचे विविध मुद्द्यांबाबत एकमत होत नसल्यामुळे या आघाडीतील घटक पक्ष परस्परविरोधी भूमिका घेताना दिसतात विविध राजकीय पक्ष केवळ निवडणुकीपुरते आघाड्यांमध्ये एकत्र येतात. त्यांचे विचार तसेच हितसंबंध परस्परविरोधी असल्यामुळे, राष्ट्रीय महत्वाच्या एखाद्या प्रश्नाबाबत ते सत्ताधारी पक्षाच्या विरोधात मजबुतीने संघटित होताना दिसत नाहीत. त्यामुळे सत्तारूढ पक्षावर वचक ठेवणारा प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव असलेला दिसून येतो.

४) **वैचारिक दिवाळखोरी :** वरवर पाहता भारतीय राजकीय पक्षांचे वर्गीकरण डावे-उजवे, पुरोगामी-प्रतिगामी असे करता येत असले तरी तत्व किंवा वैचारिकतेच्या आधारावर यात फारसा फरक करता येत नाही. त्यामुळे सर्वच पक्षांचे वैचारिक तोंडावळे सारखेच दिसतात. या वैचारिक रितेपणामुळेच व्ही. पी. सिंग सरकारला एका बाजूने भाजपा तर दुसऱ्या बाजूने डावे- कम्युनिस्ट पक्ष बाहेरून पाठिंबा देऊ शकतात. काँग्रेसला पर्यायी आघाडी उभी करून सत्ता मिळवण्यात जरी भाजपा व इतर पक्ष यशस्वी झालेले दिसत असले आणि राष्ट्रीय पातळीवर भाजपाच्या नेतृत्वाखालील NDA आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील UPA अशा दोन आघाड्याा झालेल्या दिसत असल्या तरी, या राजकीय पक्षांचे वैचारिक ध्रुवीकरण झाले असे मुळीच म्हणता येणार नाही. भाजपाशी वैचारिक दृष्टयाा तीव्र मतभेद असलेले पक्ष ही एकत्र आलेले दिसतात. उदा. RPI (A) रामविलास पासवान यांचा लोक जनशक्ती पक्ष. त्यामुळेच साप-मुंगुस नाते असलेले BJP-BSP यांचे उत्तर प्रदेशात तर काश्मीरमध्ये BJP-PDP हे एकत्र येऊन सरकार स्थापन करू शकतात.

५) **उद्दिष्ट आणि कृती यामध्ये दुटप्पीपणा :** भारतातील सर्वच राजकीय पक्ष निवडणूक प्रचारादरम्यान मोठमोठी आश्वासने घोषणा देतात. परंतु दिलेली आश्वासने सत्ता प्राप्त झाल्यानंतर पाळायची असतात याचा विसर सर्वच पक्षांना होतो. गरिबी हटाव, अच्छे दिन, काळा पैसा परत आणणार अशी मोठमोठी आश्वासने देतात. घोषणांच्या प्रचाराने जनतेला आकृष्ट करून जास्तीत जास्त मते मिळवता येतात. असे सर्वच राजकीय पक्षांना वाटते. त्यामुळे घोषणा आणि कृती यात सांगड घालण्याचा प्रयत्न येथे होताना दिसत नाही.

६) **प्रादेशिक पक्षांचा प्रभाव :** भारतीय पक्ष पद्धतीचे विशेष वैशिष्ट्ये म्हणजे प्रादेशिक पक्ष सुद्धा राष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडतात. १९८९ च्या निवडणुकीनंतर कोणत्याही एका राष्ट्रीय पक्षाला

बहुमतापर्यंत पोहोचणे कठीण गेले. त्यामुळे त्यांना जनाधार वाढण्यासाठी प्रादेशिक पक्षांचे सहकार्य घ्यावे लागते. महाराष्ट्रात भाजपला शिवसेना तर काँग्रेसला, राष्ट्रवादी काँग्रेसचे सहकार्य घ्यावे लागते. पंजाबमध्ये अकाली दलाच्या सहकार्याने भाजपाने आपला जनाधार वाढविला. बिहार मध्ये काँग्रेस, लालूप्रसाद यादव यांचा राजद तर भाजपा, नितीश कुमार यांच्या जेडीयू आणि रामविलास पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्ष यांचे सहकार्य घेताना दिसते. दक्षिणेकडील राज्यात तर राष्ट्रीय पक्षांना तेथील प्रादेशिक पक्षांचे सहकार्य घेतल्याशिवाय पाया. रोवणे कठीण आहे. त्यामुळेच भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व कायम असलेले दिसते.

७) **संमिश्र सामाजिक पाया :** भारतातील बहुतांश राजकीय पक्षांचे सदस्यत्व बहुजिनसी असून जाती, धर्म, भाषा व इतर बाबी यावर आधारलेले अनेक समूह प्रत्येक पक्षात एकवटलेले आढळतात. सामाजिक पाया बहुजिनसी (Hetrogenous) असल्यामुळे इथला कोणताच पक्ष अंतर्गतदृष्टया एकात्म नाही. आणि बहिर्गत दृष्टच्या इतर पक्षांशी स्थायी स्वरूपाची करण्यास लागणारी सहिष्णुता ही कोणत्याच पक्षापाशी नाही. त्यामुळे संप्रदायवादी-निधर्मी, जातीवादी-पुरोगामी, आधुनिक-परंपरावादी अशा परस्परविरोधी विचारांचे लोक कार्यकर्ते एकाच पक्षाच्या छताखाली वावरताना दिसतात.

८) **व्यक्तिपूजा :** भारतात राजकीय पक्ष ज्या व्यक्तीकडून स्थापन केला जातो, त्या व्यक्ती भोवतीच फिरत असतो. त्यामुळे व्यक्तीपूजा भारतीय राजकारणाचा स्थायीभाव बनलेला आहे. सर्वच राजकीय पक्षांना नेतृत्वाच्या वारसदाराचा प्रश्न सतावत असतो. राजकीय पक्ष तेवढे व्यक्तिकेंद्री किंवा एक खांबी असतात की, पक्षाचा हा खांब कोसळला तर त्या पक्षाची वाताहात होते. अनेकदा पक्षाच्या प्रमुख नेत्याचे निधन झाले तर कालौघात पक्षसुद्धा नष्ट होतो. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षात घराणेशाही प्रभाव असलेला जाणवतो.

९) **संकुचित निष्ठा :** भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असले तरी भारतातील राजकीय पक्षांवर धर्म, जात, भाषा इत्यादी अशा संकुचित घटकांचा प्रभाव मोठ्याा प्रमाणात आहे. एमआयएम, मुस्लिम लीग, अकाली दल, हिंदू महासभा यासारखे जमातवादी तसेच जाती, भाषा-प्रदेशाचे अस्मितेचे राजकारण करणारे अनेक पक्ष येथे आढळतात. राष्ट्रीय पक्ष सुद्धा निवडणुकीच्या वेळी अशा धर्मांध, जातीयवादी, भाषा-प्रांतवादी पक्षांचे सहकार्य घेताना दिसतात. धर्म, जाती, भाषा अशा संकुचित निष्ठा वरच येथील पक्षाची उभारणी होत असल्याने विकासाच्या मुद्द्यावर पेक्षा येथे निवडणुकीत जाती-धर्माचे मुद्दे गाजतात.

१०) **अपक्षांची मोठी संख्या :** भारतात बहुपक्षपद्धती अस्तित्वात असूनही निवडणुकांमध्ये अपक्ष उमेदवारांची संख्या मोठ्याा प्रमाणात आढळते. अपक्षांना कोणताही विशिष्ट कार्यक्रम किंवा विचारप्रणाली नसते. म्हणून ते संधीसाधूपणा चे राजकारण खेळत असतात. सरकार स्थापन करण्यासाठी जेव्हा पक्षांची गरज भासते, तेव्हा ते अपक्ष सभासद एखादे मंत्री पद मिळवून आणि अन्य प्रकारे आपली किंमत वसूल करतात. पक्षांतर्गत बंडखोरी किंवा पक्षशिस्तीचा अभाव याला कारण अपक्षांची असणारी मोठी संख्या आहे.

## राष्ट्रीय पक्ष

### प्रास्ताविक

भारतात राजकीय पक्षाचे वर्गीकरण राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष असेही केले जाते. एखाद्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष किंवा अखिल भारतीय दर्जा निवडणूक आयोग देत असतो. राजकीय पक्षाने निवडणुकीत

मिळविलेल्या मतांचे प्रमाण निवडणूक लढताना त्या पक्षाने उमेदवार उभे केलेल्या मतदारसंघाचे भौगोलिक क्षेत्र आणि त्या पक्षाचे उमेदवार निवडून येण्याचे प्रमाण या आधारे एखादा पक्ष राष्ट्रीय की प्रादेशिक हे ठरवले जाते. त्यामुळे या निकषाच्या आधारावर आज राष्ट्रीय म्हणून मान्यता असलेला पक्ष या निवडणुकीनंतर प्रादेशिक पक्ष ठरू शकतो. तसेच आज प्रादेशिक म्हणून मान्यता मिळवलेला पक्ष उद्या राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता प्राप्त होऊ शकतो.

### राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निकष

The Electionsymbols (Reservetion and Allotment order) 1968 मधील नियमानुसार खालील निकष पूर्ण करणा-या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला जातो.

१) विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत ज्या पक्षाला चार किंवा जास्त राज्यांमध्ये वैध मतांपैकी कमीत कमी ६टक्के मते मिळाली पाहिजेत आणि लोकसभा निवडणुकीत कमीत कमी ४ जागा मिळाल्या पाहिजेत. किंवा

२) लोकसभा निवडणुकीत या पक्षाला एकूण जागांपैकी कमीत कमी २ टक्के जागा मिळाल्या पाहिजेत आणि या जागा कमीत कमी ३ राज्यांमधून निवडून आल्या पाहिजेत किंवा

३) त्या पक्षाला कमीत कमी ४ राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाला पाहिजे. (पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मणिपूर आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाल्यामुळे तृणमूल काँग्रेसला नुकताच ७ व्या राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला आहे.)

सध्या सात राजकीय पक्षांना राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला आहे ते सात राजकीय पक्ष पुढीलप्रमाणे:-

१) अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस

२) बहुजन समाज पार्टी

३) भारतीय जनता पार्टी

४) कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया

५) कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया (मार्क्सवादी)

६) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस

७) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी निवडणूक आयोगाने जे निकष ठरविले आहेत, त्यावरून राष्ट्रीय पक्षांची वैशिष्टये किंवा लक्षणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) राष्ट्रीय पक्ष हे अखिल भारतीय स्वरूपाचे असतात या पक्षांच्या कार्याचा प्रसार हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसतो, तर त्या पक्षाचे जाळे भारतीय पातळीवर विणले गेलेले असते.

२) त्यांच्या कार्यक्रमात आणि जाहीरनाम्यात अखिल भारतीय स्वरूपाच्या प्रश्नांचा अंतर्भाव केलेला असतो. सर्व जाती, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश यांच्या हितसंबंधांना सामावून घेणारा त्यांच्या कार्यक्रम असल्यामुळे अनेक वर्ग-समूह एकाच पक्षाच्या छताखाली एकवटलेले असतात.

munotes.in

३) त्यांना मिळणारा पाठिंबा देशभरातील अनेक प्रदेशांतून मिळत असतो. त्यामुळे विशिष्ट प्रदेश वा जाती-धर्माच्या प्रश्नापेक्षा व्यापक प्रश्नावर या पक्षांचा भर असतो.

४) संपूर्ण देशाच्या व सर्व भारतीयांच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांचे विवेचन हे पक्ष आपल्या अधिवेशनातून तसेच प्रसिद्धी माध्यमातून करत असतात.

५) राष्ट्रीय पक्ष स्थानिक पातळीवरील राजकारणात सुद्धा सहभागी होत असतात. तसेच पक्षाचे उमेदवार स्वत:चा पक्ष प्रचार करताना स्थानिक पातळीवरील प्रादेशिक, जाती- धर्मीय प्रश्न उपस्थित करतात. तरी तत्वत: त्यांची बांधिलकी त्यांच्या पक्षाने महत्त्वाच्या प्रश्नावर घेतलेल्या भूमिकेशी असते. त्यामुळेच राष्ट्रीय म्हणून ओळखले जाणारे नेते त्यांच्या मतदारसंघात जाती-जमाती, प्रदेश, भाषा असे संकुचित प्रश्नावर राजकारण करतात. परंतु राष्ट्रीय पातळीवर मात्र विविधतेतून एकात्मता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन ते देशाला करत असतात. सर्वच राजकीय पक्षांमध्ये ही विसंगती आपल्याला आढळून येते.

**भारतातील काही प्रमुख राष्ट्रीय पक्ष:-**

**(१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (Indinan National Congress)-**

ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (काँग्रेस पक्ष) हा पक्ष सध्या अस्तित्वात असलेल्या पक्षांमध्ये सर्वात जुना पक्ष मानला जातो. या पक्षाची स्थापना ब्रिटिश राजवटीच्या काळात १८८५साली झाली. सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्ष हा अभिजन, उच्चभ्रू, शेठ-सावकार-जमीनदार वर्गाचा तसेच पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या उच्चशिक्षित भारतीयांचा पक्ष होता. मवाळ-जहाल कालखंडानंतर १९२० साली महात्मा गांधींचे नेतृत्व या पक्षाला मिळाल्यानंतर या पक्षाला स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय काँग्रेसची निर्णायक भूमिका राहिली असल्यामुळे, 'देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारा पक्ष' अशी या पक्षाची जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातही भारताच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचा प्रभाव कायम राहिला. स्वातंत्र्योत्तर काळात जवळजवळ तीन दशके केंद्र तसेच राज्यात काँग्रेसची एकहाती सत्ता होती. मात्र पुढे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानंतर १९६७ च्या निवडणुकीत या पक्षाला जबरदस्त हादरा बसला. जवळजवळ निम्या घटक राज्यांमध्ये या पक्षाची सरकारे स्थापन होऊ शकली नाहीत. आणि केंद्रातही द्रमुक व साम्यवादी पक्षाशी हातमिळवणी करून काठावरचे बहुमत त्याला मिळाले. पण पुढे पाच वर्ष पूर्ण होण्याच्या आतच इंदिरा गांधीच्या नेतृत्वात हा पक्ष पुन्हा सावरला. आणि पूर्वीपेक्षाही अधिक सक्षम झाला.

१९७५ साली सत्तेच्या महत्त्वाकांक्षेपोटी इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी सरकारने दडपशाही व हुकूमशाही पद्धतीने सर्वसामान्यांना वेठीस धरून विरोधकांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला. आणीबाणी हटवल्यानंतर झालेल्या १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. स्वत: इंदिरा गांधी सुद्धा निवडणूक हरल्या आणि केंद्रात पहिल्यांदा काँग्रेसेतर पक्षाचे, जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे नेते मोरारजी देसाई हे पहिले काँग्रेसेतर पक्षाचे पंतप्रधान बनले.

१९७७ साली अपयशी ठरलेल्या काँग्रेस पक्षात १९७९ मध्ये फूट पडून देवराज अर्स, यशवंतराव चव्हाण, स्वर्णसिंग, करण सिंग यांनी काँग्रेस (यु) पक्ष स्थापन केला. तर इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष

(आय) स्थापन झाला. परंतु काँग्रेस पक्षाच्या फाटाफुटीचा फायदा नव्याने तयार झालेल्या जनता पक्षाला झाला नाही. उलट जनता पक्षातील आपापसातील मतभेदामुळे आणि चौधरी चरण सिंग यांनी पुकारलेल्या बंडामुळे जनता पक्षाला पूर्ण पाच वर्ष सत्ता सांभाळता आली नाही. १९८० साली मध्यवर्ती निवडणुका झाल्या आणि या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षाने सत्तेत पुनरागमन केले. काँग्रेस पक्ष पुन्हा बलशाली बनला.

ऑक्टोबर १९८४ मध्ये इंदिरा गांधीजींची हत्या झाल्यानंतर वारसाहक्काने काँग्रेस पक्षाची सूत्रे त्यांचे चिरंजीव राजीव गांधी यांच्याकडे आली. १९८५ साली काँग्रेसने आपली शताब्दी साजरी केली या वेळी काँग्रेसच्या वाटचालीवर भाष्य करताना अभ्यासकांनी असा निर्वाळा दिला की, ‘‘गांधी, नेहरूंची काँग्रेस आणि इंदिरा, संजय, राजीव गांधींची काँग्रेस यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. पूर्वी काँग्रेस कोणत्याही नेत्या-कार्यकर्त्या पेक्षा मोठी होती. नवी काँग्रेस नेत्यांची बटीक झाली. औपचारिक रचना पूर्वी सारखीच असली तरी, प्रत्यक्ष कार्यवाही मात्र आमूलाग्र बदलली आहे.’’

१९८९ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत पुन्हा एकदा काँग्रेसला जोरदार धक्का बसला. दुसऱ्यांचा गैरकाँग्रेसी सरकार व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. मात्र व्ही. पी. सिंग सरकार फार काळ सत्ता सांभाळू शकले नाही. १९९१ साली प्रचारादरम्यान राजीव गांधी यांच्या आकस्मिक निधनामुळे भावनिक लाटेतून पुन्हा काँग्रेसने पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन केली. २००४ ते २०१४ या काळात काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली यूपीएआघाडी केंद्रात सत्तेत होती. सोनिया गांधी युपीएच्या अध्यक्ष होत्या तर पंतप्रधान मनमोहन सिंग होते. २०१४ ची लोकसभा निवडणूक काँग्रेस पक्षासाठी सर्वात वाईट निकाल देणारी निवडणूक ठरली. कारण पहिल्यांदाच ५४३ जागांपैकी काँग्रेसचे केवळ ४४ खासदार निवडून येऊ शकले.

## १) <u>काँग्रेसपक्ष संघटना</u> :-

काँग्रेस पक्षाच्या संघटनेत:-

१) अखिल भारतीय काँग्रेस समिती २)वर्किंग कमिटी (कार्यकारी समिती)३)प्रदेश काँग्रेस समिती ४) जिल्हा काँग्रेस समिती ५) शहर काँग्रेस समिती ६) ग्राम समिती किंवा वार्ड समिती यांचा समावेश होतो.

अशा प्रकारे काँग्रेस पक्षाची संघटनात्मक रचना एखाद्या मनो-यासारखी आहे. यात अखिल भारतीय काँग्रेस समिती ही काँग्रेस पक्ष संघटनेची शिखर समिती होय. या समितीत प्रदेश काँग्रेस समितीचे प्रतिनिधी असतात. ही समिती सर्व प्रादेशिक समित्यांवर नियंत्रण ठेवते. पक्षाची ध्येयधोरणे ठरवण्याचा अधिकार या समितीला आहे. वर्षातून एकदा या समितीची बैठक भरते

काँग्रेस वर्किंग कमिटी (कार्यकारिणी समिती) पक्षकार्याचे नियंत्रण करणारी सर्वोच्च समिती आहे. या समितीमध्ये काँग्रेसच्या अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व १८ सदस्य असतात. लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाचे अधिकृत उमेदवार ठरविणे, संसदीय पक्षाची बैठक बोलाविणे अशी महत्त्वपूर्ण कार्यही समिती करते. प्रत्येक घटक राज्यासाठी किमान एक किंवा त्यापेक्षा अधिक प्रदेश काँग्रेस समिती असतात. या समितीचे घटकराज्यातील पक्ष संघटनेवर नियंत्रण असते. जिल्हा स्तरावर जिल्हा काँग्रेस समिती, तर नगर पातळीवर नगरसमिती आणि अगदी ग्राम (खेडे) पातळीवर ग्रामसमिती आणि वॉर्ड

पातळीवर काँग्रेस समिती कार्यरत असते. अशा प्रकारे अगदी शिखरापासून ते तळापर्यंत काँग्रेसचे पक्ष संघटन मजबूतपणे बांधले गेलेले दिसते.

## २) काँग्रेस पक्षाची ध्येय धोरणे व विचारसरणी

स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करत असताना काँग्रेस पक्षाने सर्व जाती, धर्म, भाषा, प्रांत यांच्या लोकांना आपल्यात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे डावे-उजवे पुरोगामी-प्रतिगामी अशा सर्व विचारांचे लोक काँग्रेस पक्षात समाविष्ट झालेले होते. स्वातंत्र्योत्तर काळातही तीन दशके काँग्रेसचे हे स्वरूप बदललेनाही. म्हणूनच काँग्रेस पक्षात तिकडे जमीनदार एकीकडे जमीनदार, सावकार, उद्योगपतींचा वर्ग तर दुसरीकडे गरीब, शेतकरी, मजूर, दलित आदिवासी मागासवर्ग अशा विभिन्न वर्गाचे लोककाँग्रेस पक्षात एकवटलेले दिसतात. त्यामुळेच विचारसरणीच्या दृष्टीने काँग्रेस पक्षाला डावा किंवा उजवा विचारसरणीचा पक्ष म्हणता येत नाही. वैचारिक दृष्टीने काँग्रेस पक्ष हा मध्यमार्गी, धर्मनिरपेक्षवादी, खाजगी सार्वजनिक यात तारतम्य ठेवून किंचित समाजवादी ध्येयधोरणे स्वीकारणारा पक्ष म्हणून ओळखला जातो. परंतु १९९१ नंतर आपली समाजवादीही भूमिका दूर ठेवून या पक्षाने भारतात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात करून आर्थिक बाबतीत आपल्या ध्येयधोरणात मोठा बदल केलेला दिसतो.

समाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बाबतीत सर्व जाती धर्माचे सह अस्तित्व जपणारा, भारतातील सर्व क्षेत्रातील विविधता कायम ठेवून त्यातून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यावर विश्वास ठेवणारा, सर्व जाती-धर्म पंथांच्या लोकांना आपापली संस्कृती, रूढी, परंपरा, प्रथा कायम ठेवून शांततापूर्ण सहअस्तित्व व सहिष्णुता यावर भर देणारा हा पक्ष आहे. त्यामुळेच सामाजिक बाबतीत अतिपुढारलेपणा किंवा अतिरुढीजन्यता हा पक्ष स्वीकारत नाही. बदलत्या काळानुरूप काही सामाजिक-सांस्कृतिक बदल स्वीकारून भारतीय संस्कृतीची प्राचीनताही कायम राहावी अशी या पक्षाची तत्वत: भूमिका असते. थोडक्यात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय बाबतीत काँग्रेस पक्ष मध्यममार्गी विचारप्रणालीचा स्वीकार करण्याचे धोरण हा पक्ष स्वीकारताना दिसतो.

### काँग्रेस पक्षाचा कार्यक्रम

प्रत्येक पक्ष सार्वत्रिक निवडणुकीत आपला जाहीरनामा प्रसिद्ध करत असतो. त्यावरून राजकीय पक्षाचे कार्यक्रम स्पष्ट होतात. तसेच पक्षातर्फे चळवळी, आंदोलने चालविल्या जातात. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडीत विशिष्ट भूमिका घेतली जाते. यावरून पक्षाचे कार्यक्रम स्पष्ट होतात.

काँग्रेस पक्षाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## १) समाजवादी समाजरचना स्थापन करणे:-

१९५५ च्या आवडी अधिवेशनापासून 'समाजवादी समाजरचना' हे आपले उद्दिष्ट असल्याचे जाहीर केले आहे आणि तेव्हा पासून आजपर्यंत प्रत्येक निवडणुकीच्या वेळी पक्षाने काढलेल्या जाहीरनाम्यात मधून या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आवश्यक पावले उचलण्याची अभिवचने हा पक्ष देत आला आहे. १९७१ च्या निवडणुकीच्या वेळी काँग्रेस पक्षाने प्रस्तुत केलेल्या जाहीरनाम्यात काही कार्यक्रमांचा ठळक अंतर्भाव करण्यात आलेला होता.

संपत्तीच्या केंद्रीकरणा विरुद्ध प्रतिबंधक उपाय योजना, सार्वजनिक क्षेत्राची वाढ करणे, आयात-निर्यात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करणे, मुलांच्या सुरक्षेची हमी घेणे, गरीबी व निरक्षरता यांचे निर्मूलन करणे,

रोजगाराची नवी क्षेत्रे पुरविणे, शेतीसाठी पाणीपुरवठा करणे, शहरी मालमत्तेवर कमाल मर्यादा आणणे, माजी संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, उत्पन्न व संधी याबद्दलची विषमता दूर करणे अशाप्रकारच्या घोषणा पत्रातील या मुद्द्यावरून या पक्षाचा समाजवादी अजेंडा जाहीर होता. याच निवडणुकीच्या वेळी कॉंग्रेस पक्षान 'गरिबी हटाव'अशी घोषणा दिली होती. या घोषणांची अंमलबजावणी कितपत झाली हा प्रश्न वेगळा, पण नंतरच्या काळातही कॉंग्रेस पक्षाने'वीस कलमी कार्यक्रम' किंवा'कॉंग्रेस का हात आम आदमी के साथ'अशा लोकप्रिय घोषणा देऊन आपल्या पक्षाच्या मुख्य कार्यक्रम समाजवादी समाजरचना स्थापन करणे हा आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला.

## २) गरिबी व बेकारी निर्मूलन करणे

आपल्या समाजवादी ध्येयवादाला अनुसरून कॉंग्रेस पक्षाने प्रत्येक निवडणुकीच्या जाहीरनाम्यात गरीबी व बेकारी निर्मूलनावर भर दिलेला दिसतो. देशातील साधनसामुग्रीचा अधिकाधिक वापर करून औद्योगिकीकरण करून रोजगार वाढविणे, कुळकायदा शेतजमीन धारणेचा सिलिंग, कायदा अतिरिक्त जमिनी भूमिहीन शेतकऱ्यांना वाटणे अशी शेतजमीन धारणेतील विषमता दूर करण्यासाठी कॉंग्रेस पक्षाने धोरणे आखली. मोठमोठ्याा उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, बँकांचे राष्ट्रीयीकरण, नफेखोरी काळाबाजार साठेबाजीला आळा, संपत्तीचे विकेंद्रीकरण करून तिचे समान वाटप करणे अशा कार्यक्रमातून कॉंग्रेस पक्ष गरिबी दूर करण्यावर भर देतो.

## ३) कृषी विकास

ग्रामीण भागाचा विकास व कृषी विकासाशी संबंधित आहे हे लक्षात घेऊन कॉंग्रेस पक्षाने सुरुवातीपासूनच प्रयत्न केलेले दिसतात. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळात कॉंग्रेस पक्षाने ग्रामीण भागाच्या विकासासाठी राष्ट्रीय विस्तार कार्यक्रम आणि सामूहिक विकास कार्यक्रम तयार केले. देशाच्या व्यापक विकासाचा नियोजन बद्ध पद्धतीने विचार करण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना केली आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेत सर्वात अधिक कृषि विकासावर लक्ष केंद्रित केले. जमीन धारणेतील विषमता दूर करण्याबरोबरच पाटबंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, जलसिंचन वाढविणे, कृषी कर्ज पुरवठा करणे, खते, बी-बियाणे, कीटकनाशके किफायतशीर किमतीत उपलब्ध करून देणे अशा कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात येते.

## ४) शैक्षणिक विकास

प्राथमिक माध्यमिक तसेच उच्चशिक्षणाबरोबरच उच्च व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणावर भर देणे, सर्व लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे, निरक्षरता दूर करणे इत्यादी अशा शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमावर कॉंग्रेस पक्ष भर देतो. राजीव गांधींच्या काळापासून कॉंग्रेस पक्षाने यांत्रिकीकरणावर अधिक भर दिला. त्यामुळे तेव्हापासून कॉंग्रेस पक्षाने आपल्या कार्यक्रमात व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाच्या विकासाला अधिक महत्त्व दिले.

## ५) परराष्ट्र धोरणे

सुरुवातीपासूनच कॉंग्रेस पक्षाने आपल्या परराष्ट्र संबंध विषयक धोरणात आंतरराष्ट्रीय शांतता व परस्परसहकार्य या तत्त्वावर भर दिला. शेजारील राष्ट्रा सोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे, जागतीक शांततेचा पुरस्कार करून राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न करणे, वर्णद्वेष, शस्त्रस्पर्धा, साम्राज्यवाद

यापासून अलिप्त राहने, कश्मीर प्रश्न तसेच चीन सीमारेषावाद शांततेच्या-वाटाघाटीच्या मार्गाने सोडविणे, इत्यादी परराष्ट्र संबंध विषयक धोरणे कॉंग्रेसने स्वीकारली.

## ६) धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा स्वीकार

भारतातील बहुधार्मिकता व बहुसांस्कृतिकतेची जपवणूक करून भारतातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माचे आचरण, प्रचार व प्रसार करता येईल यासाठी प्रयत्न करणे, धर्माच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करता प्रत्येकाला आपल्या धर्म व संस्कृती प्रमाणे जगता येईल अशी धोरणे स्वीकारून कॉंग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा पुरस्कार करतो.

## ७) सामाजिक न्याय व सलोखा कायम ठेवणे

समाजातील वंचित व मागास घटकांना सर्व क्षेत्रात विकासाची समान संधी उपलब्ध व्हावी यासाठी राज्यघटनेत नमूद केलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणे, समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे, दलित, आदिवासी, महिला यांच्या सक्षमीकरणासाठी समाजकल्याणाच्या योजना अमलात आणणे, समाजातील जातीजातीं मधील तणाव धर्म, भाषा, पंथ यातील अंतरसमुदाय संघर्ष, तणावदूर करून सामाजिक सलोखा निर्माण करणे अशी धोरणे कॉंग्रेसने स्वीकारली.

वरील धोरणे व कार्यक्रमांचा उल्लेख प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीरनाम्यात कॉंग्रेस पक्षाने वारंवार केलेला दिसून येतो. अर्थात कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वात जसजसा बदल झाला कालानुरूप या कार्यक्रमातील प्राधान्यक्रम बदललेला दिसतो. पंडित जवाहरलाल नेहरू आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या काळातील कॉंग्रेस पक्षावर समाजवादी तत्त्वांचा प्रभाव मोठ्याा प्रमाणावर होता. राजीव गांधींच्या काळापासून कॉंग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात धंदेवाईक व्यवस्थापकीय दृष्टिकोण आणि खुली अर्थव्यवस्था या धोरणांना महत्त्व आले. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारून समाजवादी धोरणांना फाटा देण्यात आला. सोनिया गांधींच्या नेतृत्वाखाली असलेला आजचा कॉंग्रेस पक्ष नवे आर्थिक धोरण अंमलात आणण्यावर भर देतो. कॉंग्रेसच्या आर्थिक धोरण व कार्यक्रमात बदल झालेला दिसत असला तरी धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा स्वीकार, दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणणे, सामाजिक सलोखा व सांस्कृतिक बहुविधताजपणे या धोरणांचा सातत्याने पाठपुरावा करत असलेला दिसतो.

## (२) भारतीय जनता पक्ष (Bhartiya Janta Party) –

### ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

भारतीय जनता पक्ष हा भारतातील एक महत्त्वाचा राष्ट्रीय पक्ष आहे. ऐतिहासिक दृष्टयाा भाजप हा पक्ष भारतीय जनसंघाची नवी आवृत्ती आहे. १९५१ साली डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनसंघाची स्थापना झाली. जनसंघ हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजकीय अंग मानले जात होते. १९५२सालच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत जनसंघाला केवळ तीन जागांवर विजय मिळाला होता.

१९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या देशव्यापी आणीबाणीला जनसंघाने कडवा विरोध केला. सरकारने जनसंघाच्या अनेक सदस्यांना तुरुंगात डांबले. १९७७ साली आणीबाणी उठल्यानंतर जनसंघाने भारतीय लोकदल, कॉंग्रेस (ओ), सोशालिस्ट पार्टी इत्यादी पक्षांसोबत एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. १९७७ च्यालोकसभा निवडणुकीत जनतापक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. व मोरारजी देसाई

पंतप्रधान व अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री बनले. परंतु अंतर्गत मतभेदांमुळे जनता पार्टी सरकार १९८० साली कोसळले व जनतापार्टीचे विघटन झाले. जनता पार्टीच्या विघटनानंतर १९८० साली भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली. अटलबिहारी वाजपेयी पक्षाचे पहिले अध्यक्ष होते. भाजपाचा चेहरा मोहरा जनसंघासारखाच होता.

१९८९ मध्ये झालेल्या नवव्या लोकसभा निवडणुकीत या पक्षाला ८८ जागा प्राप्त झाल्या. १९९१ मधील दहाव्या लोकसभा निवडणुकीत या पक्षाला ११६ जागा प्राप्त झाल्या. १९९९ मध्ये भाजपाच्या नेतृत्वाखाली २४ पक्षांची राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन झाली. या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखाली लोकसभेत बहुमत प्राप्त होऊन केंद्रात आघाडी (NDA) सरकार स्थापन झाले. अशाप्रकारे १९९१ पासून भारतीय राजकारणात एक महत्त्वपूर्ण असे स्थान भाजपला प्राप्त झाले. २०१४ च्या निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने ५४३ लोकसभेच्या जागांवर २८२ उमेदवार निवडून आले. २०१४ साली नरेंद्र मोदी हे दुसरे भाजपाचे पंतप्रधान बनले. सध्या भारतीय राजकारणात भाजपा हा सर्वात मोठा राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे.

**<u>२) भारतीय जनता पक्षाची संघटना</u>**:-

भारतीय जनता पक्षाच्या संघटनेत १) मार्गदर्शक मंडळ २) राष्ट्रीय कार्यकारिणी किंवा पार्लमेंटरी बोर्ड ३) नॅशनल कौन्सिल ४) सेंट्रल इलेक्शन कमिशन ५) डिसिप्लिनरी कमिटी ६) नॅशनल सेल्स अशा विविध संस्थांची रचना केलेलीआहे.

यापैकी मार्गदर्शक मंडळात ज्येष्ठांचे परंतु एक्झिक्यूटिव्ह अधिकार नसणाऱ्या विशेष सल्लागार मंडळाची उभारणी केली आहे. राष्ट्रीय कार्यकारिणी किंवा नॅशनल कौन्सिल या समितीला कोणत्याही प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष या गटाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. नॅशनल कौन्सिल या पक्षातील विविध ज्येष्ठ व महत्त्वाच्या पदावरील व्यक्तीचा गट आहे. यात सद्या अध्यक्षासोबत माजी अध्यक्ष, सर्वराज्याचे अध्यक्ष, पक्षाचे सर्व खासदार व पक्षाचे सर्व आमदार तसेच सर्व मोचा/विभागांचे अध्यक्ष यांचा समावेश होतो. पक्षांतर्गत तक्रारीच्या निवारणासाठी आणि पक्षाच्या सदस्यांवर कारवाई करण्यासाठी डिसिप्लिनरी कमिटी आहे. याचबरोबर विविध प्रश्नांवर लक्ष देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर ५० विभाग बनवले आहेत. त्यांना नॅशनल सेल्स असे म्हटलेजाते. यात पाणी प्रश्न. अंत्योदय, मजूरमहासंघ, प्राकृतिक चिकित्स अशा अनेक विषयांचे विभाग आहेत.

याच बरोबर जिल्हास्तरावर जिल्हा समिती असते. जिल्ह्यातील मोठमोठ्याा शहरांमध्ये नगरसमिती असते. याशिवाय मोठी शहरे व ग्रामीण क्षेत्रात मंडल समिती पक्ष कार्याचे नियंत्रण करते. मंडळ समिती हा भारतीय जनता पक्ष संघटनेतील पायाभूत घटक होय.

**<u>३) भारतीय जनता पक्षाची ध्येय धोरणे व विचारसरणी</u>**:-

भाजप हा उजव्या विचारसरणीचा पक्ष म्हणून ओळखला जातो. हिंदुत्ववाद आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद हा या पक्षाच्या विचारसरणीचा मूळ गाभा आहे. या तत्वांना अनुसरूनच भाजपने भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करणे हे प्रमुख ध्येय मानले आहे. त्यासाठी गोवधबंदीचा कायदा करणे हिंदी व संस्कृत भाषेच्या अध्ययन व विकासाला गती प्राप्त करून देणे, अयोध्येतील रामजन्मभूमीवर राममंदिर बांधणे, अल्पसंख्यांक आयोगाचे मानवी हक्क आयोगात रूपांतर करून सर्व भारतीयांसाठी समान नागरी कायदा तयार करणे

तसेच जम्मू-काश्मीरला खास दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करणे, परकीय घुसखोरांचा शोध घेऊन त्यांची त्यांच्या मूळ देशात रवानगी करणे इत्यादी अशी ध्येय-धोरणे आहेत.

**४) भारतीय जनता पक्षाचा कार्यक्रम:-**

भाजप हा उजव्या विचारसरणीचा व हिंदुत्ववादाचा पुरस्कार करणारा पक्ष असल्यामुळे आपल्या या ध्येय वादाला अनुसरूनच भाजपाने प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीरनाम्यात आपल्या पक्षाचा कार्यक्रम स्पष्ट केलेला आहे. साररूपाने भाजपाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) जम्मू कश्मीर बाबतचे संविधानातील ३७० वे कलम रद्द करणे

२) अयोध्येच्या वादग्रस्त बाबरी मशिदीच्या जागेवर राममंदिर बांधणे, त्यासाठी स्वतंत्र कायदा करणे.

३) देशातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा लागू करणे

४) अल्पसंख्यांक आयोग रद्द करून मानवी हक्क आयोगात सम्मिलित करणे.

५) भूक, भय व भ्रष्टाचारापासून जनतेला मुक्त करणे. काळया पैशांवर नियंत्रण ठेवणे.

६) महिलांसाठी लोकसभा व विधानसभा मध्ये ३३ टक्के राखीव जागा ठेवणे.

७) धार्मिक अधिकारा संबंधी संविधानातील कलम ३० मध्ये सुधारणा करणे.

८) गोहत्या तसेच गोवंश हत्याबंदी करणे.

९) केंद्रराज्य संबंधाच्या पुनर्बांधणीसाठी राज्यांना अधिक स्वायत्ता देणे. छोटी राज्य निर्माण करण्यासाठी राज्य पुनर्रचना आयोग स्थापन करणे

१०) भारताची संरक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी क्षेपणास्त्रे व अणुबॉम्ब तयार करणे इत्यादी.

सामाजिक क्षेत्रात भाजपाच्या जाहीरनाम्यात सर्व समाज घटकांसाठी न्यायाचे आश्वासन आहे. संविधानात दिलेले अनुसूचित जाती-जमाती व मागास वर्गीयांसाठी शैक्षणिक व नोकरीच्या क्षेत्रातील आरक्षण कायम रहावे अशी या पक्षाची भूमिका आहे. त्यामुळे SC, ST, OBC मध्ये आपला पाया विस्तारित करण्यात हा पक्ष कमालीचा यशस्वी झाला आहे.

पक्षाची आर्थिक विचारसरणी संदिग्ध आहे. सर्वच समाजघटकांना संतुष्ट करण्याचा पक्षाचा प्रयत्न दिसतो. प्रत्यक्ष आघाडी सरकारच्या आर्थिक धोरणातून जरी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण याच तत्त्वाचा प्रत्यय येत असला, तरी 'स्वदेशी' किंवा 'मेक इन इंडिया' ची भाषाही हा पक्ष करत असतो. भाजपच्या राजकीय कार्यक्रमाची भिस्त हिंदुत्वाच्या विचार सरणीवर आणि सांस्कृतिक राष्ट्रवादावर आहे. पण दुस-या बाजूला ए नडीएतील २४ पेक्षा अधिक सहयोगी पक्षांना सोबत घेऊन संयुक्त सरकार चालविताना भाजपला आपल्या हिंदुत्ववादी कार्यक्रमाला मुरड घालावी लागते. त्यामुळेच २०१४ मध्ये भाजपचे लोकसभेतील बहुमत असूनही राम मंदिर, समान नागरी कायदा, ३७० वे कलम, अल्पसंख्यांक आयोग रद्द करणे असे कार्यक्रम प्रत्यक्षात अमलात आणता आले नाहीत.

सारांशत: भाजपने आपली हिंदुत्ववादी कार्यक्रम पत्रिका मागे ठेवून सांस्कृतिक राष्ट्रवाद, तंत्रज्ञानात्मक प्रगती, स्वदेशी अस्मिता या आडमार्गाने हिंदुत्ववादी अजेंडा राबवण्याचा प्रयत्न करताना दिसते. परंतु आर्थिक तत्वविचारांच्या बाबतीत परस्पर विसंगत भूमिकेमुळे उदा. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया हे धोरण

एकीकडे राबवण्याचे राबवायचे दुसरीकडे परकीय गुंतवणुकीचे प्रमाण ही वाढवायचे यामुळे भाजपाची आर्थिक भूमिका तडजोडीची व संदिग्ध राहिली आहे असे दिसते.

## **३) बहुजन समाज पक्ष (Bahujansamaj Party)**

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**:-

आंबेडकरवादाला प्रमाण मानून राजकारण करणारा बहुजन समाज पक्ष हा भारतातील एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे. बहुजन समाज पक्षाची स्थापना मुख्यत: तीन टप्प्यात झाली.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाला फाटाफुटीने ग्रासले होते मा. कांशीराम नोकरीनिमित्ताने १९६० च्या दशकात पुणे शहरात आले. याच काळात डॉक्टर आंबेडकरांच्या विचारधारेवर आधारित असलेल्या रिपाईची वाताहत पक्ष समर्थकांमध्ये प्रामुख्याने नोकरदार वर्गाला खुपत होती. मा. कांशीराम रिपाईला एकसंघ करण्याचा प्रयत्न केला, परंतु रिपाई गट नेते आपापल्या मांडलेल्या वेगवेगळ्या चुली मोडायला तयार नव्हते. शेवटी मा. काशिरामांनी नोकरीचा राजीनामा देऊन आंबेडकरवादी चळवळीचा प्रचार कार्याला वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली. यासाठी त्यांनी बामसेफ (बॅकवॉर्ड अंड मॉयनारिटी कम्युनिटी एम्प्लॉईज फेडरेशन) ची स्थापना केली. हा बसपच्या उत्क्रांतीतील हा पहिला टप्पा मानला जातो.

बामसेफचा प्रारंभ महाराष्ट्रात झाला. एस.सी., एस.टी., ओबीसी या आरक्षित वर्गातील नोकरदारांना संघटित करून कांशीराम यांनी नोकरदारांना पैसा, वेळ, बुद्धी देऊन समाजाचे ऋण (Pay Back tosociety) फेडावे असे आवाहन केल. बामसेफ ही संघटना एकीकडे नोकरदार वर्गाचे प्रश्न सोडवत होती, तर दुसरीकडे त्यांच्यामध्ये आंबेडकरवादी चळवळीशी निष्ठा रुजविण्याचे कार्य करत होती. समाजातील सुशिक्षित व नोकरदार वर्गांमध्ये आंबेडकरवादी विचारांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी पूर्णविळ केडर बेस कार्यकर्ते तयार केले. हे कार्यकर्ते प्रबोधनाच्या अंगाने आंबेडकरवादाचा प्रचार करण्याचे कार्य करीत होते परंतु बामसेफने कोणताही आंदोलनाचा कार्यक्रम हाती घेतला नाही.

मा. काशीराम यांनी सुरू केलेल्या चळवळीतील दुसरा टप्पा म्हणजे डी. एस. फोर (दलित शोषित समाज संघर्ष समिती) निर्मिती होय. डी. एस. फोर संघटनेतील कार्यकर्ते नोकरदार नव्हते. डी. एस. फोर ने राजकीय आंदोलने, चळवळी, निवडणुकांमध्ये सहभागी होणे सुरू केले. या राजकीय प्रयोगाच्या अनुभवातुन कांशीराम यांनी दिल्ली येथे १४ एप्रिल १९८४ रोजी बसपाची स्थापना केली बसपाच्या स्थापनेनंतर काही वर्षात दलित वर्गाकडून मोठा पाठिंबा या पक्षाला मिळाला. १३ व्या लोकसभेत (१९९९- २००४) या पक्षाला १४ जागा, १४ व्या लोकसभेत १७, १५ व्या लोकसभेत २१ जागा या पक्षाने मिळवून उत्तरोत्तर प्रगती केली. २००७ साली झालेल्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत प्राप्त केले. पक्षाच्या अध्यक्षा मायावती ह्या चौथ्यांदा मुख्यमंत्री बनल्या.उत्तरप्रदेश, हरियाणा, राजस्थान, पंजाब, मध्यप्रदेश या हिंदी भाषिक पट्ट्याा बरोबरच आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू या दक्षिण भारतातील राज्यातही बसपा चा प्रभाव आहे.

**२) बहुजन समाज पक्षाची संघटना**:-

बसपाची स्थापना झाल्यानंतर अल्पकाळातच पंजाब, उत्तरप्रदेश, मध्य प्रदेश, जम्मू कश्मीर या राज्यांमध्ये मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षाचा दर्जा या पक्षाला प्राप्त झाला. १९९६ पासून बसपाला राष्ट्रीय पक्ष असा दर्जा

प्राप्त झाला. कांशीराम यांच्या खंबीर, दूरदृष्टी व त्यागपुर्ण व्यक्तित्व व संघटन कौशल्यामुळे तसेच पक्षाच्या अध्यक्षा मायावती यांच्या एक खंबीर नेतृत्वामुळे रिपाई सारखे फाटाफुटीचे ग्रहण या पक्षाला लागले नाही.

बसपाची संघटनात्मक रचना इतर पक्षांसारखीच आहे. पक्षाची संघटना राष्ट्रीय, प्रदेश, विभाग, जिल्हा, तालुका ग्राम अशा स्तरावर केले गेले आहे. बसपा तर्फे दर तीन वर्षांनी पक्ष सदस्यांची नोंदणी करण्याचा कार्यक्रम हाती घेतला जातो. यात सर्व कार्यकर्त्यांना सहभागी होण्याची मुभा असते. किमान १०० सदस्यांची नोंदणी करणारा कार्यकर्ता जिल्हास्तरावरील समितीचा सदस्य होण्यास पात्र ठरतो. जिल्हा समितीचे सदस्य पक्षाच्या जिल्हाध्यक्ष यांची निवड करतात. जिल्ह्यातील अध्यक्षांच्या बैठकीत प्रदेशाचा अध्यक्ष निवडला जातो. प्रदेश कार्यकारणी पदाधिकारी होण्यासाठी १००० सदस्यांची नोंदणी करणे, ही पात्रता विषयक अट आहे. अशाप्रकारे राष्ट्रीय स्तरावर बसपाचे कार्य अध्यक्ष व कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली संपन्न होते. बसपाच्या संघटनेत राष्ट्रीय कार्यकारिणीच्या अध्यक्षाला महत्त्व असून पक्ष संघटनेचे नेतृत्व आणि अधिकार राष्ट्रीय अध्यक्षांकडे केंद्रित झालेले असतात.

### **<u>३) बसपाचे ध्येय धोरणे आणि विचारसरणी</u>**:-

आंबेडकर वादाला प्रमाण मानून राजकारण करणारा बसपा हा पक्ष असल्यामुळे, महात्मा फुले, शाहू महाराज, नारायण गुरु, रामास्वामी पेरियार इत्यादी बहुजन समाज सुधारक व विचारवंतांचे विचार हीच या पक्षाची विचारसरणी आहे. आणि या बहुजन नायकांनी जे ध्येय उराशी बाळगले, ते ध्येय (शोषण रहित समतामूलक समाज) साध्य करणे हे बसपाचे उद्दिष्ट असल्याचे बसपा तर्फे प्रचारित केले जाते.

सामाजिक व आर्थिक दृष्ट्याा येथील बहुजन समाज हजारो वर्षे गुलामगिरीत पिचला गेला होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व इतर समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाला मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी उपलब्ध झाली. मनुवाद व ब्राह्मण शाही हे येथील सामाजिक व आर्थिक शोषणाचे मूळ आहे. त्यामुळे मनुवाद-ब्राह्मणशाहीला नष्ट करून समतामूलक समाजरचना निर्माण करणे हे बसपाचे मुख्य ध्येय आहे.

राज्यसत्ता ही सर्व समस्यांच्या निवारणाची गुरुकिल्ली आहे. शासक जर मनुवादी व्यवस्थेला प्रमाण मानणारा असेल, तर तो स्वतःहून शोषितांच्या सामाजिक- आर्थिक गुलामगिरीच्या बेड्याा तोडण्यासाठी तयार होणार नाही. त्यामुळे समाजातील सामाजिक-आर्थिक विषमता जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी शोषित वर्गाला शासक बनण्यासाठी पुढे यावे लागेल. कारण शोषण नष्ट करण्यासाठी शासकच सक्षम असतो. त्यामुळे येथील शोषितांनी, बहुजनांनी शासक होण्याची तयारी केली पाहिजे. संख्येच्या दृष्टीने येथील सामाजिक-आर्थिक दृष्ट्याा मागासलेलो SC,ST,OBC व अल्पसंख्य हा बहुजन समाज ८५ टक्के आहे. म्हणजेच बहुजनांची संख्या अधिक आहे. या सर्व बहुजन जाती-वर्गाला एकसंघ करून त्यांच्या संख्येच्या बळावर लोकशाही मार्गाने बहुजन वर्गाला सत्ताधीश बनवणे, हे बसपाचे उद्दिष्ट आहे. शासक बनण्याचा विश्वास बहुजन वर्गामध्ये निर्माण व्हावा यासाठी आत्मसन्मान व स्वाभिमानाची भावना चळवळीच्या माध्यमातून निर्माण करणे आणि बहुजनांना देशाचे शासक बनविने हे पक्षाचे ध्येय आहे.

बसपाची विचारसरणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी बौद्ध विचार दर्शनावर आधारित आहे. बहुजन वर्गाला-शोषित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्याबरोबरच भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत आणि एकूण संविधानात जो ध्येयवाद मांडलेला आहे किंवा संविधानामध्ये जी तत्त्वे अंगीकारली आहेत, या तत्त्वाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे हे बसपाचे ध्येय आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय तसेच राजकीय न्यायबरोबरच सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे, येथील राजकीय लोकशाहीला सामाजिक

munotes.in

व आर्थिक लोकशाहीत परावर्तित करणे हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय बसपाने प्रमाण म्हणलेले आहे.

आर्थिक ध्येय धोरणाच्या बाबतीत बसपाची भूमिका मध्यममार्गी आहे. देशाच्या साधन संपत्तीचे समान वाटप व्हावे अशी भूमिका बसपा घेते. मात्र डाव्यांप्रमाणे बसपा मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध करीत नाही. त्याचप्रमाणे मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थन करीत असताना बाजारपेठीय स्पर्धेमध्ये येथील वंचित-शोषित समूहांचे जीवन उध्वस्त होणार नाही याचीही काळजी घेते. म्हणजेच मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध अथवा डाव्या विचारसरणीचे समर्थन अशी टोकाची भूमिका हा पक्ष घेत नाही. जागतिकीकरणाच्या प्रवाहात येथील मागासवर्गीय जाती समूहांना आपल्या उद्धाराच्या संधी उपलब्ध होतील यादृष्टीने जागतिकीकरणाचे धोरण राबवण्याचे बसपाचे उद्दिष्ट आहे. मागासवर्गीयांचे शिक्षण व नोकऱ्यांमधील आरक्षणाला सुरक्षित ठेवणे तसेच आरक्षण धोरणाचा सार्वजनिक क्षेत्राबरोबरच खाजगी क्षेत्रात विस्तार करणे, सामान्यत: सामाजिक दृष्ट्याा मागासलेला बहुजन वर्ग आर्थिक दृष्ट्या सुद्धा मागासलेलाच आहे. त्यामुळे येथील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, असंघटित श्रमिक, छोटे व्यापारी, कारागीर यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासन पातळीवर अधिक सोयी-सवलती उपलब्ध करून देण्यावर या पक्षाचा भर आहे.

**<u>बहुजन समाज पक्षाचा कार्यक्रम</u>**

'राजकीय सत्ता' हे एक समाज परिवर्तनाचे साधन म्हणून वापरणे व येथील बहुजन समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून त्याला शासनकर्ती जमात बनवणे हे बसपाचे मुख्य ध्येय आहे. या ध्येयाला अनुसरून बसपा आपल्या विचारसरणीचा प्रचार आंबेडकरी साहित्य, बहुजन नेत्यांचे चरित्र, बसपा नेत्यांचे जीवनदर्शन इत्यादी माध्यमातून पक्षाचे प्रशिक्षित कार्यकर्ते करीत असतात. वस्तुत: इतर पक्षाप्रमाणे बसपा निवडणुकीसाठी जाहीरनामा तयार करून त्यानुसार पक्षाच्या प्रचार करण्यावर विश्वास ठेवत नाही. संविधानात असलेले मूलभूत हक्क व मूल्य यांची अंमलबजावणी करणे हाच पक्षाचा मुख्य कार्यक्रम असतो. राजकीय घडामोडींमध्ये बसपाचा कार्यक्रम खालील तत्वांना धरून असतो.

१) भारतात जाती आधारावर होत असलेला भेदभाव व शोषण तसेच आर्थिक क्षेत्रात श्रीमंत-गरीब यांच्यात असलेली मोठी दरी यामुळे येथील दलित आदिवासी व अन्य मागास वर्गाला तसेच अल्पसंख्यांक वर्गाला अन्याय व शोषणाचे शिकार व्हावे लागते. अशा अन्यायकारक व विषमतामूलक समाजव्यवस्थेत संविधानाने घोषित केलेली समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय हे मूल्य व नागरिकांचे हक्क प्रत्यक्षात अमलात येत नाहीत, म्हणून ख-या अर्थाने संविधानातील मूल्यांची रुजवात करायची असेल तर येथील विषमतेवर आधारित सामाजिक व आर्थिक व्यवस्था बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकीय सत्ता हस्तगत करणे व शोषित समाजाला शासकाच्या भूमिकेत आणणे हा बसपाचा मुख्य कार्यक्रम आहे.

२) सर्व प्रकारच्या समस्येचे मूळ अज्ञान हे आहे. शेकडो वर्ष येथील बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवून अज्ञानाच्या खाईत ढकलले गेले. त्यामुळेच हा समाज सामाजिक व आर्थिक बाबतीत मागास राहिला व विकासाच्या संधीपासून वंचित राहिला. या वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, आरक्षण व सवलती देऊन सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध करून देणे, शिक्षणाच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजाचे सबलीकरण करणे.

३) संविधानात दिलेले नागरिकांच्या हक्काचे रक्षण करणे. या हक्कांच्या सर्व नागरिकांना प्रत्यक्ष उपभोग घेता यावा यासाठी अनुकूल समाज परिस्थिती निर्माण करणे.

४) अनुसूचित जाती जमाती अन्य मागास वर्ग व अल्पसंख्यांक वर्ग हा भारतातील सर्वात शोषित व विकासापासून वंचित असलेल्या वर्ग आहे. देशातील साधन-संपत्तीचे योग्य वाटप न झाल्यामुळे कमालीचे आर्थिक असुरक्षित जीवन जगण्यास त्याला बाध्य केले गेले आहे. या वर्गाला आर्थिक दृष्टीने सक्षम बनवण्यासाठी साधन-संपत्तीचे वाटप करणे, न्यायपूर्ण वाटप करणे, संविधानाने निर्देश केलेल्या समाजवादी ध्येयधोरणांची अंमलबजावणी करणे.

५) संविधानाने दिलेले सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारावर आरक्षण नीतीची काटेकोर अंमलबजावणी करणे. आरक्षण धोरण अधिक व्यापक करून आर्थिकदृष्ट्याा मागास असलेल्या उच्च किंवा सवर्ण जातींना आरक्षणाच्या माध्यमातून विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी कायदेशीर अडथळे दूर करणे. आरक्षण निती एक उचित प्रतिनिधित्व देण्याचे साधन म्हणून वापर करणे.

६) भारतातील सांस्कृतिक विविधता, धर्मनिरपेक्ष तत्वाचे पालन करणे. तसेच भारतातील सर्व समाज घटकांना एकसंघ करून बंधुत्वाची भावना विकसित करून देशाला सशक्त करणे. 'जाती तोडो- समाज जोडो' या अभियानाद्वारे सर्व समाज घटकांना एकत्र करणे. सामाजिक सलोखा विचारांची सहिष्णुता वृद्धिंगत करणे.

सारांशत: भारताची समाजरचना ही समानतेवर आधारित आहे. जोपर्यंत ही व्यवस्था कायम राहील तोपर्यंत येथील शोषण व अन्याय कायम राहील. ही अन्यायपूर्वक व्यवस्था बदलून समता, स्वातंत्र्य व न्याय या मानवी मूल्यांवर आधारित नवीन समाजरचना निर्माण करणे, असे व्यापक उद्दिष्ट बहुजन समाज पक्षाचे आहे. बसपाची स्थापना करून काशीराम यांनी ''ब्राह्मण, बनिया, ठाकूर चोर बाकी सब है डी एस फोर'' अशी घोषणा दिली. निवडणुकांच्या राजकारणात तत्त्वे, तत्त्वनिष्ठा किंवा जाहीरनाम्यातील कार्यक्रम यापेक्षा व्यवहारवादावर आणि तडजोडीवर या पक्षाचा भर आहे. त्यामुळे पक्षाने सुरुवात जरी मनुवाद्यांवर प्रखर हल्ला करून केली असली तरी, हिंदुत्व विचाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भाजपा पक्षाबरोबर उत्तर प्रदेशात संयुक्त सरकार स्थापन करण्यात या पक्षाला दिक्कत वाटत नाही. १९९५, १९९७ आणि २००२ साली मायावती यांच्या नेतृत्वाखाली भाजप-बसपा संयुक्त सरकारे उत्तरप्रदेशात सत्तेवर आली. १९९६ च्या निवडणुकीपूर्वी बसपाने काँग्रेस पक्षाशी निवडणूक समझोता केला होता. मुलायमसिंग यांच्या समाजवादी पक्षाशी कधीकाळी निवडणूक मैत्री करणाऱ्या बसपा सरकारने २००३ साली मुलायमसिंग यांच्यावर शेकडो खटले भरले. २००७ च्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत स्वबळावर सत्ता स्थापन केली. यावेळी बसपाने आपली रणनीती व भूमिका बदलली. 'तिलक, तराजू और तलवार इनको मारो जूते चार' अशी घोषणा देणारी बसपा 'हाथी नही गणेश है ब्रह्मा, विष्णू, महेश है' अशी समाजातील सर्व वर्गाला सोबत घेण्याची भूमिका घेऊ लागली. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ऐवजी 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' असे ब्रीदवाक्य घेऊन सर्व जाती-धर्माचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करू लागलेली दिसते.

## साम्यवादी पक्ष (Communist party)

### ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतात साम्यवादी गटाची सुरुवात १९२१ पासून झाली असली तरी, १९२५ आली कानपूर येथे झालेल्या पहिल्या साम्यवादी संमेलनात (सेंट्रल कमिटीची) स्थापना होऊन हा राष्ट्रव्यापक 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष' (भाकप) अस्तित्वात आला. भारतात स्वातंत्र्याची चळवळ ऐन भरात असताना काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात चाललेल्या या राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा द्यायचा की, स्वतंत्रपणे येथील श्रमिकांचे जनआंदोलन उभे करायचे याविषयी भारतातील या कम्युनिस्ट पक्षांमध्ये मतभेद होते. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात साम्यवादी पक्ष स्वत:ला

नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा भाग मानत होता. आंतरराष्ट्रीय पातळीवरील कम्युनिस्ट इंटरनॅशनल भारतातील साम्यवादी पक्षाच्या ध्येय धोरण व कार्यक्रमांना दिशा देत होती.

स्वातंत्र्योत्तर काळात काही औद्योगिक केंद्रांमध्ये भारतीय साम्यवाद्यांनी हिंसक आंदोलने केली. १९४६-५१ या काळात तत्कालीन हैदराबाद राज्यातील तेलंगणा प्रांतात जमीनदारांविरुद्ध शेतकऱ्यांचे हिंसक आंदोलने या पक्षाने उभारली. परंतु हा उठाव फसला. मलबार, तेल्लीचेट्टी, डमडम या भागातही साम्यवाद्यांनी हिंसक दंगली केल्या. २६ मार्च १९४८ रोजी पश्चिम बंगाल सरकारने भापकला अवैध घोषित केले. मद्रास, त्रावणकोर, कोचीन या सरकारांनी सुद्धा साम्यवादी संघटनांवर बंदी घातली. १९४९ मध्ये केंद्र शासनाने 'भारतातील साम्यवादी हिंसाचार' नामक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. अशा परिस्थितीत देशात पहिली सार्वत्रिक निवडणूक घोषित झाली.

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाकपाने सहभाग घेतला आणि आपल्या साम्यवादी ध्येयधोरणांचा जोरदार प्रचार केला. या निवडणुकीत भाकप व त्यांचे मित्र पक्ष लोकसभेत सर्वाधिक प्रबळ विरोधी पक्ष ठरला. ५. ४ टक्के मते व २७ जागा या पक्षाला मिळाल्या. या यशानंतर अनेक कम्युनिस्ट नेत्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. आणि या पक्षावरील बंदी उठवण्यात आली. दुस-या सार्वत्रिक निवडणुकीत पश्चिम बंगाल व केरळ या राज्यात पक्षाने आक्रमक प्रचार करून लोकसभेत २९ जागा पटकावल्या या पक्षाला मतदान करणाऱ्यांची संख्या दुपटीने वाढली. जवळपास सर्व राज्य विधानसभा मध्ये या पक्षाचा चंचुप्रवेश झाला. पश्चिम बंगाल व आंध्र प्रदेश राज्यात तो सर्वात मोठा पक्ष होता. केरळ राज्यात दणदणीत विजय मिळवून इतर पाच पक्षाच्या मदतीने या पक्षाने स्वत:चे सरकार स्थापन केले. केरळमधील साम्यवादी पक्षाचे सरकार हे लोकशाही पद्धतीने निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता स्थापन करणारे जगातील पहिले साम्यवादी सरकार मानले जाते.

## पक्षांतर्गत फूट

सुरुवातीपासून भारतीय कम्युनिस्ट पक्षात दोन भिन्न विचारांचे गट होते. एक सोविएत रशियाच्या अनुनय करणारा गट होता. तर एक सोविएत रशियाचे अंध अनुकरण न करता, माओने चीनमध्ये जनसंघर्षाच्या संबंधी शासन प्रस्थापित केले त्याला आदर्श मानणारा होता. पहिल्या गटाचे नेतृत्व भाकपाचे तत्कालीन महासचिव पी. सी. जोशी हे करत होते तर दुस-या गटाचे बी. टी. रणदिवे हे करीत होते. पहिल्या गटाचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी कडे बघण्याचा दृष्टिकोन नेमस्त किंवा मवाळ होता. पंडित नेहरूंच्या नेतृत्वात स्थापन झालेले काँग्रेस सरकार हे साम्राज्यवादी शक्तीच्या विरोधात काम करणारे आहे. त्यामुळे इंग्रजांकडून झालेले सत्ता हस्तांतरण वास्तविक आहे. म्हणून भाकपाने काँग्रेसचा संबंधीचे पूर्वीच्या धोरणांचे पुनर्मूल्यांकन केले पाहिजे. असे पहिल्या गटाचे म्हणणे होते. या मताला अजय घोष व श्री. अ. डांगे यांचा पाठिंबा होता. दुस-या गटाने चीनमध्ये माओच्या नेतृत्वात झालेली सशस्त्र जनक्रांती भारतात झाली पाहिजे. त्यांनी भारतीय राज्याच्या विरुद्ध युद्ध पुकारावे अशी भूमिका घेतली. दुस-या गटात नंबूद्रिपाद, ज्योती बसू व पी. सुंदरप्पा हे होते. दुसरा गट जहाल व आक्रमक सशस्त्र क्रांतीचे समर्थन करणारा होता.

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. यावेळी रशियावादी गट व चीनवादी गट या दोन गटातील मतभेद टोकाला गेले. चीनचे भारतावरील आक्रमणाच्या या राष्ट्रीय संकटाच्या प्रसंगी भारतातील सर्व राजकीय पक्षांनी सरकारला एकमुखी पाठिंबा दिला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जोशी-डांगे गटाने सुद्धा नेहरू सरकारला पाठिंबा दिला. भाकपाच्या या भूमिकेचा निषेध म्हणून बसू, पी सुंदरप्पा, प्रभुतींनी पक्ष कार्यकारिणीचे राजीनामे दिले. चीनचा निषेध करण्याच्या ते विरुद्ध होते. चीनविषयक भूमिकेमुळे भाकपाची

munotes.in

प्रतिमा डागाळली. साम्यवाद्यांची निष्ठा देशाची जुळलेल्या नसून आक्रमण करणा-या परकीयांशी जुळल्या आहेत अशी जनभावना निर्माण झाली. कॉम्रेड डांगे यांनी चीनविरोधी भाषणे करून हा कलंक धुऊन काढण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे दुसरा गट अधिक चिडला व दुखावला गेला.

१९६४ भाकपच्या राष्ट्रीय अधिवेशनात जोशी-डांगे गटाने फुटीर कारवाया व पक्षविरोधी भूमिका या आरोपावरून नंबूद्रिपाद व ए. के. गोपालन वगैरे ३२ बंडखोरांना पक्षातून निलंबित केले. निलंबित केलेल्या या भाकप बंडखोरांनी जुलै १९६४ रोजी आंध्रप्रदेशातील तेनाली गावी वेगळे अधिवेशन बोलावले. संसदेतील अकरा सदस्यांनी ए. के. गोपालन यांच्या नेतृत्वाखाली भाकप पेक्षा वेगळा पक्ष 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष' स्थापन केला. भाकपच्या एकतृतीयांश सदस्यांनी माकप मध्ये प्रवेश केला. अशाप्रकारे साम्यवादी पक्षाचे दोन पक्ष झाले. भाकप मध्ये रशियावादी गट होता तो भारतीय कम्युनिस्ट पक्ष म्हणून कायम राहिला. याला उजवा कम्युनिस्ट पक्ष संबोधले जाऊ लागले. या पक्षाचे नेतृत्व श्रीपाद अमृत डांगे, रोझा देशपांडे, पी. सी. जोशी, कुमार मंगलम या नेत्यांकडे होते. तर १९६४ झाली चीनवादी गटाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष असा नवा पक्ष स्थापन केला. या डाव्या साम्यवादी गटाचे नेतृत्व नंबुद्रीपाद, ज्योती बसू, गोपालन, पी सुंदरप्पा, पी. दासगुप्ता, हरकिसन सुरजित इत्यादी नेत्यांकडे होते.

१९७०-७७ या काळात भाकपने काँग्रेस सोबत युती केली. या युतीमुळे इंदिरा गांधींच्या काँग्रेसने लावलेल्या आणीबाणीचे सुद्धा समर्थन भाकप ने केले. यामुळे भाकपचा जनाधार कमी झाला. आणि माकप ऐंशीच्या दशकापर्यंत एक मजबूत पक्ष बनला. १९७७ नंतर भाकपाने माकपा व अन्य छोट्याा पक्षांसोबत वामपंथी मोर्चा स्थापन केला. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. भाकपने सरकारमध्ये सहभागी होण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. माकपच्या ज्योती बसू यांना पंतप्रधान होण्याचा प्रस्ताव संयुक्त मोर्चा कडून मांडण्यात आला. परंतु हा प्रस्ताव माकपने नाकारला. भाकप पेक्षा आपण वेगळे आहोत हे या निर्णयातून माकपने दाखविले. परंतु नंतरच्या काळात 'ही आमची सर्वात मोठी ऐतिहासिक भूल होती' हे माकपाने मान्य केले.

२००४ साली यूपीएसरकारला वामपंथी मोर्चाने पाठिंबा दिला. या काळात वामपंथी मोर्चाने सरकारने जनोन्मुखी कार्यक्रम राबवावा यासाठी दबाव कायम ठेवला. २००८ साली वामपंथी मोर्चाने अमेरिका सोबत परमाणु कराराच्या मुद्द्यावर यूपीएसरकारचा पाठिंबा काढून घेतला. २००४ च्या तुलनेत २००९ ची सार्वत्रिक निवडणूक मोर्चासाठी वाईट गेली. वामपंथी मोर्चासाठी वाईट गेली याचे कारण पश्चिम बंगालमध्ये त्यांची झालेली कोंडी. विशेष म्हणजे कम्युनिस्ट विचारधारा मानणाऱ्या पक्षाने सिंगूर आणि नंदिग्राम येथे राज्य सरकार द्वारा जबरदस्तीने भूमी अधिग्रहण केले आणि याचा विरोध करणाऱ्यांवर गोळ्या झाडल्या. यामुळे वामपंथी मोर्चाची प्रतिमा मलीन झाली. याचा परिणाम निवडणूक निकालावर झाला. २००९ च्या निवडणुकीत भाकपाला केवळ ४ जागा मिळाल्या. आणि २०१४ च्या निवडणुकीत केवळ एक जागा मिळाली. भाकपच्या घटत्या जनाधाराचीयाची अनेक कारणे आहेत. त्यापैकी मुख्य कारण म्हणजे या पक्षाने भांडवलशाही राज्यातील लोकशाही व्यवस्था पूर्णपणे स्वीकारली. त्यामुळे इतर डाव्या विचारसरणीच्या पक्षापेक्षा या पक्षाचे स्वरूप वेगळे राहिले नाही. आता हा पक्ष राष्ट्रीय चौकटीत कार्य करीत आहे. आणि भांडवलशाही राज्य नष्ट करण्याची भूमिका या पक्षाची राहिली नाही.

## <u>जाहीरनाम्यातील विशेष तरतुदी</u>

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दोन्ही पक्षांनी मिळून पुढील धोरणांचा स्वीकार केलेला आहे.

अ) भारतीय कम्युनिस्ट पक्ष:- १. ४२व्या विशोधना मध्ये सुधारणा करून व्यक्तिस्वातंत्र्य विरोधी कलमे रद्द करणे. २. किंमती स्थिर ठेवणे त्यासाठी जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक व्यापारावर नियंत्रण ठेवणे. ३. स्त्रियांना समान दर्जा देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी करणे. ४. अर्थव्यवस्थेतील सुधारणा करून रोजगार वृद्धी करणे. कामगार, शेतमजूर यांना किमान वेतन मिळवून देणे. ५. विद्यार्थी व शिक्षक यांना काम करण्याचा हक्क देणे. ६. मागासलेल्या जाती जमातींना मुस्लिमांना त्यांच्या हक्कांविषयी संरक्षण देणे. ७. साम्राज्यशाहीला विरोध करणे. ८. सोवियेत रशियाबरोबर मैत्रीचे संबंध वाढवणे.

ब) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष:- १. परकीय भांडवलाचे राष्ट्रीयीकरण करणे. २. साखर, जूट, सिमेंट आणि मक्तेदारीचे उद्योग समूह यांचे राष्ट्रीय करणे. ३. कामगार चळवळीच्या लोकशाही हक्कांचे पुनरुज्जीवन करणे. ४. शेतकऱ्यांची कर्जे माफ करून त्यांना लागणाऱ्या साधनसामुग्रीचा पुरवठा करणे. ५.१४ वर्षाखालील मुलांचे शिक्षण सक्तीचे व मोफत करणे. ६. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती खाली आणले व घाऊक व्यापार सरकारने ताब्यात घेणे. ८. रोजगाराचा हक्क मूलभूत हक्क करणे.

भाकप आणि माकपा या दोन्ही साम्यवादी पक्षांनी अन्य डाव्या विचाराच्या छोट्याा पक्षांना सोबत घेऊन वामपंथी मोर्चा तयार करून साम्यवादी विचारांचा प्रभाव भारतीय राजकारणावर कायम ठेवला आहे. पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा या राज्यात या पक्षाने सत्ता स्थापन केली. विशेष म्हणजे पश्चिम बंगालमध्ये सतत पंचवीस वर्षे सत्तारूढ पक्ष म्हणून कार्यरत राहण्याचा विक्रम या पक्षाने केला आहे. फॅसिस्ट शक्ती व धर्मनिष्ठ राजकारणाचा शिरकाव भारतीय राजकारणात होऊ नये म्हणून लहान-मोठ्याा विरोधी पक्षांना एकत्र आणण्यात हा पक्ष पुढाकार घेतो. कम्युनिस्ट पक्षाची सत्ता असलेल्या सरकारने आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारून किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांना बोलावून एक प्रकारे घोषित विचारसरणीशी विसंगत भूमिका या पक्षाने घेतलेली दिसत.` या अंतर्विरोधावर टीकाकारांनी या पक्षाला धारेवर धरले आहे. मात्र असे असले तरी छोटे शेतकरी, शेतमजूर, कामगार, असंघटित कामगार, स्त्रिया, दलित-आदिवासी अशा दुर्बल घटकांच्या बाजूने आवाज उठवणारा पक्ष म्हणून राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान अजूनही टिकून आहे.

## २.२ प्रादेशिक पक्ष वैशिष्टये (Regional Parties-Characteristics)

### प्रस्तावना

भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जोपर्यंत राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसचे एकतर्फी वर्चस्व होते तोपर्यंत राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात प्रादेशिक पक्षांना फारसे स्थान नव्हते. मात्र १९६७ नंतर प्रादेशिक राजकारणाचे तसेच १९८९ नंतर राष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले. १९८९ नंतर कोणत्याही मोठ्याा राष्ट्रीय पक्षाला स्वबळावर सत्ता स्थापन करणे कठीण होत गेले. त्यामुळे राष्ट्रीय पक्षांनी आपल्या समविचारी प्रादेशिक तसेच स्थानिक पातळीवरील मान्यताप्राप्त छोट्याा पक्षांशी युती करून राष्ट्रीय पातळीवर आघाडया निर्माण केल्या. प्रादेशिक तसेच छोटे स्थानिक पक्ष आघाडीचे घटक पक्ष बनल्यानंतर त्यांच्या छोट्याा अस्तित्वाला सुद्धा किंमत आली. त्यामुळे राज्यातील राजकारणाबरोबरच राष्ट्रीय राजकारणाचे समीकरण बिघडवण्याची क्षमता प्रादेशिक पक्षात निर्माण देखिल झाली.

भारत हा खंडप्राय देश आहे. धर्म, जाती, भाषा, वंश, प्रदेश या बाबतीत विविधता आहे. त्यामुळे राष्ट्रीय भूमिकेतून कार्य करणाऱ्या राष्ट्रीय पक्षांना स्थानिक पातळीवरील राजकारणाशी तडजोड करावी लागते. तसेच राष्ट्रीय प्रश्न सोडवणे हा राष्ट्रीय पक्षाचा प्राधान्यक्रम असल्यामुळे, स्थानिक पातळीवरील प्रश्न

सोडवण्यात हे पक्ष असमर्थ असतात. याउलट प्रादेशिक पक्षांची नाळ स्थानिक प्रश्नांची जुळलेली असल्यामुळे ते स्थानिक प्रश्न प्रभावीपणे सोडवू शकतात. त्यामुळेच प्रादेशिक किंवा स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवर निर्णायक भूमिका निभावून भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांनी आपला प्रभाव निर्माण केला आहे.

**प्रादेशिक पक्ष दर्जा प्राप्त करण्याच्या अटी**

निवडणूक आयोग पुढील दोन गटापैकी कोणत्याही एका गटातील सर्व अटी पूर्ण करणा-या राजकीय पक्षाला प्रादेशिक पक्ष असा दर्जा प्रदान करते.

गट क्रमांक एक:- १) विधानसभेसाठी च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्या राजकीय पक्षांचे विधानसभेतील एकूण सदस्यसंख्येच्या किमान ३ टक्के सदस्य किंवा २) किमान तीन सदस्य या दोन पैकी जी संख्या जास्त असेल तेवढे सदस्य निवडून आले असावे. किंवा

गट क्रमांक दोन:- १) विधानसभेसाठी झालेल्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत घटक राज्यातील एकूण वैधता पैकी किमान ६ टक्के मते त्या राजकीय पक्षाला मिळालेली असावी. याशिवाय २) त्या राजकीय पक्षाचे किमान दोन सदस्य विधानसभा सदस्य म्हणून निवडून आलेले असावे.

प्रादेशिक पक्ष असा दर्जा प्राप्त झालेल्या राजकीय पक्षासाठी एक निवडणूक चिन्ह राखून ठेवले जाते. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात त्या पक्षाच्या नेत्यांना दूरदर्शनवर आपला प्रचार करण्याची संधी मिळते. निवडणूक आयोगाच्या २०१८ च्या नोंदीनुसार भारतात ५८ प्रादेशिक पक्ष आणि १७८६ नोंदणीकृत पक्ष आहेत. पक्षाचे विभाजन, पक्षांतर, सार्वत्रिक निवडणुकीतील अपयश यासारख्या कारणांमुळे मान्यताप्राप्त पक्ष्याच्या संख्येत बदल होत असतो. निवडणूक आयोगाची प्रादेशिक पक्ष अशी मान्यता नसणारेही पक्ष आहेत. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचे १. मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष २. बिगर मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष असे दोन प्रकार आहेत. राजकीय पक्ष म्हणून कार्य करण्यासाठी नियमानुसार केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयात नोंदणी करावी लागते. असे नोंदणी झालेले परंतु प्रादेशिक पक्ष म्हणून निकष पूर्ण करू न शकलेले पक्ष नोंदणीकृत पक्ष असतात. अशा पक्षांना बिगर मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष म्हणतात.

munotes.in

**प्रादेशिक पक्षाची वैशिष्ट्ये**

विशिष्ट प्रदेशाच्या मर्यादेत कार्य करणा-या पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हटले जाते. भारतातील भाषिक, धार्मिक प्रादेशिक, संस्कृतीक विविधता लक्षात घेता येथील राज्यव्यवस्थेत प्रादेशिक पक्ष अस्तित्वात असणे स्वाभाविक आहे. भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप लक्षात घेण्यासाठी प्रादेशिक पक्षाची वैशिष्ट्यो समजून घेणे आवश्यक आहे. प्रादेशिक पक्षाची वैशिष्ट्यो पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **प्रादेशिक अस्मितेला महत्त्व**

प्रादेशिक पक्षाचे राजकारण हे मुख्यत्वे प्रादेशिक अस्मितेवर चालते. घटक राज्यांची निर्मिती मुख्यत्वे भाषिक व सांस्कृतिक आधारावर झालेली असल्यामुळे त्या त्या भाषिक-सांस्कृतिक अस्मितांचा आधार घेऊन प्रादेशिक पक्ष अन्य राज्यातील भाषिक व सांस्कृतिक समूहाविषयी अनुदार भूमिका घेतात. सीमाप्रश्न, पाणीवाटप प्रश्न किंवा अन्य विकासाचे प्रश्न प्रदेशाच्या अस्मितेशी जोडलेले असतात. हे प्रश्न तक्रसंगत कायदेशीर मार्गाने सोडविण्यापेक्षा अस्मितेच्या किंवा भावनिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न प्रादेशिक पक्ष करतात. त्यामुळे हे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे बनतात.

२) **संकुचित दृष्टी**

देशाच्या प्रश्नाकडे बघण्याची प्रादेशिक पक्षाची दृष्टी अत्यंत संकुचित असते. आपल्या प्रदेशाचे हित जोपासणे हेच प्रादेशिक पक्षाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. आपल्या प्रदेशाचा हिताची बाब आहे, म्हणून त्या प्रदेशातील जनता सुद्धा या पक्षांना पाठिंबा देतात. उदा. प्रत्येक राज्याला आपल्या राज्यात धरणे बांधून जास्तीत जास्त पाणी साठवण्याची आकांक्षा असते. आणि अन्य राज्यांसाठी पाणी उपलब्ध होईल की नाही याची चिंता करण्याची त्यांना गरज वाटत नाही. स्थानिक-परप्रांतीय असा वाद सुद्धा प्रादेशिक अस्मितेचा परिपाक आहे.

३) **राष्ट्र हिताला दुय्यम स्थान**

प्रादेशिक पक्ष आपल्या प्रदेशाची अस्मिता जोपासतात यामुळे फुटीरतेला खतपाणी घातले जाईल याचे भान ठेवत नाहीत. यामुळे भारतीय राष्ट्रवादाला अधिक संकुचित स्वरूप आलेले दिसते. प्रादेशिक हितसंबंधांचा विचार करताना वेळप्रसंगी केंद्र सरकारच्या योग्य निर्णयांना विरोध करण्याची भूमिका प्रादेशिक पक्ष घेतात. श्रीलंकेतील लिट्टे ला समर्थन करण्याची तामिळनाडू येथील प्रादेशिक पक्षांची भूमिका किंवा अकाली दलाच्या काही गटांनी खलिस्तानवादी दहशतवादी चळवळीचे केलेले समर्थन किंवा जम्मू काश्मीर मधील दहशतवादी कारवायात सहभागी होत असलेल्या तरुणांचे तेथील प्रादेशिक पक्षांकडून होत असलेली उदात्तीकरण या काही उदाहरणावरून प्रादेशिक पक्ष राष्ट्रहिताविरुद्ध भूमिका घेण्यासही मागेपुढे पाहत नाहीत हे दर्शवणारे आहेत.

४) **संधीसाधू राजकारण**

प्रादेशिक पक्षाची भूमिका संधिसाधूपणाची असते. सत्ता मिळविण्याची शक्यता मिळविण्याची वाटताच आपल्या पक्षाच्या घोषित तत्वज्ञाना विरुद्ध भूमिका असलेल्या पक्षास समर्थन करण्यास हे पक्ष तयार असतात. जनतेला सांगितले जाते प्रदेशाच्या हितासाठी, मात्र अशा भूमिकेमागे असते सत्तेची लालसा. तत्वे, मूल्य, वैचारिक बांधिलकी हे सर्व सत्तेच्या भागीदारीसाठी गुंडाळून ठेवण्यास प्रादेशिक पक्ष तयार असतात. त्यासाठी वेळप्रसंगी सरकारला अस्थिर करायला व देशाला नव्याने निवडणुकीस तोंड द्यायला भाग पाडण्यात हे पक्ष तयार असतात. गेल्या काही वर्षात केंद्र शासनाच्या स्तरावरील राजकारणाला जे अस्थिरतेने ग्रासले आहे याला प्रादेशिक पक्षाचे संधीसाधू धोरण कारणीभूत आहे.

५) **स्थानिक नेतृत्वाचा उदय**

प्रादेशिक पक्षाच्या अस्तित्वामुळे भारतीय राजकारणात सर्व काही वाईटच घडते असे मात्र म्हणता येणार नाही. प्रादेशिक पक्षाची सर्वात उपयुक्त बाजू म्हणजे, या पक्षांमुळे स्थानिक नेतृत्वाला पुढे येण्याची मिळालेली संधी ही होय. केंद्र शासनात काँग्रेसचे एकतर्फी वर्चस्व असल्याच्या काळात प्रादेशिक स्तरावर मुख्यमंत्री कोण असेल एवढेच नव्हे तर मंत्रिमंडळातील मंत्री कोण असतील हे केंद्राचे नेतृत्व ठरवित होते. पक्ष शिस्तीच्या नावाखाली केंद्रीय नेतृत्वाचे हे निर्णय स्थानिकांना स्वीकारण्याशिवाय पर्याय नसायचा. राष्ट्रीय अस्मिता, राष्ट्रीय दृष्टिकोन जरी महत्त्वाचा असला तरी स्थानिक, भाषिक व सांस्कृतिक अस्मिता याकडे दुर्लक्ष करणे हे चुकीचे होते. यावेळी प्रादेशिक अस्मितेच्या आधारावर स्थानिक नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाविरुद्ध बंडाचा आवाज उठविला. याला स्थानिक जनतेने पाठिंबा दिला. याचाच परिणाम १९६७ सालच्या राज्य विधानसभांच्या निवडणुकीत अध्यपिक्षा अधिक घटक राज्यात काँग्रेसेतर सरकार विशेषत: प्रादेशिक पक्षाचे सरकारे स्थापन झाली. यामुळे विविध राज्यात स्थानिक नेतृत्वाचा

उदय झाला. प्रादेशिक पक्षाच्या माध्यमातून मोठ्याा प्रमाणात स्थानिक पातळीवर काम करणारे नेते उदयास आले. प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांनी पुढे जाऊन राष्ट्रीय राजकारणात सुद्धा महत्त्वाची भूमिका बजावली.

६) **<u>व्यक्तिकेंद्रित स्वरूप</u>**

बहुतांशी प्रादेशिक पक्ष हे व्यक्तिकेंद्री स्वरूपाचे आहेत. एक किंवा जास्तीत जास्त दोन प्रमुख नेते आणि बाकी सगळे पक्ष कार्यकर्ते असे या पक्षांचे स्वरूप असते. व्यक्तिपूजा हे भारतीय राजकारणाचे व्यवच्छेदित लक्षण आहे. अगदी राष्ट्रीय राजकारणापासून स्थानिक राजकारणात या लक्षणाचा प्रभाव आपल्याला जाणवतो. प्रादेशिक पक्षांत या लक्षणाचा प्रभाव मोठ्याा प्रमाणात जाणवतो. प्रादेशिक पक्ष व्यक्ती भोवतीच केंद्रित झालेले असतात. पक्षाचे महत्त्वाचे निर्णय घेण्याची जबाबदारी एका व्यक्तीकडे असते. या निर्णयाचा विरोध करणे म्हणजे पक्षातून हकालपट्टी होण्यासारखे असते. त्यामुळे पक्षातील सर्वांना त्यांचा निर्णय शिरोधार्थ मानावा लागतो. लोकशाही मार्गाने सत्ता प्राप्त करायची मात्र पक्षांतर्गत लोकशाहीला पूर्ण विरोध करायचा अशी प्रत्येक प्रादेशिक पक्षाची पद्धत असते.

७) **<u>राष्ट्रीय पक्षांचे नमते धोरण</u>**

१९८९ नंतरच्या काळात राष्ट्रीय पातळीवरील पक्षांची शक्ती क्षीण झाली. स्वबळावर सत्ता प्रस्थापित करणे राष्ट्रीय पक्षांना कठीण झाले. यामुळे प्रादेशिक पक्षांना सोबत घेऊन राष्ट्रीय पक्षांनी आघाड्याा निर्माण केल्या. उदा. काँग्रेसच्या नेतृत्वात यूपीएतर भाजपाच्या नेतृत्वात एनडीए. प्रादेशिक पक्षांना आपल्या आघाडीत टिकवून ठेवण्यासाठी राष्ट्रीय पक्षांना तारेवरची मोठी कसरत करावी लागते. सत्तेला अस्थिर करण्याची क्षमता प्रादेशिक पक्षांकडे असल्यामुळे हे पक्ष सत्ताधारी पक्षाला ब्लॅकमेल करतात. राष्ट्रीय पक्षाची अवस्था इतकी अवघड झालेली असते, की तेही प्रादेशिक पक्षाच्या अटी उदा. मंत्रीपदे, महामंडळाचे अध्यक्षपद, आपल्या प्रदेशाला विशेष आर्थिक पॅकेज, प्रदेशाचे हित जपणारे धोरण इत्यादी मान्य करून, थोडे नमते धोरण घेऊन तडजोड करायला तयार होतात.

सारांशत: प्रादेशिक पक्षाच्या वरील वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मामुळे भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप वेगवेगळ्या प्रकारचे झाले आहे. प्रादेशिक पक्षांनी भारतीय राजकीय व्यवस्थेपुढे अनेक आव्हाने उभी केलेले दिसत असले तरी प्रादेशिक पक्षांचे हे वास्तव स्वीकारणे भाग आहे. कारण शेवटी भारतीय व्यवस्थेच्या वैशिष्ट्यापूर्ण राजकारणाचाच तो परिपाक आहे. प्रादेशिक अस्मिता जपणे, स्थानिक प्रश्नांना महत्त्व देणे यात काही गैर नाही. मात्र तसे करताना राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष होणार नाही याचे भान प्रादेशिक पक्षांनी जपले पाहिजे. त्यासाठी लोकमत राष्ट्रीय भावनांना प्रतिसाद देतील या दृष्टीने प्रबोधन होणे आवश्यक आहे. अनेक प्रदेशात संकुचित दृष्टी बाळगणा-या पक्षांना निवडणुकीद्वारे लोकांनी धडा शिकवायला सुरुवात केलेली आहे.

### प्रमुख प्रादेशिक पक्ष

### <u>१) तेलगू देसम पक्ष (TDP)- आंध्र प्रदेश</u>

आंध्रप्रदेश सुरुवातीपासून काँग्रेसचा मजबूत गड मानला जात होता. परंतु इंदिरा गांधींच्या काळापासून आंध्र प्रदेशमध्ये काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वविरुद्ध रोष वाढायला लागला. केंद्रसरकार आपल्यावर मुख्यमंत्री लादतात. आपली तेलुगु अस्मिता जपली जात नाही. याबद्दल तेथील जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला होता. १९७८ ते १९८२ या काळात इंदिरा गांधी सरकारने आंध्रप्रदेशचे चार वेळा मुख्यमंत्री बदलले होते. आपल्या तेलगू अस्मितेवर आघात केला जात आहे. असे चित्र या सर्व घटनातून रंगविण्यात आले. वृत्तपत्रातून याचा

जोरदार प्रचार करण्यात आला. या प्रचारात तत्कालीन सिनेअभिनेते एन. टी. रामाराव यांनी आघाडी घेतली. एन. टी. रामाराव यांनी आपल्या साठाव्या वाढदिवशी २९ मार्च १९८२ रोजी 'तेलगू देसम' या पक्षाची स्थापना केली. सहा कोटी तेलगू भाषिक लोकांच्या आत्मसन्मान आणि आदर यासाठी हा पक्ष काढला. इथून पुढे आंध्र प्रदेश सारखे महान राज्य काँग्रेस पक्षाची शाखा असल्यासारखी दिली जाणारी वर्तवणूक सहन करणार नाही. अशी भूमिका एन. टी. रामाराव यांनी मांडली.

तेलुगु देसम ची १९८२ साली स्थापना झाल्यानंतर वर्षाच्या शेवटी राज्य विधानसभेच्या निवडणुका झाल्या. राष्ट्रीय वृत्तपत्राचे सर्व अंदाज फोल ठरून ह्या पक्षाला दोनतृतीयांश बहुमत प्राप्त झाले. आणि पक्षस्थापनेच्या नऊ महिन्याच्या आत जानेवारी १९८३ शाली एन. टी. रामाराव हे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री झाले. आंध्रप्रदेशातील तेलगू देसम पक्षाचे सरकार हे पहिले गैरकाँग्रेसी सरकार होते. त्याचबरोबर लोकसभेत १९८४ ते १९८९ दरम्यान मुख्य विरोधी पक्ष म्हणून देशातील पहिला प्रादेशिक पक्ष 'तेलुगु देसम' हा पक्ष ठरला. १९९५ साली एन. टी. रामराव यांचे निधन झाल्यापासून चंद्राबाबू नायडू पक्षाची धुरा सांभाळत आहेत.

सध्या आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यातील एक प्रमुख प्रादेशिक पक्ष म्हणून तेलुगु देसम आपले स्थान टिकवून आहे. आंध्रप्रदेशमध्ये सध्या (२०१८) सत्ताधारी पक्ष आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत या पक्षाने १६ जागा जिंकल्या. राज्यसभेत या पक्षाचे ६ सभासद आहेत.

**<u>पक्षाची विचारधारा आणि कार्यक्रम:-</u>**

१) तेलुगु अस्मिता जपणे आणि आंध्र भाषिकांचा अभिमान बाळगणे.

२) काँग्रेस वर्चस्वाला शह देण्यासाठी या पक्षाची निर्मिती झाली होती त्यामुळे सुरुवातीपासून हा पक्ष काँग्रेसचा कट्टर विरोधी मानला जातो. ह्याच भूमिकेला धरून तेलगू देसम पक्ष भाजपच्या नेतृत्वाखालील NDA आघाडीत ( १९९९ ते २००५ व २०१४ ते २०१८) सामील झाला होता. मात्र काँग्रेस विरोधाची भूमिका आता पूर्वीसारखी कट्टरतेची राहिली नाही. कारण काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या UPA आघाडीत सुद्धा (१९९६ ते १९९८) हा पक्ष घटक पक्ष होता.

३) तेलगू देसम पक्ष हा शेतकरी, मागासवर्गीय जाती तसेच मध्यमवर्गीयांचा, छोट्याा व्यावसायिकांचा पक्ष मानला जातो. तसेच गरिबांचे कल्याण करण्यासाठी शासनाच्या पातळीवर विविध योजना राबवण्यावर पक्षाचा भर असतो. एन. टी. रामाराव यांनी सत्तेवर आल्याबरोबर तांदूळ प्रति किलो दोन रुपये भावाने विकण्याचा आदेश दिला होता. तसे आश्वासन त्यांनी निवडणुकीपूर्वी दिले होते. मात्र १९९० पासून या पक्षाने मुक्त अर्थव्यवस्था व आर्थिक उदारीकरणाला पाठिंबा दिला आहे.

४) राज्यपालांकडून संसदीय शासनपद्धतीच्या नियमांचे पालन व्हावे यासाठी संविधान विशोधन करणे.

५) देशाचे संघराज्य स्वरूप अधिक दृढ करणे. त्यासाठी केंद्र सरकारची चांगले संबंध ठेवने.

६) राज्यांना केंद्राकडून योग्य व पुरेशी मदत होण्यासाठी प्रयत्न करणे. केंद्र-राज्य आर्थिक संबंधात सुधारणा घडवून आणणे.

१९९५ साली एन. टी. रामाराव यांच्या निधनानंतर चंद्राबाबू नायडू यांनी तेलुगू देसम पक्षाची धुरा समर्थपणे सांभाळली आहे. इतर प्रादेशिक पक्षाप्रमाणे तेलगू देसम पक्षाचे नेतृत्व एक केंद्र आहे. पक्षाची सर्व सूत्रे चंद्राबाबू नायडू यांच्याकडे एकवटलेली आहेत.

munotes.in

## २) द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक-DMK)-तामिळनाडू

द्रविड मुनेत्र कळघम **(द्रमुक-DMK)** हा तामिळनाडू राज्यातील एक जुना व महत्त्वाचा प्रादेशिक पक्ष आहे. द्रविड वंश व संस्कृतीची स्वतंत्र ओळख हा या पक्षाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. तामिळनाडू राज्यात सध्या जे प्रभावी पक्ष आहेत त्या सर्व पक्षांनी 'द्रविड' हे नामनिधान वापरलेले दिसते. त्यामुळे तमिळ भाषा आणि द्रविड संस्कृती हा या प्रदेशाच्या राजकारणाचा महत्त्वाचा घटक आहे असे दिसते.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

ब्रिटिश भारतातील मद्रास प्रांतात साधारण पहिल्या महायुद्धाच्या काळात ई. व्ही. रामास्वामी नायर यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमान चळवळ (self respect movement) सुरु झाली होती. या चळवळीला 'द्रविड चळवळ' म्हणून ओळखले जात होते. या काळात स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारा कॉंग्रेस पक्ष हा उच्चजातीय व ब्राह्मणी हिंदू धर्म यांचा प्रभाव असलेला पक्ष आहे, अशी नायकर यांची धारणा होती. द्रविड चळवळ एक प्रकारे द्रविड लोकांच्या स्वाभिमानाची चळवळ होती. भारतीय राजकारणावर उत्तर भारतीय विशेषत: ब्राह्मणी संस्कृती, धर्म, भाषा यांच्या वर्चस्वाला तीव्र विरोध हा या चळवळीच्या माध्यमातून नायकर यांनी केला. दक्षिण भारतामध्ये द्रविड लोकांचा स्वतंत्र व सार्वभौम असा वेगळा देश निर्माण करण्याची मागणी त्यांनी केली होती. या देशाचे नाव 'द्रविडनाडू' असे असणार होते. द्रविडी लोकांचे हित व अस्मिता जपणारा पक्ष असावा यासाठी 'स्वाभिमान चळवळ' १९३८ आली जस्टीस पार्टीत विलीन करण्यात आली. पुढे १९४४ झाली जस्टीस पार्टी आणि स्वाभिमानी चळवळ यांचे एकत्रीकरण करून त्याचा 'द्रविड कळघम' ही बिन राजकीय संघटना स्थापन करण्यात आली. ई. व्ही. रामास्वामी नायकर हे या संघटनेचे सर्वेसर्वा होते. लोक त्यांना पेरियार (महान माणूस) म्हणून ओळखत असत. पेरियार हे प्रखर सुधारणावादी व बुद्धीवादी विचाराचे समाजसुधारक होत. ब्राह्मणी हिंदू धर्मग्रंथांची व त्यातून मांडल्या गेलेल्या हिंदू देवी, देवता व धर्म प्रतीकांची त्यांनी कठोर चिकित्सा केली. प्राचीन द्रविड संस्कृतीचे उदात्तीकरण करण्यासाठी व ब्राह्मणी हिंदू धर्मातील अंध रूढी, प्रथा, परंपरा या विरुद्ध प्रचार करण्यासाठी त्यांनी अनेक छोट्याा पुस्तिका व वृत्तपत्रांतून लिखाण केले. त्यांच्या या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी असंख्य अनुयायी त्यांच्या पाठीमागे तयार झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पेरियार यांनी अधिक आक्रमकपणे आपल्या संघटनेच्या ध्येयधोरणांचा प्रचार करण्याचे कार्य हाती घेतले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर द्रविड कळघम ने स्वतंत्र 'द्रविडनाडू' ची मागणी केली.

द्रविड कळघम ही बिगर राजकीय संघटना होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या संघटनेत राजकारणात उतरावे असे मत पेरियार यांचे सहकारी अण्णादुराई व इतरांचे म्हणणे होते. परंतु पेरियार यांनी नकार दिला. १९४९ साली अण्णादुराई द्रविड कळघम संघटनेतून बाहेर पडून आपल्या सहकाऱ्यांच्या सोबत द्रविड मुन्नेत्र कळघम (DMK) पक्षाची स्थापना केली. अल्पावधीतच हा पक्ष तामिळनाडूमध्ये लोकप्रिय झाला. १९५७ च्या निवडणुकीत या पक्षाने प्रथमच सहभाग घेतला. संसदीय राजकारणाच्या माध्यमातून आपल्या फुटीरतावादी मागणीची अभिव्यक्ती करता येईल हा त्यांचा हेतू होता. मात्र तमिळ जनतेने त्यांच्या या भूमिकेला फारसा पाठिंबा दिला नाही.

१९६७ पर्यंत मद्रास राज्यावर (नंतर त्याचे नाव तामिळनाडू झाले) कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. १९६७ घटक राज्यांच्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला जोरदार धक्का बसला. अर्ध्यापेक्षा अधिक घटक राज्यात गैरकॉंग्रेसी सरकार स्थापन झाली. यात तामिळनाडूतील द्रमुकचे सरकार होते. द्रमुकने स्वबळावर सत्ता स्थापन केली. तत्कालीन मद्रास विधानसभेच्या २३३ जागांपैकी १३८ जागा द्रमुकला मिळाल्या. सी. एन. अण्णादुराई हे पहिले गैरकॉंग्रेस अर्थात द्रमुक सरकारचे पहिले मुख्यमंत्री बनले १९६९ साली अण्णादुराई

यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर पक्षाचे नेतृत्व एम. करुणानिधी यांच्याकडे आले. १९६९ ते २०११ या काळात एम. करुणानिधी पाच वेळा मुख्यमंत्री बनले. ऑगस्ट २०१८ मध्ये एम. करुणानिधी यांचे निधन झाले. त्यांच्या निधनापर्यंत द्रमुकचे एकखांबी नेतृत्व आणि पक्षाचे सर्वेसर्वा एम. करुणानिधी होते. त्यांच्या निधनानंतर द्रमुक पक्षाला फुटीरतेचे ग्रहण लागले आहे. मात्र सध्या द्रमुक पक्ष तामिळनाडूमधील महत्त्वाचा प्रादेशिक पक्ष म्हणून आपले स्थान टिकवून आहे.

**द्रमुकचे विचारधारा व कार्यक्रम**

१) तामिळ भाषिकांची सुधारणा व प्रगती घडवून आणणे.

२) हिंदी भाषेच्या प्रकाराला विरोध करणे.

३) समाजवादी समाजव्यवस्था स्थापन करणे.

४) सामाजिक शोषण, अन्याय, जातीय शोषण यापासून समाजाची मुक्तता करणे.

५) राज्याची सत्ता आणि अधिकार बळकट करणे.

तमिळ भाषिक व द्रविड वंशी यांचा स्वतंत्र देशाची मागणी करण्याच्या हेतूने द्रमुख ची स्थापना झालेली होती. निवडणुकीच्या राजकारणात याच हेतूने या प्रादेशिक पक्षांनी भाग घेतला. परंतु काळाच्या ओघात अशी फुटीरतावादी दृष्टी या पक्षाची आता राहिलेली नाही. भारतीय संघराज्याचा घटक म्हणून तामिळनाडूला अधिकाधिक स्वायत्तता मिळावी, केंद्राचे वर्चस्व असू नये अशी भूमिका या पक्षाने घेतली आहे. राज्य तसेच केंद्रांमध्ये द्रमुक चा प्रभाव अजूनही कायम आहे.

**३) अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (अण्णा द्रमुक)**

**All India Anna Dravid Munnetrakalgham-(AIADMK)**

अण्णादुराई यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्षाकडे अनेक तमिळ कलावंत, अभिनेते, साहित्यिक आकृष्ट झाले. साठच्या दशकात तमिळ सिनेसृष्टीत अधिराज्य गाजवणारा सिनेअभिनेता एम. जी. रामचंद्रन ज्यांना एमजीआर म्हणून ओळखले जाते. त्यांनी १९५३ मध्ये द्रमुक पक्षात प्रवेश केला. लवकरच एमजीआर द्रमुक चा चेहरा बनले. एमजीआर आपल्या चित्रपटातून द्रमुक विचारधारा व प्रतीकांचा मोठ्याा खुबीने वापर करीत. यामुळे एमजीआर चे चाहते द्रमुकचे पाठीराखे झाले. आणि पक्षाचा जनाधार प्रचंड वाढला. मात्र पुढे जाऊन करुणानिधी आणि एम. जी. रामचंद्रन यांच्यात मतभेद निर्माण झाले. १९७२ साली रामचंद्रन यांची करुणानिधी यांनी द्रमुक पक्षातून हकालपट्टी केली.

द्रमुक पक्षातून बाहेर पडल्यानंतर लगेच रामचंद्रन यांनी नव्या पक्षाची स्थापना केली. या पक्षाचे नाव 'अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम' All India Anna Dravid Munnetrakalgham -(AIADMK) असे ठेवले. Admk पक्ष म्हणून हा रामचंद्र यांचा पक्ष लवकरच नावारूपास आला. १९७३ चा विधानसभेत ११ आमदार निवडून आणून हा पक्ष तामिळनाडूमध्ये तिसऱ्या क्रमांकाचा, आणि १९७६ च्या निवडणुकीत १६ आमदार निवडून आणून दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला. १९७६ साली द्रमुक पक्षाचे सरकार भ्रष्टाचाराच्या आरोपावरून केंद्र सरकारने बरखास्त केले. १९७७ च्या निवडणुकीत Admk ने १३२ जागा जिंकून आपले सरकार स्थापन केले. रामचंद्रन हे तामिळनाडूचे सातवे मुख्यमंत्री बनले. MGR चा AIADMK पक्ष १९७७, १९८० आणि १९८४ असा सातत्याने सत्तेत कायम राहिला.

एम. जी. रामचंद्रन यांचे १९८७ साली निधन झाले. MGR यांच्या निधनानंतर AIADMK पक्ष दोन गटात विभागला. MGR च्या पत्नी जानकी रामचंद्रन यांच्या नेतृत्वाखाली एक गट, दुसरा जे जयललिता यांच्या नेतृत्वाखाली आर. एम. वीरप्पन यांनी ९८ आमदाराच्या गटासह एमजीआर च्या पत्नी जानकी यांना पाठिंबा दिला. जानकी रामचंद्रन यांनी तामिळनाडूच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पण त्यांचे सरकार २४ दिवस चालले. १९९८ साली केंद्राने जानकी सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लावली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत बारा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर द्रमुख पुन्हा सत्तेत आला. AIADMK पक्ष दोन गटात विभागले यामुळे खूप दुबळा बनला. जयललिता या सिने अभिनेत्री होत्या. त्यांनी एम. जी. रामचंद्रन यांच्यासोबत अनेक चित्रपटात काम केले होते. त्यांचा AIADMK पक्षावर मोठा प्रभाव होता. मात्र निवडणुकीत जयललिता गटाला २७ आणि जानकी गटाला अवघ्या दोन जागा मिळाल्या होत्या.

अण्णाद्रमुकच्या घसरत्या आलेखामुळे पक्षातील दोन्ही गट जे. जयललिता यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. आणि १९९१ मध्ये काँग्रेस सोबत युती करून आपल्या पक्षाचे सरकार स्थापन केले. जयललिता मुख्यमंत्री बनल्या. १९९६ च्या निवडणुकीत काँग्रेस सोबत युती कायम राहिली. मात्र या निवडणुकीत पक्षाचा दारुण पराभव झाला. पक्षाला २३४ जागांपैकी केवळ चार जागा मिळाल्या. बारगूर मतदारसंघात स्वत: जयललिता पराभूत झाल्या.

१९९८ सालि जयललितांचा पक्ष भाजपाच्या NDA मधे सामील झाला. वायकोंचा MDMK पक्ष सुद्धा NDA चा घटक पक्ष होता. १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत AIADMK ला चांगले यश आले. हा पक्ष अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये सहभागी झाला. पण एक वर्षाच्या आत या पक्षाने आपला वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढून घेतला. वाजपेयी सरकार कोसळले. २००१ च्या विधानसभा निवडणुकीत AIADMK ने पुन्हा काँग्रेससोबत केली युती केली. या युतीत तमिळमनिला काँग्रेस आणि डावा पक्ष PMK हे पक्ष सुद्धा होते. AIADMK ला १३२ व युतीला १९७ जागा मिळाल्या. पण जयललितांचे नाव भ्रष्टाचारामध्ये अडकल्यामुळे त्यांना मुख्यमंत्री होता आले नाही. पनीर सिल्वम मुख्यमंत्री बनले. पण पुढे सर्वोच्च न्यायालयाने जयललिता यांच्या बाजूने निकाल दिला आणि पुन्हा २००२ मध्ये जयललिता मुख्यमंत्री बनल्या. पुढे २००६ विधानसभा निवडणुकीचा अपवाद वगळता दोन म्हणजे २०११ आणि २०१६ च्या निवडणुकीत AIADMK ने सत्ता स्थापन केली. राज्यातील विविध छोट्याा पक्षासोबत युती करून AIADMK चा जनाधार वाढला. ५ डिसेंबर २०१६ मध्ये जे. जयललिता यांचे निधन झाले. त्यांच्या जागी पान्नेसंलवम मुख्यमंत्री बनले. परंतु व्ही. के. शशिकला यांच्या विरोधामुळे त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला.

जे. जयललिता यांच्या निधनानंतर त्यांची जुनी मैत्रीण व्ही. के. शशिकला यांनी आपण जयललिता यांची वारस असल्याची घोषणा केली. त्यांना भ्रष्टाचार प्रकरणी चार वर्षाची शिक्षा झाली. तुरुंगात रवाना होण्यापूर्वी त्यांनी एडापडी के. पालनीस्वामी यांची विधानसभा पक्ष नेता म्हणून निवड केली. आणि टी. टी. व्ही. दिनकरन यांची डेप्युटी जनरल सेक्रेटरी म्हणून नियुक्ती केली. १२३ आमदारांच्या पाठिंब्यावर AIADMK चे एडापडी के. पालनीस्वामी मुख्यमंत्री बनले. २३ मार्च १९९७ रोजी भारतीय निवडणूक आयोगाने ओ. पान्नेरसेवलम व शशिकला यांच्या गटांना दोन निवडणूक चिन्ह दिल.े त्यामुळे सध्या AIADMK चे दोन गट पडले आहेत. एक ओ. पान्नेरसेवलम यांच्या नेतृत्वाखालील AIADMK (Puratchi Thalaivi) आणि एडापडी के. पालनीस्वामी गटाला AIADMK(Amma) असे दोन गट आहेत.

एकूण अण्णा द्रमुक पक्ष हा तामिळनाडू राज्यातील महत्त्वाचा व प्रभावशाली प्रादेशिक पक्ष आहे. ध्येय-धोरणे व विचारसरणीच्या बाबतीत हा पक्ष द्रमुक सारखाच दिसत असला तरी भाषिक व वांशिक बाबतीत थोडी उदार व लवचिक भूमिका हा पक्ष स्वीकारतो. गोरगरिबांसाठी या पक्षाने अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्यामुळे जनसामान्यांचा पाठिंबा या पक्षाला मिळालेला आहे. जयललिता यांच्या निधनानंतर नेतृत्वाची पोकळी हा पक्ष कसा भरून काढेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**<u>४) अकाली दल- पंजाब</u>**

पंजाब राज्यातील शिरोमणी अकाली दल हा भारतातील सर्वात जुना प्रादेशिक पक्ष आहे. शिखांचे राजकीय प्रतिनिधित्व करण्यासाठी शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीच्या द्वारे १४ डिसेंबर १९२० रोजी सरदार सरमुख सिंह श्रुब्बल यांच्या अध्यक्षतेखाली अकाली दल या पक्षाची स्थापना करण्यात आली. पुढे मास्टर तारासिंह यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाचा विस्तार झाला.

ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या संप्रदायवादाच्या कुटील राजकारणाने या पक्षाची बीजे रोवली गेली. पंजाब प्रांतात सरदार उज्वलसिंह मजीठिया यांच्या नेतृत्वात पंजाब सुभा आंदोलन सुरू झाले होते. शिखांसाठी वेगळ्या पंजाब प्रांताची मागणी त्यावेळी करण्यात आली. शीख धर्म हा मुस्लिम, हिंदू धर्माप्रमाणे स्वतंत्र धर्म आहे. त्यामुळे शिखांना मुस्लिमां प्रमाणे स्वतंत्र मतदार संघ देण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली. त्यासाठी अकाली दलाकडून पहिल्या महायुद्धात शिखांच्या सैन्य भरतीसाठी प्रयत्न करण्यात आले. याचे फळ म्हणून इंग्रजांनी १९१९ च्या भारत सरकार कायद्यामध्ये शिखांना स्वतंत्र मतदार संघ मान्य करण्यात आले.

अकाली दल या पक्षाची स्थापना करण्यामागचा मुख्य उद्देश शीख लोकांचे वेगळेपण जतन करण्यासाठी आणि शिख समुदायासाठी वेगळ्या राज्याची निर्मिती करणे यासाठी झाली होती. मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीची मागणी केल्यानंतर मास्तर तारासिंगच्या अकाली दलाने स्वतंत्र शिखस्थानच्या निर्मितीची मागणी केली. ब्रिटिश काळात पंजाब प्रांतात शिख, मुस्लिम, हिंदू हे धर्मावलंबी परस्परांबद्दल सहिष्णुता बाळगून एकोप्याने राहत होते. मुस्लिमांची स्वतंत्र पाकिस्तानची मागणी, त्यात शिखांकडून स्वतंत्र शीखस्थानाची मागणी यामुळे पंजाब मधील सांस्कृतिक सहजीवनाची परंपरा खंडित झाली. यामुळे पंजाब ५०-६० वर्षे हिंसाचाराने धुमसत राहिला.

भारत-पाक फाळणी नंतर पंजाब मध्ये काँग्रेस आणि अकाली दल हे दोन पक्ष आमने-सामने आले. फाळणीमुळे पाकिस्तानातील शिख समुदाय पंजाबमध्ये स्थलांतरित झाला. त्यामुळे अकाली दलाचे जनाधार वाढला. भाषावार प्रांतरचनेच्या आधारावर शीखांसाठी पंजाब राज्याची मागणी अकाली दलाने केली. दीर्घ प्रतीक्षेनंतर १९६६ मध्ये हिंदी भाषिकांचे हरियाणा व पंजाबी भाषिकांसाठी पंजाब अशा दोन घटक राज्याची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे पंजाब राज्यात अकाली दलाचा जनाधार वाढला. परंतु पक्षांतर्गत गटबाजी मुळे त्याचा राजकीय लाभ अकाली दलाला घेता आला नाही. मास्टर तारासिंग आणि फत्तेसिंग यांच्यात सत्तेसाठी रस्सीखेच सुरु झाली. मास्टर तारासिंग यांच्या निधनानंतर फत्तेसिंग अकाली दलाचे प्रमुख बनले. १९६९ साली मध्यवर्ती निवडणुकांनंतर अकाली दल व जनसंघ यांचे संयुक्त सरकार स्थापन झाले. जून १९७१ साली केंद्राने राष्ट्रपती राजवट लागू करून संयुक्त सरकार बरखास्त केले. १९७२ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. १९७२ ते १९७७ या काळात झैलसिंग सरकारने अकाली दलाचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. १९७७ मध्ये आणीबाणी हटल्यानंतर अकाली दल पुन्हा सत्तेत आला. परंतु पक्षांतर्गत कलहामुळे पक्षात फूट पडून १९८० साली अकाली दल पुन्हा सत्तेबाहेर फेकला गेला.

munotes.in

खलिस्तानवादी दहशतवादी चळवळीमुळे पंजाब ऐंशीच्या दशकात धुमसत होता. विसाव्या शतकाच्या अखेर पंजाब मधील परिस्थिती निवळायला लागली. अकाली दलाने आपला जुना सहयोगी भाजप सोबत युती केली. २०१२ साली भाजपच्या सहयोगाने अकाली दलाने सरकार स्थापन केले. पक्षाचे पूर्व अध्यक्ष प्रकाशसिंग बादल हे मुख्यमंत्री बनले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला चार जागा मिळाल्या. सध्या अकाली दल भाजपाच्या नेतृत्वाखालील NDA घटक पक्ष आहे. पंजाबमधील प्रभावी प्रादेशिक पक्ष म्हणून अकाली दलाचे स्थान कायम आहे.

## ५) शिवसेना- महाराष्ट्र

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात संयुक्त महाराष्ट्र समितीने मराठी अस्मिता, मराठ्यांचा इतिहास आणि शिवाजी महाराजांची प्रतिमा यांचा जनजागृतीसाठी मोठ्याा खुबीने वापर केला. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीचा कार्यभाग संपला. पण समितीने उभे केलेल्या मराठी अस्मिता व शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा वापर बाळासाहेब ठाकरे यांनी ऑगस्ट १९६० मध्ये 'मार्मिक' या साप्ताहिकाची सुरुवात करून अचूकपणे केला. १९६१ मध्ये जनगणनेतून पुढे आलेल्या आकडेवारीनुसार मुंबईतील मराठी माणसांचा टक्का कमी झाला आहे हे दिसत होते. याउलट दक्षिनात्यांचा व उत्तर भारतीयांचा टक्का वाढत आहे. परप्रांतियांचा टक्का वाढण्याबरोबरच त्यांची गुंडागर्दी, शिरजोरी व अवैध धंदे देखील वाढत आहेत. याविरोधात मराठी माणसाचा कैवार घेऊन बाळासाहेब ठाकरे यांनी मार्मिक साप्ताहिकातून आवाज उठविला. त्याला मराठी माणसाचा मोठा प्रतिसाद मिळाला. मराठी माणसाच्या बळावर मराठी माणसाच्या हितरक्षणासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी 'शिवसेना' या संघटनेची स्थापना केली. सुरुवातीला शिवसेनेचा रोख दक्षिणात्यांच्या विरुद्ध राहिला. 'हटाव लुंगी, बजाव पुंगी' अशी घोषणा देऊन दक्षिणात्यांच्या हॉटेल्स व मालमत्तांना लक्ष्य करण्यात आले. नंतर हा रोख उत्तर भारतीयांच्या विरुद्ध ओढवला. अशाप्रकारे शिवसेनेच्या माध्यमातून मराठी अस्मिता व अस्तित्वासाठी संघटना 'राडा' शैलीने कार्य करू लागली.

सुरुवातीच्या काळात 'मराठी माणसांचे हितसंरक्षण' एवढे शिवसेनेचे माफक ध्येय होते. 'शिवसेना ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करेल' अशी ठाकरेंनी घोषणा दिली होती. बेकारीने हैराण झालेल्या आणि परप्रांतीयांच्या दादागिरीने त्रस्त झालेल्या मराठी तरुणांना शिवसेनेने आकृष्ट केले. त्यानंतर शिवसेनेने आपले लक्ष कामगार चळवळीकडे वळविले. मुंबईत मराठी कामगारवर्ग सांम्यवादी प्रभावाखालील कामगार चळवळीत मोठ्याा संख्येने होता. त्यामुळे स्वाभाविकच शिवसेनेने संवाद विरोधी पवित्रा घेऊन १९६८ झाली भारतीय कामगार सेना स्थापन केली. १९६८ ते १९७४ या काळात मुंबईतील कामगार चळवळ फोडण्याचे कार्य शिवसेनेने पार पडले.

शिवसेनेने स्थापनेनंतर वर्षभरातच निवडणुकीच्या राजकारणात भाग घेतला. परंतु हा सहभाग मुंबई-ठाणे या शहरापुरता मर्यादित होता. १९८० च्या दशकात आपली 'प्रादेशिक पक्ष' ही प्रतिमा टाकून देऊन हिंदुत्ववादी पक्षाची भूमिका शिवसेनेने स्वीकारली. मुस्लिम व दलित या दोन समाजाच्या विरोधात शिवसेना उभी राहिली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराला विरोध करणारा शिवसेना हा एकमेव पक्ष होता. याच काळात रामजन्मभूमी प्रश्न उपस्थित झाला. बाबरी मज्जिद पाडून राम मंदिर बांधण्याचे जाहीर समर्थन शिवसेनेने केले. अशाप्रकारे मुस्लीम व नवबौध्द यांच्याविरोधात घेतलेल्या भूमिकेमुळे मराठवाड्यातील मराठा व अन्य मागासवर्गीय समाज तसेच बौद्धेतर दलित समाजाचा पाठिंबा शिवसेनेला मिळाला आणि हिंदुत्ववादी भूमिकेमुळे मध्यमवर्गीय हिंदू शिवसेनेकडे आकर्षित झाले.

munotes.in

१९८९ शिवसेनेने भाजपशी युती केली. भाजपाने उपस्थित केलेल्या रामजन्मभूमीच्या प्रश्नाला तसेच हिंदुत्ववादी राजकारणाला शिवसेनेने पाठिंबा दिला. त्यानंतर बाळासाहेब ठाकरे 'मराठी मनाचा मानबिंदू' व त्यानंतर 'हिंदुहृदयसम्राट' झाले. 'गर्व से कहो हम हिंदू है' असा नारा त्यांनी दिला. देशात सर्वत्र जमातवादी राजकारणाचा ज्वर चढला होता. याबद्दल त्या प्रतिमेचा शिवसेनेला निवडणुकीत फायदा झाला. १९९० च्या निवडणुकीत विधानसभेत शिवसेनेला ५२ जागा आणि भाजपाला ४२ जागा मिळाल्या. परंतु सत्ता मिळू शकली नाही. मात्र पुढील १९९५च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला ७६ तर भाजपाला ६३ जागा मिळाल्या. बंडखोर काँग्रेस आमदार व पक्षांच्या मदतीने सेना-भाजपचे युतीचे सरकार सत्तेवर आले. शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. मात्र पुढील निवडणुकीत शिवसेनेला सत्ता राखता आली नाही.

१९८९ पासून असलेली सेना-भाजप युती २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत कायम होती. भाजपच्या एनडीएमध्ये शिवसेना हा महत्त्वाचा घटक पक्ष होता. लोकसभेसाठी भाजपला शिवसेनेने जास्त जागा सोडायच्या व विधानसभेसाठी शिवसेनेने जास्त जागा लढवायच्या या सूत्रानुसार दोन पक्षांचे जागावाटप होते. भाजप हा राष्ट्रीय पक्ष असला तरी तो शिवसेनेला महाराष्ट्रात मोठा भाऊ या नात्याने मानत होता. त्यामुळे मुख्यमंत्री पद व सत्ता नसल्यास विरोधी पक्षनेतेपद शिवसेनेकडे कायम राहिले. परंतु ही परिस्थिती २०१४ च्या निवडणुकीनंतर बददली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर मोदींच्या नेतृत्वात भाजपचा जनाधार भारतात तसेच महाराष्ट्रातही वाढला. त्यामुळे पूर्वापार सूत्रानुसार जागा वाटप करण्यास भाजपने नकार दिला. त्यामुळे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत २५ वर्षापासूनची सेना-भाजपा युती तुटली. आणि दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. या निवडणुकीत भाजपच्या शिवसेनेपेक्षा जास्त जागा निवडून आल्या. भाजपला १२२ आणि शिवसेनेला ६३ जागा मिळाल्या. परंतु २८८ संख्येच्या विधानसभेत भाजपा स्वबळावर सत्ता स्थापन करू शकत नव्हती. त्यामुळे सरकार बनवण्यासाठी दोन्ही पक्ष पुन्हा एकत्र आले. मात्र यावेळी मुख्यमंत्री भाजपचे देवेंद्र फडणवीस बनले. सरकार बनविण्यासाठी दोन्ही पक्ष एकत्र आलेले दिसत असले तरी यानंतर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तसेच पोटनिवडणुकीत हे दोन्ही पक्ष परस्पर विरोधात लढले.

१८ नोव्हेंबर २०१२ मध्ये शिवसेना प्रमुख आणि पक्षाचे सर्वेसर्वा बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनापूर्वी त्यांचे पुत्र उद्धव ठाकरे हे शिवसेनाप्रमुख बनलेले होते. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात शिवसेना वाटचाल करीत आहे.

**<u>नॅशनल कॉन्ुरन्स (National conference)</u>**

नॅशनल कॉन्फरन्स जम्मू आणि काश्मीर राज्यातील सर्वात जुना आणि सर्वाधिक काळ सत्ता उपभोगलेला प्रादेशिक पक्ष आहे. १९३२ साली काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांच्याविरुद्ध वाढत चाललेल्या विरोधाला संघटित रुप देण्याच्या दृष्टीने 'ऑल जम्मू कश्मीर मुस्लिम कॉन्फरन्स' ची स्थापना करण्यात आली. त्याच्या नेत्यांमध्ये शेख अब्दुल्ला आणि ॲड गुलाम अब्बास यांचा समावेश होता. त्यानंतर सहा वर्षांनी १९३९ आली शेख अब्दुल्लांनी या पक्षाचे नाव बदलून 'जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स' असे ठेवले. भारतीय राजकारणात या पक्षाला 'नॅशनल कॉन्फरन्स' या नावाने ओळखले जाते. शेख अब्दुल्ला यांचा धर्मनिरपेक्ष तत्त्वावर विश्वास होता. आपला पक्ष सर्वसमावेशक असावा अशी त्यांची भूमिका होती.

जम्मू आणि कश्मीर भारताकडे असावे की पाकिस्तान कडे असा मोठा अटीतटीचा प्रश्न त्याकाळात उपस्थित झाला असताना शेख अब्दुल्लांच्या नॅशनल कॉन्फरन्सने भारताची बाजू घेतली. कश्मीर भारतात सामील

munotes.in

होण्यास या पक्षाने पाठिंबा दिला. परंतु पक्षातील गुलाम अब्बास गटाला अब्दुला यांचीही भूमिका रुचली नाही. या गटाने पक्षातून बाहेर पडून आपला पाठिंबा काश्मीर ने पाकिस्तानात सामील व्हावे अशी भूमिका घेतली. यासाठी त्यांनी आपली जुनी संघटना 'मुस्लिम कॉन्फरन्स' हा पक्ष स्थापन केला आणि आझाद कश्मीर चळवळ सुरू केली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर काश्मीर मध्ये १९५१ साली विधानसभा निवडणूक झाली. नॅशनल कॉन्फरन्सने सर्व ७५ जागा जिंकल्या शेख अब्दुल्ला पंतप्रधान (मुख्यमंत्री) बनले. १९५९ मध्ये नॅशनल कॉन्फरन्स चे दोन गट पडले शेख अब्दुल्ला यांचा गट भारताच्या बाजूने तर त्यांचे सहकारी मिर्झा अफजल बेग स्वतंत्र काश्मीर गटाचे. शेखांवर गटबाजी व भ्रष्टाचाराचा आरोप पार्टीच्या नेत्यांनी लावला. तसे पत्र राजा करणसिंग यांना देण्यात आले. करणसिंगांनी शेख ना बडतर्फ करून स्थानबद्ध केले आणि त्यांचे दुसरे सहकारी बक्षी गुलाम महंमद यांना पंतप्रधान करण्यात आले.

१९६५ मध्ये कश्मीरमध्ये राजकारणाला कलाटणी देणारी एक नाट्यमय घटना घडून आली. नॅशनल कॉन्फरन्स पक्ष काँग्रेस पक्षात विलीन करण्यात आला, हा पक्ष काँग्रेसची एक शाखा म्हणून कार्य करू लागला. जानेवारी १९५८ मध्ये शेख अब्दुल्लांना अचानक सोडण्यात आले. आणि पुन्हा एप्रिल १९५८ मध्ये त्यांना अटक करण्यात आली. या वेळी त्यांच्यावर भारताचे तुकडे करण्यासाठी पाकिस्तान बरोबर कटकारस्थान करण्याचा आरोप करण्यात आला होता. हे आरोप बिनबुडाचे होते. त्यांना कधीही पाकिस्तानात जायचे नव्हते. अब्दुल्ला धार्मिकता व धार्मिक सहिष्णुतेचे मूर्तिमंत प्रतीक होते.

१९७५ साली शेख अब्दुल्लांना राजकारणात सक्रिय होण्याची परवानगी भारत सरकारने दिली. शेख यांनी पुन्हा आपला जुना पक्ष नॅशनल कॉन्फरन्स सक्रिय केला. १९७७ च्या निवडणुकीत या पक्षाला बहुमत मिळाले. शेख मुख्यमंत्री झाले. ८ सप्टेंबर १९८२ रोजी शेख अब्दुल्ला यांच्या निधनानंतर नॅशनल कॉन्फरन्सचे नेतृत्व त्यांचा मुलगा फारूक अब्दुल्ला यांच्याकडे गेले. १९८३, १९८७, १९९१ या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्सने बहुमताने आपले सरकार स्थापन केले. परंतु प्रत्येक वेळी सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. काश्मीरमधील अशांतता, हिंसाचार, दहशतवादी कारवाया यामुळे येथे राष्ट्रपती राजवट लावण्यात आली. २००२ मध्ये फारुक अब्दुल्लांनी नॅशनल कॉन्फरन्स चे नेतृत्व आपला मुलगा ओमर अब्दुल्ला यांच्याकडे सोपविले. २००८ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या सहयोगाने ओमर अब्दुल्लांनी नॅशनल कॉन्फरन्सचे सरकार बनवले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत काँग्रेस सोबतची त्यांची युती टिकली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ही युती तुटली. या निवडणुकीत काश्मीर मधील दुसरा प्रादेशिक पक्ष PDP प्रभावशाली ठरला. PDP ने २८ जागा जिंकून भाजपच्या मदतीने सरकार स्थापन केले. २०१८ साली भाजपने PDP सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे तेथे राष्ट्रपती राजवट लागू झाली.

थोडक्यात PDP च्या विस्तारानंतर नॅशनल कॉन्फरन्सचा प्रभाव कमी झालेला दिसत असला तरी इतिहासाच्या विविध वळनावर अनेक संकटांचा सामना करून आजही जम्मू आणि कश्मीर च्या राजकारणात हा पक्ष मजबुतीने टिकून आहे.

## २.३ १९८९ नंतरच्या निवडणुकीतील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या कामगिरीचे विश्लेषण (Analysis of electoral Performance of National and Regional Partiessince 1989)

भारताच्या निवडणुकीच्या इतिहासात १९८९ हे वर्ष भारतातील पक्षपद्धती व राजकारणाला वेगळ्या दिशेने घेऊन जाणारे वर्ष मानले जाते. कारण १९८९ पासून केंद्रांमध्ये आघाड्यांचे सरकार सातत्याने सत्तेवर आलेले दिसते. तसेच अनेक घटक राज्यांमध्येसुद्धा एकापेक्षा अधिक पक्ष निवडणुकीपूर्वी किंवा निवडणुकीनंतर आघाडी, युती बांधून सत्तेवर आलेली दिसतात. १९८९ नंतर २०१४ मध्ये भाजपा बहुमत मिळवण्यात यशस्वी ठरलेली दिसत असली तरी, सरकार मात्र आघाडीचेच बनलेले आहे. त्यामुळे १९८९ पासून आतापर्यंत (२०१८) देशात आघाड्यांचे राजकारण स्थिरावलेले दिसते. त्यामुळेच १९८९ नंतरच्या निवडणुकीतील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या कामगिरीचे विश्लेषण करणे हे, भारतातील पक्षपद्धती चे बदलते स्वरूप आणि राजकारणाचे बदलते रंग अभ्यासण्यासाठी औचित्यपूर्ण ठरते.

### १) <u>१९८९ ची निवडणूक</u>

**अ) <u>पार्श्वभूमी:-</u>** १९८४ श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. राजीव गांधीच्या सरकारला प्रचंड मताधिक्य असतानासुद्धा काँग्रेसला अंतर्गत मतभेदाने ग्रासले. राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात वित्तमंत्री असलेल्या विश्वनाथ प्रतापसिंग यांनी बोफोर्स प्रकरणात आपल्याच पक्षाला अडचणीत ठरणारी वक्तव्य केले. त्यामुळे व्ही. पी. सिंग यांची प्रतिष्ठा व लोकप्रियता प्रधानमंत्र्यापेक्षा उंचावली. व्ही. पी. सिंग यांनी मंत्रिमंडळ व काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी जनमोर्चाची स्थापना केली. त्यांच्या या भूमिकेला विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. आणि यातून ११ ऑक्टोबर १९८९ रोजी 'जनता दल' या नव्या पक्षाचा जन्म झाला. या नव्या पक्षात जनमोर्चा, जनता पक्ष, लोकदल या पक्षांचे विसर्जन करण्यात आले. नव्याने स्थापन झालेल्या जनता दलाने १९८९च्या निवडणुकीत भाग घेतला आणि राजकारणाची समीकरणे यामुळे बदलली.

**ब) <u>त्रिशंकु लोकसभा:-</u>** १९८९ च्या निवडणुकीत लोकसभेत पहिल्यांदा त्रिशंकू समीकरण घडून आले. १९८४ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने लोकसभेमध्ये ५४२ जागांपैकी ४१५ जागा जिंकून अभूतपूर्व यश संपादन केले होते, तोच पक्ष १९८९ केवळ १९३ जागा मिळवून सत्ताभ्रष्ट झाला. परंतु या निवडणुकीत नव्याने स्थापन झालेल्या जनता दल याला १४१, तर हिंदुत्वाच्या लाटेवर स्वार झालेला भाजप याला ८८ जागा, माकपला ३२, भाकपला १२ जागा मिळाल्या. कोणत्याही पक्षाला सरकार बनवण्यासाठी लागणाऱ्या बहुमतापर्यंत पोहोचता आलेले नाही.

**क) <u>व्ही. पी. सिंग सरकार:-</u>** एक वर्षापूर्वी स्थापन झालेल्या जनता दलाने १९८९ च्या निवडणुकीत चमकदार कामगिरी करून, काँग्रेस पक्षाला सत्तेपासून दूर ठेवले. १४१ जागा जिंकून काँग्रेस नंतर दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. मात्र जनता दलाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मोर्चाला (आघाडी) बहुमत प्राप्त करता आले नाही. भाजपा व डावे यांच्या पाठिंब्याने २ डिसेंबर १९८९ रोजी व्ही. पी. सिंग यांच्या राष्ट्रीय मोर्चाचे सरकार सत्तेवर आले.

**ड) <u>मंडल आयोगाची अंमलबजावणी:-</u>** मंडल आयोगाची अंमलबजावणी या एका निर्णयाने व्ही. पी. सिंग सरकारचे नाव भारताच्या इतिहासात ठळक अक्षरात कोरले गेले. १९७८ साली जनता सरकारने बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली होती. मंडल आयोगाने ओबीसी

munotes.in

जातींचे निकष, त्यांची यादी आणि शिक्षण व नोकऱ्यांतील आरक्षणाचे प्रमाण यासंबंधी शिफारसी केल्या. जनता पक्षाचे सरकार मुदतीपूर्वीच बरखास्त झाल्यामुळे त्यांना मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करता आली नाही. व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशींचा अंमलबजावणीला प्राधान्य दिले. १३ ऑगस्ट १९९० रोजी व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची अधिसूचना काढली.

इ) **भाजपाचे रामजन्मभूमी आंदोलन आणि रथयात्रेचे राजकारण:–** १९८९ च्या निवडणुकीत भाजपा इतिहासातील नव्या वळणावर आला. वादग्रस्त बाबरी मशीदच्या जागेवर राम मंदिर उभारण्यासाठी सुरू झालेल्या हिंदुत्ववाद्यांच्या रामजन्मभूमी आंदोलनाचे भाजपाने नेतृत्व केले. या आंदोलनाने तणावपूर्ण व जमातवादी राजकारणाला दिशा मिळाली. १९८९च्या निकालावरून हे लक्षात येते की, या आंदोलनाचा फायदा भाजपला झाला. १९८९ च्या निवडणुकीत भाजपा देशातील तिसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष ठरला. १९८४ साली त्याला मिळालेल्या मतांची टक्केवारी ७.४ एवढीच होती. १९८९ मध्ये ही ११.४ पर्यंत वाढली. लोकसभेत भाजपाला ८९ जागा मिळाल्या. रामशीला पूजेचा मार्ग, नंतरच्या सप्टेंबर-ऑक्टोबर १९८९च्या जमातवादी दंगली आणि भाजपने जिंकलेल्या जागा यांच्यात संबंध अगदी स्पष्ट होतो.

सप्टेंबर १९९० मध्ये अडवाणींनी गुजरातेतील सोमनाथ मंदिरापासून रथयात्रा सुरू केली आणि दहा हजार किलोमीटर पश्चिम व उत्तर भारतात प्रवास करून ती अयोध्येला यायची होती. ऑक्टोबर अखेर अडवानींच्या रथयात्रेला बिहारमधील जनता दल पक्षाचे लालूप्रसाद यादव सरकारने रथयात्रा अडवून अडवाणींना अटक केली. 'मंडल-कमंडल' वादाने संपूर्ण भारतातील राजकारण ढवळून निघाले. हिंदुत्वाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न संघपरिवाराने केला. येथून पुढील राजकारणात 'राममंदिर' हा मुद्दा केंद्रस्थानी राहिला.

ई) **चंद्रशेखर सरकार:–** भाजपाचा मंडल आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीला विरोध होता. त्यात जनता दलाचे रथयात्रेच्या विरुद्ध भूमिका घेतल्याने व्ही. पी. सिंग सरकारला बाहेरून दिलेला पाठिंबा भाजपाने काढून घेतला. त्यामुळे संयुक्त जनता दलाचे सरकार कोसळले. याच वेळी संयुक्त मोर्चात सुद्धा फूट पडली. चंद्रशेखर ६४ खासदारांना सोबत घेऊन जनता दलातून बाहेर पडले. चंद्रशेखर व देवीलाल यांनी आपला नवा 'समाजवादी जनता पक्ष' स्थापन केला. काँग्रेसचा बाहेरून पाठिंबा मिळवून १९९० मध्ये ते भारताचे आठवे प्रधानमंत्री बनले. त्यांच्या सरकारवर राजीव गांधी यांची हेरगिरी करत असल्याचा आरोप झाल्यानंतर ६ मार्च १९९१ रोजी त्यांनी प्रधानमंत्री पदाचा राजीनामा दिला.

नवव्या लोकसभेमध्ये दोन पंतप्रधान झाले. मात्र सत्ताधारी पक्षाला पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही.

## २) १९९१ ची निवडणूक

### पार्श्वभूमी:–

हिंदुत्वाच्या लाटेवर स्वार होऊन निवडणुकीत यशस्वी होता येते, याची जाणीव भाजपला १९८९ च्या निवडणुकीत झाली होती. त्यामुळे १९९१ च्या निवडणुकीत भाजपाने हिंदुत्व हाच आपला प्रचाराचा मुख्य मुद्दा बनविला. निवडणुकीत सर्वत्र जमातवादी प्रचाराला उत आला असताना दुसऱ्या टप्प्यातील मतदानाच्या काळात राजीव गांधी तामिळनाडू येथे प्रचार सभा घेत असताना, त्यांची हत्या झाली. निवडणूका एक महिना

पुढे ढकलल्या गेल्या. राजीव गांधीची हत्या झाल्यानंतर मोठ्याा प्रमाणात सहानुभूतीची लाट कॉंग्रेस कडे वळली. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील मतदानात काँग्रेसला फायदा झाला. काँग्रेस पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला.

अ) <u>काँग्रेस पक्षाची कामगिरी</u> :-राजीव गांधींच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेमुळे निवडणूक झालेल्या ५३४ जागांपैकी २४४ जागांवर विजय मिळवत काँग्रेस पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला. मात्र बहुमताचा २७३ चा आकडा गाठता आला नाही. डाव्या पक्षाच्या मदतीने पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले.

ब) <u>भाजपाची कामगिरी:-</u> १९८९ च्या निवडणुकीत ८४ जागा जिंकणाऱ्या भाजपला या निवडणुकीत १२० जागा मिळाल्या. लालकृष्ण अडवाणी विरोधी पक्षनेते झाले. मात्र बाबरी मशीद प्रकरण व हवाला प्रकरणात त्यांच्यावर आरोप असल्यामुळे त्यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला. आणि त्यांच्या जागी अटल बिहारी वाजपेयी विरोधी पक्षनेते झाले. राष्ट्रीय राजकारणात भाजपचा हा तोपर्यंतचा सर्वात मोठा विजय होता. भाजपचे मताचे प्रमाण १९८९ च्या निवडणुकीत ११.४ होते ते १९९१ मध्ये ते २०. ४ टक्के झाले.

क) <u>जनता दलाची कामगिरी:-</u> १९८९ च्या निवडणुकीत आकर्षणाचे केंद्रबिंदू असलेल्या व्ही. पी. सिंग यांच्या जनता दलाच्या त्यांच्या आधीच्या लौकिकास साजेशी कामगिरी करता आली नाही. या निवडणुकीत जनता दलाला ५९ जागा मिळाल्या. ऑगस्ट १९९२ मध्ये अजितसिंह यांच्या नेतृत्वाखाली २० खासदारांनी जनता पक्ष सोडला. २१ जून १९९४ रोजी लोकसभेच्या १४ खासदारांनी पक्षा बाहेर पडून जॉर्ज फर्नांडिस व नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली समता पक्ष स्थापन केला. जनता पक्षातील या फाटाफुटीमुळे १० व्या लोकसभेत जनता दलाची शक्ती खूप क्षीण झाली.

नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारने १९९१ साली भारताचे नवे आर्थिक धोरण जाहीर करून, आर्थिक उदारीकरणाला सुरुवात केली. नेहरू काळापासून सुरू असलेल्या समाजवादी धोरणाला फाटा देऊन अर्थमंत्री मनमोहन सिंह यांच्या सहकार्याने दूरगामी परिणाम पाडणाऱ्या जागतिकीकरणाचे धोरण राबविण्याचा निर्णय राव सरकारने घेतला.

१९९१ च्या निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्ष आणि त्यांना मिळालेल्या जागा व टक्केवारी.

| राजकीय पक्ष | जागा | टक्केवारी |
|---|---|---|
| १. काँग्रेस | २४४ | ३५.६६ |
| २. भाजप | १२० | २०.४ |
| ३. जनता दल | ५९ | ११.७७ |
| ४. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | ३५ | १६.१४ |
| ५. भारतीय कम्युनिस्ट पक्ष | १४ | २.४८ |
| ६. तेलगू देसम | १३ | २.९६ |
| 7- अण्णा डिएमके | ११ | १.६१ |

## ३) <u>१९९६ ची निवडणूक:-</u>

<u>पार्श्वभूमी:-</u>

नरसिंहराव यांच्या सरकारवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे काँग्रेस पक्ष १९९६ च्या निवडणुकीत दुसऱ्या स्थानावर फेकला गेला. १९९६ निवडणुकीपूर्वी भाजपाने आपल्या पूर्वापार रणनितीनुसार राममंदिर



munotes.in

मुद्याच्या आधारावर आपल्या हिंदुत्ववादी विचाराचा प्रचार चालू ठेवला. ६ डिसेंबर १९९२ रोजी २ लाख कारसेवक अयोध्येला जमले, आणि त्यांनी बाबरी मशीद जमीनदोस्त केली. उत्तर प्रदेश भाजपच्या कल्याणसिंह सरकारने राजीनामा दिला. अडवाणींनी लोकसभेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला. आठवड्याभराच्या आत मध्य प्रदेश हिमाचल प्रदेश, राजस्थान राज्यातील भाजपची सरकारे केंद्राने बरखास्त केली. काँग्रेस सरकारची ही कृत्य भाजपच्या पथ्यावर पडली. बाबरीच्या पतनातून उसळलेली हिंदुत्वाची लाट, भाजपचे राजकीय भवितव्य उज्वल करण्यास उपयुक्त ठरली.

अ) <u>भाजपाचे १३ दिवसाचे सरकार :-</u> राजीव गांधींच्या निधनानंतर आलेली सहानुभूतीची लाट ओसरल्यानंतर राम मंदिर आणि हिंदुत्वाची लाट निर्माण करण्यात भाजपा यशस्वी ठरला. जमातवादी राजकारण या निवडणुकीत प्रभावी ठरले. भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. त्याला १६१ जागा मिळाल्या. तत्कालीन राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांनी वाजपेयी यांना सरकार स्थापन करण्याचे निमंत्रण दिले. भाजपने आपले पहिले केंद्रातील सरकार बनविले. परंतु बहुमत सिद्ध करण्यासाठी आवश्यक संख्याबळ भाजपला जुळवता आले नाही. सभागृहात बहुमत सिद्ध करता येणार नसल्याने वाजपेयींनी राजीनामा दिला. वाजपेयींचे सरकार तेरा दिवस टिकले, म्हणून तेरा दिवसाची सरकार म्हणून वाजपेयी यांच्या सरकारचा उल्लेख केला जातो.

ब) <u>काँग्रेसची कामगिरी:-</u> काँग्रेस पक्षाची सर्वात खराब कामगिरी या निवडणुकीत नोंदवली गेली. काँग्रेसला केवळ १४० जागा मिळाल्या. मात्र मतांची टक्केवारी भाजप २०. २९ टक्के पेक्षा काँग्रेसची २८. ८० टक्के जास्त होती. निवडणुकीच्या बारा महिने आधी राव सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले. निवडणुकीच्या काही महिने आधी हवाला प्रकरणात राजकीय नेत्यांनी लाच स्वीकारल्याचे उघड झाले. यात राव सरकारमधील तीन कॅबिनेट मंत्री आणि राजीव गांधी यांचे नाव पुढे आले. त्यामुळे राव सरकारची विश्वासार्हता ढासळली होती. याचा फटका काँग्रेसला बसलेला दिसतो.

क) <u>युनायटेड फ्रंट:- (संयुक्त आघाडी):-</u>

१९९६ च्या निवडणुकीत जनता दल, समाजवादी पक्ष आणि तेलगू देसम पक्षाने मिळून राष्ट्रीय आघाडी निर्माण केली होती. या राष्ट्रीय आघाडीत डावी आघाडी, तमिळमनिला काँग्रेस, प्रमुख आसाम गण परिषद इत्यादी पक्ष सामील करून संयुक्त आघाडी स्थापन करण्यात आली. भाजपचे तेरा दिवसाची सरकार कोसळल्यानंतर या संयुक्त आघाडीला सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली. जनता दलाचे कर्नाटकचे मुख्यमंत्री एच. डी. देवेगोडा यांना प्रधानमंत्री पद देण्यात आले. काँग्रेसने बाहेरून पाठिंबा दिला. देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त आघाडीचे सरकार अठरा महिने टिकले. एप्रिल १९९७ मध्ये काँग्रेसने पाठिंबा काढून घेतला. मात्र निवडणुका टाळण्यासाठी संयुक्त आघाडीला पाठिंबा दिला. यावेळी आय. के. गुजराल हे २१ एप्रिल १९९७ रोजी पंतप्रधान झाले. दरम्यानच्या काळात जनता दलात आणखी एक फूट पडली. सतरा खासदारांना सोबत घेऊन लालूप्रसाद यादव यांना ३ जुलै १९९७ रोजी जनता दलातून बाहेर पडून राष्ट्रीय जनता दलाची स्थापना केली. त्यामुळे गुजराल सरकार अल्पमतात आले. गुजराल सरकार ११ महिने चालले. त्यानंतर १९९८ साली लोकसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या.

१९९६च्या लोकसभेत राजकीय पक्ष, त्यांना मिळालेल्या जागा व टक्केवारी :-

| राजकीय पक्ष | जागा | टक्केवारी |
|---|---|---|
| १. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १४० | २८.८० |
| २. भारतीय जनता पार्टी | १६१ | २०.२९ |
| ३. जनता दल | ४६ | ०८.०८ |
| ४. तमिळमनिला कॉग्रेस | २० | ०२.१९ |
| ५. डी. एम. के. | १७ | ०२.१७ |
| ६. समाजवादी पार्टी | १७ | ०३.२८ |
| ७. तेलगू देसम | १६ | ०२.९७ |
| ८. बहुजन समाज पार्टी | ११ | ०४.०२ |
| ९. शिरोमनी अकाली दल | ०८ | ०.७६ |

## ४) १९९८ ची निवडणूक:-

संयुक्त आघाडी स्थापन केलेल्या सरकारचा पाठिंबा काढून घेतल्यानंतर, पुन्हा १९९८ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. याही निवडणुकीत देशातील जनतेने पुन्हा एकदा संमिश्र कल दिला. कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही . भाजपला सर्वाधिक १८१ जागा मिळाल्या. मतांची टक्केवारी २५.५९ होती. काँग्रेसला १४१ जागा मिळाल्या मतांची टक्केवारी २५.८२ एवढी होती. यावेळी भाजप व मित्र पक्षांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) ची स्थापना केली. एनडीएला २५४ जागा मिळाल्या. अण्णा डीएमके या जयललितांच्या पक्षाच्या मदतीने (१८ खासदार) वाजपेयी दुस-यांदा भारताचे प्रधानमंत्री बनले. मात्र १९९८ च्या अखेरीस अन्ना डीएमके ने वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे NDA सरकारला बहुमतासाठी एक जागा कमी पडली. एका मताने वाजपेयी सरकार कोसळले. पुन्हा १९९९ मध्ये लोकसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या.

## ५) १९९९ ची निवडणूक:-

पार्श्वभूमी:-

वाजपेयी सरकारचा लोकसभेतील विश्वासदर्शक ठराव अवघ्या एका मताने पराभव झाल्यानंतर देशात तेराव्या लोकसभेसाठी १९९९ साली निवडणुका झाल्या. भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएने या निवडणुकीत चांगली कामगिरी केली. आणि १९९६, १९९८ या दोन निवडणुकीनंतर देशात स्थिर सरकार आले.

अ) सोनिया गांधी यांचा राजकारणात प्रवेश:- या निवडणुकीच्या काळात काँग्रेस पक्षाची सूत्रे सोनिया गांधी यांच्याकडे आली. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर पुन्हा एकदा पक्षाची सूत्रे गांधी घराऱ्याकडे आली, परंतु या निवडणुकीत काँग्रेसला पुन्हा एकदा अपयश आले. काँग्रेसला ११४ जागांवर विजय मिळवता आला. काँग्रेसने या निवडणुकीत प्रादेशिक पक्षांच्या मिळून युपीए(संयुक्त पुरोगामी आघाडी) स्थापन केली. या आघाडीत अण्णा डीएमके, राष्ट्रीय जनता दल, युनायटेड फ्रंट इत्यादी पक्ष सहभागी होते.

या निवडणुकीतच सोनिया गांधी यांच्या परदेशी नागरिकत्वाच्या मुद्द्यावरून शरद पवार यांनी विरोध केला. काँग्रेसमधील पी. ए. संगमा, शरद पवार आणि तारिक अन्वर पक्षातून बाहेर पडून 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची' स्थापना केली. याचा मोठा फटका काँग्रेस पक्षाला बसला.

ब) <u>भाजपची कामगिरी</u>:- १९९१, १९९६, १९९८ आणि १९९९ या सलग चार लोकसभा निवडणुकीत लोकसभेतील भाजपचे संख्याबळ वाढले. या निवडणुकीत भाजपला पुन्हा यश मिळाले. लोकसभेच्या १८० जागांवर विजय मिळवत तो लोकसभेतील सर्वात मोठा पक्ष बनला. भाजपच्या नेतृत्वाखालील NDA आघाडीने बहुमताचा आकडा पार करण्यात यश मिळवले. संयुक्त जनता दल, शिवसेना, डी एम के, तृणमूल काँग्रेस, ब्रिजू जनता दल हे NDA आघाडीतील प्रमुख पक्ष होते. NDA आघाडीच्या वाजपेयी सरकारने पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला.

क) <u>काँग्रेसची कामगिरी:-</u> १९९९ च्या निवडणुकीत पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाला अपयश आल.` पक्षाला केवळ ११४ जागांवर विजय मिळवता आला. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीएआघाडी स्थापन करण्यात आली. अन्ना डीएमके, राष्ट्रीय जनता दल हे पक्ष काँग्रेस आघाडीत होते. चंद्राबाबू नायडू च्या तेलुगु देसम पक्षाला २९ तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला(मार्क्सवादी) ३३, समाजवादी पक्षाला २६ तर बहुजन समाज पक्षाला १४ जागा मिळाल्या.

## ५) २००४ ची सार्वत्रिक निवडणूक:-

२००४ ची निवडणूक धक्कादायक निकाल देणारी ठरली. फील गुड फॅक्टर, इंडिया शायनिंग या घोषणांद्वारे प्रचाराची हवा निर्माण करणाऱ्या भारतीय जनता पक्षाला २००४ च्या निवडणुकीत दारुण पराभव झाला. तब्बल आठ वर्षांनी पुन्हा एकदा काँग्रेसच्या हाती सत्ता आली.

अ) <u>भाजपाची कामगिरी</u>:- २००४ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभव हा भाजपसाठी एक धक्का होता. कारण निवडणूकपूर्व सर्वेक्षण चाचण्यांमध्ये भाजप पुन्हा सत्तेत येईल असे भाकीत वर्तवले जात होते. मात्र २००२ ची गुजरात दंगल, शव पेटयांचा घोटाळा, वाढते दहशतवादी हल्ले, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण आणि महागाई या मुद्द्यांमुळे अर्थव्यवस्थेचा विकास दरामध्ये सातत्य असूनही जनमत भाजपाच्या विरोधात गेले. भाजपला केवळ १३८ जागा जिंकता आल्या.

ब) <u>काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार:-</u> घटक पक्षांची मोट बांधून भाजपाच्या नेतृत्वाखालील NDA आघाडीने १९९९ मध्ये पूर्ण बहुमत प्राप्त करून पाच वर्षाचा पूर्ण कार्यकाळ सरकार चालविणारे पहिले बिगर काँग्रेसी सरकार होते. असाच प्रयत्न काँग्रेसने सुद्धा केला. काँग्रेसने समविचार घटक पक्षांची यूपीएआघाडी स्थापन केली. या निवडणुकीत सोनिया गांधी विदेशी असण्याच्या मुद्याला जनतेने साफ नाकारले. सोनिया गांधीच्या नेतृत्वात काँग्रेसने १९९९च्या निवडणुकीपेक्षा चांगली कामगिरी केली. काँग्रेसला १४५ जागा मिळाल्या. समाजवादी पक्ष ३६ जागा, बसपा १९ जागा या पक्षांचा बाहेरून पाठिंबा घेऊन काँग्रेसने यूपीएआघाडीचे सरकार स्थापन केले. सोनिया गांधी यांनी पंतप्रधान पद स्वीकारावे अशी विनंती काँग्रेसच्या नेत्यांनी केली. मात्र सोनिया गांधी यांनी पंतप्रधान पद स्वीकारण्यास नकार देऊन अर्थतज्ज्ञ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. NDA आघाडीने ज्याप्रमाणे यशस्वीपणे पूर्ण पाच वर्ष सांभाळले, त्याचप्रमाणे पहिल्यांदाच काँग्रेसने सुद्धा आघाडीचे सरकार चालवून आघाडी सरकारचा प्रयोग यशस्वी केला.

## ६) २००९ ची निवडणूक:-

२००४ च्या तुलनेत २००९ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीने घवघवीत यश संपादन करून सलग दुसऱ्या निवडणुकीत सत्ता प्राप्त केली.

अ) <u>काँग्रेसची कामगिरी:-</u> २००९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी काही महिने आधी संपुआ सरकार साठी प्रतिकूल परिस्थिती होती. अमेरिकेसह संपूर्ण जगात मंदीची लाट आली होती. मुंबईवर दहशतवादी हल्ला या घटना जनमत काँग्रेस विरोधी जाण्यास पुरेशा होत्या. मात्र मनमोहन सिंग यांनी परिस्थिती हुशारीने हाताळून मतदारांच्या मनात आपल्या सरकारविषयी विश्वास कायम ठेवण्यात यश मिळविले. या निवडणुकीत काँग्रेसला २०६ जागा मिळाल्या. ज्या मागील निवडणुकीच्या तुलनेत एक्स्प्रेस ६१ अधिक होत्या. हुमतासाठी आवश्यक असणाऱ्या २७२ जागांसाठी संपुआला दहा जागा कमी पडल्या. बाहेरून अन्य पक्षांचा पाठिंबा मिळवून मनमोहनसिंग यांनी पुन्हा स्थिर सरकार चालविले. तृणमूल काँग्रेस तसेच डीएमके पक्षाने संपुआची साथ अर्ध्यावरच सोडली. मात्र समाजवादी पक्ष, बसपाचा बाहेरून पाठिंबा असल्याने केंद्र सरकार स्थिर राहिले.

ब) <u>भाजपाची कामगिरी:-</u> लालकृष्ण अडवाणी या निवडणुकीत भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार होते. भाजपने काळा पैसा व भ्रष्टाचार हा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रमुख मुद्दा बनविला. परंतु मतदारांवर प्रभाव पडला नाही. मागील निवडणुकीच्या तुलनेत भाजपाला २२ जागा कमी आल्या. भाजपच्या ११६ जागा तर रालोआला १५९ जागा मिळाल्या.

### ७) २०१४ची निवडणूक:-

२०१४ ची निवडणूक अनेक दृष्टीने वैशिष्ट्यापूर्ण ठरली. काँग्रेस नंतर प्रथमच भाजपला लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळाले आणि काँग्रेसच्या दृष्टीने अतिशय वाईट प्रदर्शन घडवणारी निवडणूक ठरली. गुजरात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना भाजपाने पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून घोषित केले. भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी त्याला विरोध केला आणि आपला राजीनामा पार्टीकडे दिला. पार्टीने त्यांचा राजीनामा नामंजूर केला. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएने काँग्रेस सरकार च्या काळात झालेल्या भ्रष्टाचार हा निवडणुकीचा प्रमुख मुद्दा केला. विदेशातील काळा पैसा भारतात परत आणणे हा आणखी एक प्रचाराचा मुख्य मुद्दा होता. आपल्या भाषणाच्या व नेतृत्वाच्या अनोख्या शैलीने नरेंद्र मोदी यांनी मतदारांना आकर्षित केले. मतदानाच्या ३१ टक्के मते मिळवून भाजपने २८२ जागा जिंकल्या आणि भाजप व एनडीएच्या घटक पक्ष मिळून ही जागांची संख्या ३३६ एवढी होती. या निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक कामगिरी केली. २८२ जागा जिंकून काँग्रेस नंतर प्रथमच भाजपने लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळविले.

काँग्रेसच्या या निवडणुकीत दारुण पराभव झाला. काँग्रेसला केवळ ४४ जागा मिळाल्या. निवडणुकीच्या आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदा एवढ्याा कमी जागा मिळाल्या. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संपुआतील घटक पक्ष सुद्धा फार काही करू शकले नाहीत. संपुआला ६० जागा मिळाल्या. यात राष्ट्रवादी काँग्रेसला सहा तर राष्ट्रीय जनता दलाला चार जागा मिळाल्या.

थोडक्यात २०१४ च्या निवडणुकीत मोदी लाटेमुळे सर्व विरोधी पक्षांचा धुव्वा उडाला.

### सारांश -

१९८९ पासून च्या लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्षांच्या कामगिरीचे विश्लेषण केल्यानंतर हे लक्षात येते की, या निवडणुकीच्या काळात भारतीय राजकारणात अनेक स्थित्यंतरे घडून आली. १९८९ नंतर निवडणुकीत कोणताही एक पक्ष स्पष्ट बहुमत मिळवण्यात यशस्वी ठरला. याला अपवाद २०१४ च्या निवडणुकीचा करता येईल. भाजपने १९८९ च्या निवडणुकीनंतर प्रत्येक निवडणुकीत आपली

munotes.in

कामगिरी उंचावत नेली. अपवाद २००९ ची निवडणूक. भाजपने समविचारी पक्षांशी निवडणूक आघाडी करून चार वेळा आपले सरकार स्थापन केले. १९९९ ते २००४ या काळात २४ पक्षांची युती करून आघाडीचे सरकार स्थापन केले आणि महत्त्वाचे म्हणजे भारतीय इतिहासातील हे पहिले आघाडीचे सरकार होते जे पूर्ण पाच वर्षे चालले. त्यामुळेच पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व कायम स्मरणात राहणारे ठरले. पुढे काँग्रेसने सुद्धा संपूआतील अनेक घटक पक्षांची आघाडी करून २००४ पासून २०१४ पर्यंत सतत दहा वर्षे आघाडी सरकार चालवून आघाडी सरकार यशस्वी चालविण्याचा क्रम कायम ठेवला. २०१४ च्या निवडणुकीत भाजप आणि काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांनी आघाडी करूनच निवडणुका लढविल्या. परंतु या निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे आघाडी सरकार तील इतर घटक पक्षांना असलेले महत्त्व कमी झालेले दिसले. सध्या भाजपने पूर्वीच्या काँग्रेस सारखी आपली पकड भारतीय राजकारणावर निर्माण केली आहे. ही पकड काँग्रेस व इतर विरोधी पक्ष सैल करण्यात कितपत यशस्वी होतात हे पाहणे औत्सुक्याचे व रंजक ठरणार आहे.

## ६.४ सरावासाठी प्रश्न

१. राजकीय प्रश्न म्हणजे काय? राजकीय पक्षपद्धतीची वैशिष्टये सांगा.

२. राष्ट्रीय पक्ष म्हणजे काय? राष्ट्रीय पक्षाची उदाहरणे स्पष्ट करा.

३. प्रादेशिक पक्ष म्हणजे काय? प्रादेशिक पक्षांची वैशिष्टये विशद करा.

४. प्रादेशिक पक्ष म्हणजे काय, विविध प्रादेशिक पक्षांची माहिती द्या.

**टीप लिहा**

अ राष्ट्रीय पक्ष

ब प्रादेशिक पक्ष

क प्रादेशिक पक्षांची वैशिष्टये

## ६.५ संदर्भ सूची

१. इनामदार ना.र. - राजकीय समाजशास्त्र, कौन्टिनेंटल प्रकाशन पूणे-१९८४ पृ क्र.१९२
२. कित्ता- पृष्ट क्र.१९३
३. कित्ता- पृष्ट क्र.१९३
४. कित्ता- पृष्ट क्र.१९३
५. Link;www.inmarathi.com/How-Parties-are–given state or- national - level - Status.
६. https//en.m.wikipedia.org/wl.mocratic Alliance members.
७. Link ; https//en.wikipedia.org/wl.Progressive Alliance
८. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळाफरे प्रकाशन, नागपूर -२०१० पृ.४८३
९. Link;www.inmarathi.com/How-Parties-are–given state or- national - level – Status.
१०. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळाफरे प्रकाशन, नागपूर -२०१० पृ.४८९
११. देशमुख अलका; भारताचे शासन आणि राजकारण, श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२६१
१२. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळाफरे प्रकाशन, नागपूर -२०१० पृ.४९८
१३. भाळे भा.ल.,भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२००५ पृ.१८३
१४. कित्ता-पृ.१८४
१५. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळाफरे प्रकाशन, नागपूर -२०१० पृ.५०३

१६. कित्ता-पृ.५०४
१७. देशमुख अलका; भारताचे शासन आणि राजकारण, श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२६३
१८. Link ; https//mr.m.wikipedia.org/wiki → भारतीय जनता पक्ष-विकिपीडीया.
१९. कित्ता
२०. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ.१८५-१८६
२१. Link ; https//mr.m.wikipedia.org/wiki → भारतीय जनता पक्ष-विकिपीडीया.
२२. कित्ता
२३. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १८६
२४. कित्ता पृ १८६-१८७
२५. देशमुख अलका; भारतीय शासन आणि राजकारण; श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२६८
२६. भोळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५२१
२७. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १८९
२८. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १८९
२९. Link; https// hi.m.wikipedia.org. बहुजन समाज पार्टी-विकिपीडीया.
३०. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १९०
३१. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १९०
३२. कित्ता पृ १९१
३३. कित्ता पृ १९१
३४. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५४८
३५. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५३२
३६. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १९३
३७. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५३३
३८. कित्ता -पृ.५३३
३९. कित्ता -पृ.५३३
४०. Link- भारतीय कम्युनिस्ट पार्टी-विकिपीडीया.
४१. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५३५
४२. कित्ता-पृ.५४१
४३. Link.www. भारतीय कम्युनिस्ट पार्टी-विकिपीडीया.
४४. कित्ता-पृ.५४१
४५. देशमुख अलका; भारतीय शासन आणि राजकारण; श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२६९
४६. कित्ता- पृ.२६९
४७. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ १८२
४८. गुहा रामचंद्र, शारदा साठे (अनु), गांधीनंतरचा भारत; मॅजिस्टिक पब्लिसिंग हाउस, ठाणे, २०१२ (दुसरी आवृत्ती)-पृ. ६४२
४९. कित्ता- पृ.६४२
५०. कित्ता- पृ.६४३
५१. Link ; https://en.m.wikipedia.org-wikipedia
५२. Link ; https://en.m.wikipedia.org-wikipedia
५३. गुहा रामचंद्र, शारदा साठे (अनु), गांधीनंतरचा भारत; मॅजिस्टिक पब्लिसिंग हाउस, ठाणे, २०१२ (दुसरी आवृत्ती)-पृ. ६४३
५४. देशमुख अलका; भारतीय शासन आणि राजकारण; श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२७२
५५. गुहा रामचंद्र, शारदा साठे (अनु), गांधीनंतरचा भारत; मॅजिस्टिक पब्लिसिंग हाउस, ठाणे, २०१२ (दुसरी आवृत्ती)-पृ.३३३
५६. Hasan Zoya (Edi); parties and politics in India; Oxford University Press, New Delhi-2006 Page-402
५७. Link; https://en.m.wikipedia.org- Dravid mumnetra kalgham Wikipedia
५८. कित्ता-

५९. देशमुख अलका; भारतीय शासन आणि राजकारण; श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२७१

६०. Link ; https://en.m.wikipedia.org. DMK party-wikipedia

६१. Link ; https://en.m.wikipedia.org.AIDMK party-wikipedia

६२. कित्ता-

६३. कित्ता-

६४. कित्ता-

६५. कित्ता-

६६. Link ; https://en.m.wikipedia- शिरोमणि अकाली दल-wikipedia

६७. कित्ता-

६८. लोटे रा.ज.; भारतीय शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५ पृ. २००

६९. कित्ता- पृ. २००

७०. कित्ता- पृ. २००

७१. Link ; https://en.m.wikipedia.org. शिरोमणि अकाली दल-Wikipedia.

७२. डॉ.कुलकर्णी श्री.प.,डॉ.साठे शुभा,डॉ.कडू माहिनी (संपा)भारतीय राजकारणी दशा आणि दिशा,विजय प्रकाशन, नागपूर -२००५-पृ.४९

७३. कित्ता- पृ.४९-५०

७४. कित्ता- पृ.५२

७५. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५५३

७६. कित्ता- पृ.५५३

७७. डॉ.कुलकर्णी श्री.प.,डॉ.साठे शुभा,डॉ.कडू माहिनी (संपा) भारतीय राजकारणी दशा आणि दिशा,विजय प्रकाशन, नागपूर -२००५-पृ.५५ ते ५६

७८. कित्ता- पृ.५७ ते ५८

७९. Link ; https://mr.m.wikipedia.org/ महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०१४- wikipedia

८०. गुहा रामचंद्र, शारदा साठे (अनु), गांधीनंतरचा भारत; मॅजिस्टिक पब्लिसिंग हाउस, ठाणे, २०१२ (दुसरी आवृत्ती)-पृ.७३

८१. Link ; https://en.m.wikipedia.org/Jammu and kashmir National conference-/wikipedia

८२. गुहा रामचंद्र, शारदा साठे (अनु), गांधीनंतरचा भारत; मॅजिस्टिक पब्लिसिंग हाउस, ठाणे, २०१२ (दुसरी आवृत्ती)-पृ. २९८ ते २९९

८३. Link ; https://en.m.wikipedia.org/Jammu and kashmir National conference-/wikipedia

८४. गुहा रामचंद्र, शारदा साठे (अनु), गांधीनंतरचा भारत; मॅजिस्टिक पब्लिसिंग हाउस, ठाणे, २०१२ (दुसरी आवृत्ती)-पृ. ४०९ ते ४१०

८५. Link ; https://en.m.wikipedia.org/Jammu and kashmir National conference-/wikipedia

८६. भोळे भा.ल.,भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५३०

८७. कित्ता- पृ.५३०

८८. देशमुख अलका; भारतीय शासन आणि राजकारण; श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-२००९ पृ.२६०

८९. कित्ता.

९०. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५२०

९१. कित्ता- पृ.५२०

९२. कित्ता- पृ.५३०

९३. Link;election.Prahar.in-History of Loksabha

९४. कित्ता.

९५. कित्ता.

९६. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५३० ते ५३१

९७. Link;election.Prahar.in-History of Loksabha

९८. भाळे भा.ल.; भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण; पिंपळापूरे प्रकाशन,नागपूर -२०१० पृ.५२१

९९. Link ;election.Prahar.in»History of Loksabha

१००. कित्ता.


munotes.in

१०१. कित्ता.
१०२. कित्ता.
१०३. कित्ता.
१०४. कित्ता.
१०५. कित्ता.
१०६. कित्ता.
१०७. Link;election.Prahar.in-History of Loksabha-1999
१०८. कित्ता.
१०९. कित्ता- election.Prahar.in Loksabha-2004
११०. कित्ता- Loksabha-2009
१११. कित्ता.
११२. Link-:www.wikiewdia.org.Indian general election-2014
११३. कित्ता.

❖❖❖

munotes.in

# ३

## सामाजिक गतिशीलता पैलू

**प्रकरणाची रचना -**

३.१. जात (आरक्षणाच्या संदर्भात)

३.२. धर्म (जमातवादाच्या संदर्भात)

३.३. लिंगभाव (राजकीय सहभागाच्या संदर्भात)

३.४ सरावासाठी प्रश्न

३.५ संदर्भसूची

## ३.१ जात (आरक्षणाच्या संदर्भात)

**उद्दिष्टये :-**

(1) राखीव जागांचा अर्थ व ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेणे.

(2) राखीव जागासंबंधी शासकीय पातळीवर झालेल्या घडामोडींचा, राखीव जागासंबधीच्या आयोगांचा अभ्यास करणे.

(3) मराठा आरक्षण व आर्थिक आधारावरील आरक्षणाची माहिती मिळवीणे.

(4) राखीव जागांना विरोध व त्याच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**प्रस्तावना:**

वर्णव्यवस्था आणि जातीसंस्था हा हिंदु समाजरचनेचा महत्वाचा आणि आधारभूत घटक आहे. आज वर्णव्यवस्था स्पष्टपणे आस्तित्वात नसली तरी जातीसंस्थेचे आस्तीत्व आजही ठळकपणे जाणवते. गुणकर्मावर आधारीत असलेली वर्णव्यवस्था जेव्हा जन्मावर आधारीत मानली जाउ लागली तेव्हा याच वर्णव्यवस्थेतून हजारो जातींचा उदय झाला. जातीव्यवस्थाही जन्म व असमानता या आधारावर उभी आहे. साधारणपणे वर्णव्यवस्थेत समाविष्ट होणाऱ्या जातींना सवर्ण जाती तर वर्णव्यवस्थेच्या बाहेर असलेल्या जातींना अवर्ण जाती असे म्हणतात. अवर्ण जाती मध्ये आदिवासी जमाती व अस्पृश्य जातींचा समावेश होतो. जातींच्या उतरंडीत सर्वात खालच्या पातळीवर अस्पृश्य जाती असत. अस्पृश्य जातींना 'अस्पृश्य' मानल्यामुळे विकासाच्या सर्वच क्षेत्रात त्यांना विकासाची संधी नाकारली, त्यांना सामाजिक, धार्मिक इ. क्षेत्रात समान दर्जा नाकारला इतकेच नव्हे तर त्याना गुलामाहूनही हीन दर्जाची वागणुक देण्यात येत होती. त्यामुळे त्यांची सामाजीक, शैक्षणीक, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात अधोगती झाली. हीच अवस्था आदिवासी जमातींची आहे. प्रस्थापित समाजापासून दूर जंगली प्रदेशात व दुर्गम भागात व नैसर्गीक जीवन जगत असलेल्या या जमातीही विकासाच्या सर्वच क्षेत्रापासून वंचित राहिल्या. ब्रिटिश काळात अस्पृश्य जाती व आदिवासी जमातींची गणना करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची सुची (यादी) तयार करण्यात आली. त्यावरुनच अनुसूची जाती व अनुसूचीत जमाती असे म्हटले जावू लागले. या पूर्वी या जातींना डिप्रेस्ड क्लास असे म्हटले जात असे. तर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना बहिष्कृत जाती असे म्हणत असत. या सर्वच क्षेत्रात मागासलेल्या जातींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या सामाजिक दर्जात सुधारणा होण्यासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली.

### 'राखीव जागा'- अर्थ:-

साधारणपणे राखीव जागांचा अर्थ असा स्पष्ट करता येईल की, 'मानवी जीवनाच्या विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात विशिष्ट जनसमुदायाला विशिष्ट प्रमाणात विशेष संधी व प्रतिनिधित्व देण्यासाठी विशिष्ट प्रमाणात जागा त्या जनसमुदायाला राखून ठेवणे होय'. अर्थात असा समुदाय निश्चित करण्यासाठी जात, धर्म, वंश त्याच बरोबर सामाजिक, शैक्षणीक व आर्थिक मागासलेपणा इत्यादी आधार असू शकतो. उदा. ब्रिदिश साम्राज्याच्या काळात ॲग्लोइंडियन वंशाच्या लोकांना व मुस्लिम धर्मियांना राजकीय प्रतिनिधित्वासाठी राजकीय क्षेत्रात काही मतदार संघ राखिव ठेवले जात असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही गोलमेज परिषदेत अस्पृश्य जातींसाठी राखीव मतदार संघाची मागणी केली होती.

स्वातंत्रउत्तर काळात भारतीय राज्यघटनेतही राखीत जागांची तरतूद केली आहे. परंतू जात, धर्म, वंश हे राखीव जागांचे आधार नाकारले व केवळ सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण हाच आधार मान्य करण्यात आला.

### राखीव जागांची ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

आधुनिक काळातील राखीव जागांचा उगम ब्रिटिश काळात झालेला असला तरी या संकल्पनेचा उगम परंपरागत हिंदू समाजरचनेतच दिसून येतो. वर्णव्यवस्था आणि जातीसंस्था या राखीव जागांचे प्रतिमान (Model) आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हया चार वर्णांना विशिष्ट क्षेत्र शंभर टक्के राखीव ठेवलेले होते. उदा. विदयार्जन व विदयादान करणे हे क्षेत्र ब्राम्हंणासाठी शंभर टक्के राखीव होते. संरक्षणाशी संबधीत सर्व कार्ये करण्यास हे क्षेत्र क्षत्रियांसाठी राखीव होते. उत्पादन व व्यापार हे क्षेत्र वैश्यांसाठी राखीव होते. आणि वरील तीनही वर्णांची सेवा करणे व त्या संदर्भात सर्व प्रकारची शारिरीक व गलिच्छ कामे शूद्र वर्णानेच करावीत अशी सक्ती होती. म्हणजेच हे क्षेत्र त्यांच्यासाठी राखीत ठेवले होते. या चारही वर्णातील कोणत्याही वर्गाला दुसऱ्या वर्गाचे काम करण्याचा किंवा परस्परांच्या कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. या चार वर्णांशिवाय वर्णबाहय असाही एक जातीसमुह होता तो म्हणजे अस्पृश्य मानलेल्या जातींचा समूह होय. महात्मा फुले यांनी त्या जातीसमूहाला अतिशुद्र असे नामकरण केले होते. जे वर्णव्यवस्थेचे तेच जातीसंस्थेचे. जातीसंस्थेतील प्रत्येक जातीला जातिनिष्ट व्यवसाय दिला आहे. उदा. चामडयापासून वस्तू तयार करण्याचे काम चांभारच करणार, चामडे कमावण्याचे काम ढोर करणार, लाकडापासून अवजारे करण्याचे काम सुतारच करणार, तर मातीची भांडी मडकी इ. तयार करण्याचे काम कुंभारच करणार. कोणत्याही जातीला आपला व्यवसाय सोडून इतरांचा व्यवसाय करण्यास बंदी होती. इतकेच नव्हे तर या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला तीच्या जातपंचायतीकडून दंडात्मक शिक्षा केली जात असे. थोडक्यात राखीव जागांचा उगम हा वर्णसंस्था व जातीसंस्थेतच आहे.

वर्ण व जातीसंस्थेने प्रत्येक जातीला विशिष्ट व्यवसाय दिला असला तरी, शुद्र वर्णातील जाती व अस्पृश्य जाती यांना मात्र त्यांची कार्ये अत्यंत कमी मोबदल्यावर, किंवा विना मोबदला केवळ सेवाभावी वृत्तीने करावी लागत असत. गलिच्छ व्यवसाय करणाऱ्या जातींना तर अस्पृश्यच मानन्यात आले. या दोनी समुहातील जाती सर्वच क्षेत्रात मागासलेल्या राहिल्या. तसेच त्यांना हिंदू समाजरचनेत सर्वात कनिष्ठ पातळीवर ठेवून त्यांना समान दर्जा नाकारण्यात आला.

ब्रिटिश राजवटीतही शासकीय सेवा व विकासाच्या सर्व क्षेत्रात केवळ ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांना विशेशत: ब्राम्हण वर्णाला (जात) अधिक संधी मिळाली. या काळात सर्वच क्षेत्रात ब्राम्हणांचे वर्चस्व होते. तर शूद्र व अस्पृश्य जातींना सर्वच क्षेत्राात विकासाची संधी नाकारली होती. या परिस्थिती विरुद्ध प्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी आवाज उठविला. शूद्र-अतिशूद्रांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सत्यशोधक चळवळ सुरु केली. पुढे याच चळवळीचे रुपांतर ब्राम्हणेतर चळवळीत झाले. यात मुख्य पुढाकार कोल्हापूर संस्थानचे राजे छत्रपती शाहू महाराज यांचा होता. त्यांनाच आधुनिक काळातील राखीव जागांचे जनक असे म्हटले जाते. त्यांनी २६ जुलै १९०२ रोजी नोकरीविषयक गॅझेट प्रसिदध करुन ब्राम्हण, प्रभू, शेणवी इ. पुढारलेल्या जातींना सोडून इतर सर्व मागासलेल्या जातींना त्यांच्या संस्थानाच्या क्षेत्रात ५० टक्के राखीव जागा जाहिर केल्या.

छत्रपती शाहू महाराजानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३०मधे पहिल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्य जातींसाठी राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्वासाठी राखीव मतदार संघाची मागणी केली. परंतु अस्पृश्य जातींना कोणत्याही प्रकारचे वेगळे हक्क देण्यास म. गांधीजीनी विरोध केल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दुसऱ्या गोलमेज परिषदेत पुरवणी मागणीपत्र सादर करुन अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. जातीय निवाडयात ती मागणी मान्य करण्यात आली. त्याला गांधीजींनी विरोध केला. व स्वतंत्र मतदार संघाचा निर्णय रद्द करण्यासाठी त्यांनी आमरण उपोषण केले. शेवटी पुणे करार होउन अस्पृश्य जातींना राजकीच क्षेत्रात स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागा मान्य करण्यात आल्या स्वातंत्र मिळाल्यावर भारतीय राज्यघटनेत त्या संदर्भात तरतूद करण्यात आली. अनुसुचित जाती जमातींना राजकीय क्षेत्रात राखीव जागांबरोबरच शासकीय सेवांमध्ये राखीव जागांची तरतूद राज्यघटनेत करण्यात आली. इतर मागास वर्गासंबधी काही निर्णय न झाल्याने पुढील काळात त्याना राखीव जागा देण्यासाठी मागास वर्ग आयोग स्थापन करण्यासंबधी ३४० कलमात तरतूद करण्यात आली.

**इतर मागास वर्गासाठी आरक्षण:-**

अति मागास वर्ग म्हणून अनुसूचित जाती आणि यांची यादी निश्चित झाल्याने स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत या जाती समूहासाठी जागांची तरतूद करण्यात आली परंतु इतर मागास वर्ग निश्चित झालेला नव्हता म्हणून असा मागास वर्ग निश्चित करुन त्यांना राखिव जागा देण्यासाठी आयोग नेमण्याची तरतूद कलम ३४० ने केली आह.े

**काकासाहेब कालेलकर आयोग:-१९५३**

राज्य घटनेच्या ३४३ व्या कलमाला अनुसरून इतर मागास वर्ग हे निश्चित करण्यासाठी १९५३ मध्ये पहिला अन्य मागास वर्ग आयोग गांधीवादी नेते काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला या आयोगाने दोन वर्ष काम केले ६८ हजार किलोमीटर प्रवास केला प्रश्नावली ला आलेल्या ९८५ उत्तरांचा, ३४१४ निवेदनांचा अभ्यास करून आणि ५६३६ व्यक्तींच्या मुलाखती घेऊन १९५५ मध्ये आपला अहवाल सादर केला त्यानुसार त्यानुसार २३९९ जाती मागासवर्ग म्हणून तर ८३७ जाती अतिमागास जाती म्हणून शिफारस करण्यात आल्या. त्यांच्या प्रगतीसाठी काही महत्वाच्या शिफारशी केल्या. उदा. जमीण धारणेत व्यापक सुधारणा, ग्रामीन अर्थरचनेत बदल, भूदान, पशुपैदास, जनावरांचा विमा, ग्रामोदयोग, ग्रामीण घरबांधनी कुटीरउदयोग, आरोगय, पाणिपुरवठा, नोकरी भरतीत राखीव जागा, शिक्षण इत्यादी. महत्वाचे म्हणजे सर्व स्त्रियांना मागासवर्गीय समजावे अशीही शिफारस केली होती.

हा अहवाल सादर केला तरी या अहवालाबाबत आयोगाच्या सदस्यांमध्ये एकमत नव्हते ११ सभासदांपैकी चीन सभासदांनी जात हा मागासलेपणाचा निकष असू नये असे सुचविले व जातीवर आधारित आरक्षण ठेवायला विरोध केला होता विशेष म्हणजे या आयोगाचे अध्यक्षच आपल्या शिफारशी यांच्या विरोधात होते. त्यांनी आयोग सादर करताना ३०पानांचे पत्र लिहिले त्यांनी लिहिलेले 'अहवालावर अखेरचा हात फिरवत असताना मी नव्याने विचार करू लागले व मला असे आढळून आले की मागासपणा ठरवण्यासाठी जाती ऐवजी अन्य एक अगर अनेक निकष वापरता येतील. ' आयोगाच्या अध्यक्षांचा त्यांनीच दिलेल्या अहवालाला विरोध केल्याने हा अहवाल गुंडाळून ठेवण्यात आला

**मंडल आयोग:- १९७८**

१९७५-७६ मध्ये इंदिरा गांधी यांनी देशावर लादलेल्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसचा पराभव होऊन १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात 'काकासाहेब कालेलकर आयोगाच्या अंमलबजावणीचे' आश्वासन दिले होत.` परंतु सत्तेवर आल्यानंतर या आयोगाच्या अंमलबजावनीवरुन जनता पक्षातच मतभेद झाले. शेवटी आयोगाच्या अंमलबजावणीपेक्षा दुसरा मागासवर्ग आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला व डिसेंबर १९७८ मध्ये श्री. बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षते खाली आयोग स्थापन करण्यात आला हाच मंडल आयोग होय.

**इतर मागास वर्गासाठी आरक्षण**

अति मागास वर्ग म्हणून अनुसूचित जाती आणि यांची यादी निश्चित झाल्याने स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेचे या जाती समूहासाठी जागांची तरतूद करण्यात आली परंतु इतर मागास वर्ग झालेला नव्हता त्यांना जागा देण्यासाठी आहे.

**मंडल आयोग:- १९७८**

१९७५-७६ मध्ये इंदिरा गांधी यांनी देशावर लागलेल्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसचा पराभव होऊन १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात 'काकासाहेब कालेलकर' आयोगाच्या अंमलबजावणीची आश्वासन दिले होते परंतु सत्तेवर आल्यानंतर आयोगाच्या अंमलबजावनी वरुन जनता पक्षातच मतभेद झाले शेवटी कालेलकर आयोगाच्या अंमलबजावणीची पेक्षा दुसरा मागासवर्ग आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला व डिसेंबर १९७८ मध्ये श्री. बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षते खाली आयोग स्थापन करण्यात आला. हाच मंडल आयोग होय. या आयोगाने आपला अहवाल १२ डिसेंबर १९८० मध्ये राष्ट्रपतींना सादर केला परंतु यावेळी मध्यावधी निवडनुका झाल्या व जनता पक्षाचा पराभव होउन इंदिरा गांधी यांचे सरकार आले. १९९० पर्यंत कॉंग्रेस सरकाने या आयोगांच्या शिफारशींचा विचार केला नाही. १९९२ मध्ये व्ही. पी. सिंग सरकारने त्याची अंमलबजावणी केली.

या आयोगाने ४०५ जिल्ह्यातील अकरा कसोटयांच्या आधाराने सर्वेक्षण करून मिळवलेल्या अफाट माहितीच्या आधारे या आयोगाने पुढील महत्त्वाच्या शिफारशी केल्या.

अन्य मागासवर्गीय ५२ टक्के असले तरी त्यांच्यासाठी ५२ टक्के जागा राखीव येणार नाहीत. कारण पूर्वीपासून अनुसुचित जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात २२. ५ टक्के जागा राखीव आहेत. आणि सर्वोच्च न्यायालयीन निवाड्यानुसार एकुन राखीव जागा ५० टक्क्याहून कमी असल्या पाहिजेत म्हणून ५२ टक्के लोकसंख्या असली तरी इतर मागासवर्गीयांना फक्त २७ टक्के राखीव जागा असाव्यात.

अ. गुणवत्तेच्या कसोटीवर खुल्या स्पर्धेत निवडून येणाऱ्यांचा अंतर्भाव राखीव जागांमध्ये नसावा.

ब. राखीव जागांचे हे प्रमाण बढतीच्या सर्व जागांवरही तसेच असावे.

क. राखीव कोट्यातील ज्या जागा भरल्या जाणार नाहीत त्या तीन वर्षापर्यंत तशाच ठेवाव्यात व नंतर खुल्या कराव्यात.

ड. अनुसूचित जाती-जमातींसाठी ज्याप्रमाणे नोकरीत भरती करताना वयोमर्यादेची अट शिथिल केली जाते तशी इतर मागास वर्ग यांसाठीही करण्यात यावी.

इ. अनुसूचित जाती-जमातींना असलेली रोस्टर पद्धत इतर मागास वर्गाला ही लागू असावी.

२. केंद्र आणि राज्य सरकार यांच्या अखत्यारीतील सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यातील नोकरी व राष्ट्रीयीकृत बँकातील नोकऱ्यातही इतर मागास वर्गांसाठी राखीव जागा वरील प्रमाणात ठेवण्यात याव्यात.

३. ज्या खाजगी उद्योगधंद्यांना केंद्र किंवा राज्य सरकारची कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मदत मिळते अशा उद्योगधंद्यात या राखीव ठेवण्यात याव्यात.

४. सर्व विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातही या राखीव जागा ठेवण्यात याव्यात.

५. या शिफारसींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सध्याच्या कायद्यात व नियमात आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

अर्थात केवळ राखीव जागा देणे हा या आयोगाचा उद्देश नसून अन्य मागासवर्गीयांच्या मनातील न्यूनगंड दूर करणे, प्रशासनामध्ये त्यांना सहभागी करून प्रशासनात अधिकाधिक प्रातिनिधिक बनविणे आणि मागासवर्गीय मोठ्याा पदावर आल्याने समाजमनावर जो जबरदस्त परिणाम होईल त्याचा सामाजिक अभिसरणासाठी फायदा करून घेणे असे या आयोगांचे हेतू होत.

### मराठा आरक्षण

महाराष्ट्रात मराठा लोकसंख्येने बहुसंख्य असलेली राजकीय क्षेत्रात सर्वाधिक सत्तेचा वाटा प्राप्त करणारी व सहकारी संस्था साखर कारखाने व बहुसंख्य शेतजमीन यावर मालकी व प्रभुत्व असलेली प्रमुख जात आहे आहे परंतु हे चित्र काहीसे रंजक स्वरूपाचे आहे बहुसंख्य मराठा समाज हा विकासाच्या प्रवाहापासून दूर आहे पिढ्यानपिढ्या शेतजमिनीचे तुकडीकरण होत असल्याने या समाजातील बहुसंख्य लोक गरीब व दारिद्र्यरेषेखाली आहेत याचवेळी पूर्वी अस्पृश्य मानलेल्या जाती आरक्षणाच्या माध्यमातून आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनत असल्याचे दिसत होते यामुळेच एका बाजूला अनुसूचित जाती-जमातींचा आरक्षणाला विरोध करताना मराठा समाजालाही आरक्षण मिळावे ही मागणी जोर धरू लागली त्यासाठी लाखोंचे मोर्चे काढण्यात आले या सर्व परिस्थितीच्या या पार्श्वभूमीवर मराठा समाजाच्या आरक्षणाला सत्ताधारी मराठी आमदार खासदारांचाही पाठिंबा त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काँग्रेसच्या सरकारच्या काळात महसूलमंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली

### नारायण राणे समिती

तत्कालीन आघाडी सरकारने महसूलमंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी व त्या संदर्भात त्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने राज्यभर दौरा करून २६ फेब्रुवारी २०१४ रोजी आपला अहवाल राज्य सरकारला दिला. त्या अहवालाच्या आधारे राज्य मंत्रिमंडळाने २५ जून १९१४ रोजी नोकरी व शिक्षण क्षेत्रात मराठा समाजाला १६टक्के व

munotes.in

मुस्लिम समाजाला पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला परंतु या निर्णयाच्या विरोधात आणि समर्थनार्थ अनेक याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर २०१४ रोजी आरक्षणाला स्थगिती दिली.

## राज्य मागासवर्ग आयोग

राणे समितीने दिलेल्या शिफारशींच्या आधारावर आघाडी सरकारने मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. त्यानंतर भाजपा व शिवसेना युतीच्या सरकारने उच्च न्यायालयात आरक्षण मिळण्यासाठी दोन वर्षे अभ्यास करून ५ डिसेंबर २०१६ रोजी अडीच हजार पानांचे शपथपत्र उच्च न्यायालयात दाखल केली याच वेळी राज्य मागासवर्ग आयोगाचे पुनर्घटन केले. व मराठा आरक्षण प्रकरण चर्चेनंतर इतर मागास आयोगाकडे दाखल झाले.

राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा आरक्षणासाठी तीन महत्त्वाच्या शिफारशी केल्या.

१. मराठा समाज हा सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग घोषित करण्यात यावा. कारण त्यांचे शासकीय निमशासकीय सेवेत पुरेसे प्रतिनिधित्व नाही.

२. मराठा सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग घोषित केल्यामुळे हा समाज राज्यघटनेच्या कलम १५ (४)आणि १६(४) मधील तरतुदीनुसार आरक्षणाचे फायदे घेण्यासाठी पात्र ठरणार आहे.

३. मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिक प्रवर्गात घोषित केल्यामुळे आणि त्या अनुषंगाने उद्धवलेल्या असाधारण आणि अपवादात्मक परिस्थितीमुळे भारतीय राज्यघटनेच्या अधीन राहून राज्य शासन या प्रश्नी आवश्यक तो निर्णय घेऊ शकेल.

या शिफारशींच्या आधारे युती सरकारने मराठा आरक्षणाचे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून घेतले त्याच्या अंमलबजावणीसाठी आदेश काढले परंतु या आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे व न्यायालयाने मागासवर्ग आयोगाने दिलेला अहवाल न्यायालयापुढे सादर करण्यास सांगितले आहे. अशाप्रकारे मराठा आरक्षणाचा मुद्दा आज तरी प्रलंबित आहे.

## आर्थिक आधारावर आरक्षण :-

सामाजिक शैक्षणिक मागासलेपणा हा राखीव जागांचा घटनात्मक आधार असला तरी आर्थिक दृष्टीने मागास असलेल्यानाही ही आरक्षण मिळावे असा सरकारवर सातत्याने दबाव येत आहे. त्यामुळेच २५ सप्टेंबर १९९१ रोजी पी व्ही नरसिंहराव सरकारने आर्थिक आधारावर दहा टक्के आरक्षण दिले होते. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ते घटनाविरोधी ठरवून रद्द केले. परंतु तरीही जानेवारी २०१९ मध्ये मोदी सरकारने १२४ व्या घटनादुरुस्ती सह आर्थिक आधारावर दहा टक्के आरक्षण देण्याचे विधेयक लोकसभेत व राज्यसभेत ही विक्रमी बहुमताने मंजूर करून घेतले. लोकसभेत विधेयकाच्या बाजूने ३२३ तर विरोधात केवळ तीन मते पडली तर राज्यसभेत विधेयकाच्या बाजूने १६५ मते तर विरोधात केवळ सात मते पडली. विधेयक मंजूर झाल्यानंतर ते राज्यांनी आपापल्या क्षेत्रात लागू करावे असे सांगण्यात आले आहे. परंतु ही घटना दुरुस्ती घटनेच्या पायाभूत तत्त्वांच्या विरोधी आहे व आरक्षण ५० टक्केपेक्षा अधिक देणे हे घटनाबाह्य आहे या आधारावर आरक्षणाला न्यायालयात आव्हान दिले आहे.

आरक्षणासंबंधी विविध सवर्ण व प्रतिष्ठित जातींकडून मागणी होत असतानाच ब्राह्मण समाजानेही आरक्षणाची मागणी आहे केली आहे.

**राखीव जागा संबंधी घटनात्मक तरतुदी:-**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या राखीव जागा संबंधित भारतीय राज्यघटनेत पुढील तरतुदी आहेत. या तरतुदीनुसार पुढील क्षेत्रात वरील वर्गांना राखीव जागा देण्यात आलेल्या आहेत.

१. राजकीय क्षेत्रात राखीव जागा (राखीव मतदारसंघ)

२. उच्च शिक्षणात (प्रवेशासाठी) राखीव जागा.

३. शासकीय सेवेत (नोकरी) राखीव जागा.

राज्यघटनेतील कलम ३३०, ३३२ व ३३४ (क) यानुसार राजकीय क्षेत्रात अनुसूचित जाती-जमातींना प्रतिनिधित्वासाठी राखीव जागांची तरतूद तरतूद केली आहे. कलम१५ (४), १६ (५)यामध्ये शासकीय सेवेतील राखीव जागासंबधी तरतूद केली आहे. ३८, ३९, ३९ क, ४३, ४६ या कलमांमध्ये अनुसूचित जमाती यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक दर्जा वाढवण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्यासंबंधीच्य तरतुदी आहेत. कलम ३४० नुसार मागास वर्ग ठरवण्यासाठी आयोग नेमण्याची तरतूद केली आहे. याशिवाय एखाद्या जातीला, जातीच्या भागाला अनुसूचित जाती, जमाती मध्ये समाविष्ट करण्यासंबंधी कलम ३४१ व ३४२मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

**राखीव जागांचा आधार -जात- सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण:-**

साधारणपणे जातींच्या आधारावर जागा दिल्या जातात असे म्हटले जाते. परंतु भारतीय राज्यघटनेत राखीव जागांचा आधार 'जात' असेल असे कोठेही स्पष्ट केले नाही. किंवा कोणत्याही विशिष्ट जातीला विशिष्ट प्रमाणात राखीव जागा असा उल्लेख केला नाही. किंबहुना जातीच्या आधारावर राखीव जागा हे तत्त्वही राज्यघटनेत मान्य केले नाही. यासाठी पुढील दोन कलमांचा उल्लेख करता येईल.

"कलम १५ (४) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२)यातील कोणत्याही गोष्टी मुळे, नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्या करिता विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. "

"कलम १६ (४)या अनुच्छेदतील कोणत्याही गोष्टीमुळ,े राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागास वर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. "

वरील कलमांमध्ये कोठेही विशेष जातीचा उल्लेख नाही. तर 'सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्याा मागासलेला कोणताही वर्ग' आणि 'अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती' असा उल्लेख आहे. अनुसूचित जाती- जमाती म्हणजे कोणतीही एक विशिष्ट जात नव्हे तर तो जाती व जमातींचा समूह आहे. यावरून राखीव जागांचा आधार जात किंवा आर्थिक मागासलेपणा नसून सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण हाच आहे.

**सध्याची राखीव जागांची स्थिती :-**

राज्यघटनेतील राखीव जागांच्या तरतूदीवर आधारीत कायदे करुन केंद्र सरकार व राज्य सरकारांनी आपापल्या क्षेत्रात राखीव जागांची तरतूद केली आहे.

**(अ) केंद्रीय स्तरावर राखिव जागांचे प्रमाण :-**

(१) अनुसुचित जाती-१५ टक्के

(२) अनुसूचित जमाती-७.५ टक्के

(३) इतर मागास वर्ग-२७ टक्के

(४) आर्थिक आधारावर राखिव जागा(जानेवारी २०१९)-१० टक्के

भारतातील घटक राज्यांमध्ये राखिव जागांचे प्रमाण वेगवेगळे आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकालाप्रमाणे ५० टक्क्यांपेक्षा अधिक जागा राखिव ठेवता येत नसल्या तरी अनेक राज्यांनी या निकालाचे पालन केल्याचे दिसत नाही. उदा. तामिळनाडू मध्ये ६९ टक्के जागा राखीव ठेवल्या आहेत आहे तर हरियाणा मध्ये ७० टक्के जागा राखीव आहेत.

**(ब) महाराष्ट्रातील राखीव जागांचे प्रमाण:-**

| जाती जमाती | राखीव जागांचे प्रमाण | समाविष्ट जातींची संख्या |
|---|---|---|
| -अनुसूचीत जाती (S.C) | 13% | (59 जाती) |
| -अनुसूचीत जमाती (S.T) | 07% | (47 जमाती) |
| -इतर मागास वर्ग (OBC) | 19% | (346 जाती) |
| -विशेष मागास वर्ग (SBC) | 02% | (07 जाती) |
| -भटक्या जाती (अ) ( V.J) | 03% | (14 जमाती) |
| -भटक्या जमाती (ब) NT- B | 2.5% | (28+7 जमाती) |
| -भटक्या जमाती (क) NT- C | 3.5% | (1 जात-धनगर) |
| -भटक्या जमाती (ड) NT- D | 02% | (1 जात-वंजारी) |

**राखीव जागांना विरोध** :-

ब्रिटिश काळात मुस्लिम ॲग्लोइंडियन इत्यादिंना राखीव मतदारसंघ दिले होते. याच आधारावर गोलमेज परिषदेच्या माध्यमातून अथक परिश्रमाने अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ मान्य करून घेतला. त्याला महात्मा गांधीजींनी आमरण उपोषणाने विरोध केला. शेवटी सर्वसाधारण मतदारसंघात राखीव जागाचे तत्व मान्य केले आणि पुढे भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती -जमातीना राखीव जागांची तरतूद करण्यात आली. परंतु त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांची मानसिकता जातीयवादीच असल्याने त्याची योग्य अंमलबजावनी झाली नाहीच परंतु राखीव जागाना उच्च वर्णीय आणि वर्गीय लोकांकडून सातत्याने विरोध होत आहे. कालपर्यंत आमचा गुलाम म्हणून लाचारीचे जीवन जगत असलेली या वर्गातील मुले शिक्षण घेऊनं अधिकारी बनत आहेत. सवर्णांची बरोबरी करीत आहेत. आर्थिक दृष्टीने प्रगत होत आहेत. हे अनुसूचित जाती-जमातींचा तिरस्कार करणाऱ्या सवर्ण व उच्चवर्गीय अधिकारी व अभिजन वर्गाला सहन होत नाही. त्यातूनच त्यांनी आपल्या पायरीन राहिले पाहिजे या मानसिकतेतून सातत्याने मागासवर्गांच्या राखीव जागांना विरोध केला जात आहे. राखीव जागांना हिंसात्मक स्वरूपाने प्रथम गुजरातमध्ये विरोध झाले. येथे मेडिकल सारख्या उच्च शिक्षणसंस्थातील राखीव जागांच्या विरोधात हिंसात्मक आंदोलन करण्यात आले. त्यानंतर देशपातळीवर १९९२ मध्ये मंडल आयोगाच्या अंमलबजावणी करण्याचे घोषित करण्यात आले. नंतर मोठी दंगल उसळली.

munotes.in

मंडल आयोग इतर मागासवर्गीयांसाठी होता परंतु इतर मागास वर्गातील तरुणच सवर्णांच्या बाजून सहभागी झाले होते. त्यानंतर आजपर्यंत देशाच्या प्रत्येक राज्यात काही ना काही निमित्ताने राखीव जागाविरोधी आंदोलन होत आहे. राखीव जागांमुळे युवक बेरोजगार झाले आहेत. राखीव जागांमुळे सवर्ण वर्गातील मुलांना मागास वर्गातील मुलांपेक्षा अधिक किंवा ९९ टक्के गुण मिळूनही उच्च शिक्षणात प्रवेश मिळत नाहीत. राखीव जागातून तयार झालेले इंजिनीयर, डॉक्टर अत्यंत निकृष्ट दर्जाचे असतात इत्यादी प्रकारचे तिरस्कारपूर्ण गैरसमज समाजात पसरवले जातात. त्यातूनच सवर्ण बेरोजगार युवकांमध्ये मागास वर्गाबद्दल चीड निर्माण होते. समाजात जातीय तणाव- संघर्ष निर्माण होण्यास मदत होते. महाराष्ट्रात आतापर्यंत ब्राह्मण व मराठा जातींकडून राखीव जागांना विरोध होत होता आता याच जाती राखीव जागांची मागणी करीत आहेत. त्यासाठी आपण सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागास असल्याचे पुराव्यासह सिद्ध करीत आहेत. काही लोक तर राखीव जागा हया घटनेच्या कलम १४ मध्ये सांगितलेल्या समतेच्या तत्वाच्या विरोधात आहेत म्हणून त्या रद्द केल्या पाहिजेत अशीही मागणी केली जात आहे. थोडक्यात राखीव जागांच्या उगमापासून ते आतापर्यंत राखीव जागांना सातत्याने विरोध होत आहे.

**<u>सारांश:-</u>**

असे असले तरी राखीव जागांच्या माध्यमातून विकासाच्या सर्व क्षेत्रात नाकारलेल्या अनुसूचित जाती- जमाती इतर मागासवर्ग भटके-विमुक्त वर्ग यांची न भूतो न भविष्य अशी शैक्षणिक व आर्थिक प्रगती होत आहे. हीच प्रगती पाहून आपणासही राखीव जागा हव्यात अशी मागणी प्रस्थापित व प्रतिष्ठित वर्गाकडून जातींकडून केली जात आहे. आणि त्यातूनच राखीव जागांना विरोध करणारेच राखीव जागांचे महत्व अधोरेकीत करीत आहेत. त्यामुळे राखीव जागा विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धोरण ही त्यांची दूरदृष्टी स्पष्ट करते.

**आपली प्रगती तपासा**

(१) राखीव जागांची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

(२) राखीव जागा संबंधीच्या घटनात्मक घटनात्मक तरतुदी स्पष्ट करा.

(३) मंडल आयोगाच्या महत्त्वाच्या शिफारशी सांगा.

(४) काकासाहेब कालेलकर आयोगावर टीप लिहा.

(५) मराठा आरक्षणावर टीप लिहा.

(६) आरक्षणाचा आधार जात की आर्थिक मागासलेपण यावर भाष्य करा.

## ३.२ धर्म (जमातवादाच्या संदर्भात)

**<u>उद्दिष्टये</u>**

(१) भारतातील जमातवादाची समस्या समजावून घेणे.

(२) जमतवादाची कारणे व परिणाम यांचा अभ्यास करणे.

(३) जमातवादी प्रवृत्ती कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील यांची चर्चा करणे.

**<u>प्रस्तावना</u>** :-

धर्म ही मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. मानवी समाजाचे आणि मानवी स्वभावाचे नियंत्रण धर्म या संस्थेमार्फत केले जाते. कोणत्याही समाजातील कोणतीही व्यक्ती धर्माच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकत नाही. मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत त्याचा धर्माशी संबंध आलेला असतो. धर्म हा श्रद्धा, आशा, प्रेरणा यांचे प्रतिक आहे. मानवाला सभोवतालचा निसर्ग व त्याच्याशी संबंधित असलेले गुढ, जन्ममृत्यू व मृत्युनंतरचे आस्तित्व, निसर्गाचा, विश्वाचा निर्माता याविषयी जाणून घेण्याची ओढ आहे. त्याच्या प्रश्नांची तात्पुरती उत्तरे धर्म देतो म्हणूनच धर्माचा श्रद्धा आणि भावनेशी संबंध जोडला जातो त्यातूनच पाप-पुण्य, स्वर्ग-नर्क, पवित्र-पवित्र, लोक- परलोक या संकल्पनांचा उदय सर जेम्स फ्रेझर यांच्या मते 'धर्म म्हणजे मनुष्यहून श्रेष्ठ असलेल्या शक्तींची आराधना व संतुष्टीकरण. या शक्ती मानवी जीवनाला मार्गदर्शन करतात व नियंत्रित करतात अशी मानवाची श्रद्धा असते. ' तर रवींद्र मुखर्जी यांच्या मते 'धर्म म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या अलौकिक अतीमानवी व असामाजिक शक्ती वरील श्रद्धा होय. या श्रद्धेच्या मुळाशी भय, विश्वास, भक्ती व पवित्र्याविषयी धारणा असून त्यांची अभिव्यक्ती प्रार्थना, पूजा, आराधना याद्वारे होते.

वरील व्याख्यांचा विचार करता धर्म ही संकल्पना व्यापक आहे. आशयाच्या दृष्टीनेही जगातील सर्व भागात सारखीच आहे. परंतु ईश्वरापासून इतर सर्व बाबींकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न आहे. आराधना करण्याचे सगुणनिर्गुण, मूर्त-अमूर्त तसेच जीवनासंबंधीचे तत्वज्ञान धार्मिक आचरण-व्यवहार इत्यादी पद्धती इतिहासाच्या वेगवेगळ्या काळात व विश्वाच्या वेगवेगळया भागात वेगवेगळ्या पद्धतीने निर्माण झालेल्या आहेत. त्यातूनच अनेक धर्मांची निर्मिती झाली. धर्म श्रद्धेची संबंधित असल्याने आपलाच धर्म श्रेष्ठ समजून त्याच्या प्रचार-प्रसारासाठी अहिंसात्मक आणि हिंसात्मक मार्गाचा अवलंब करण्यात येतो. धर्म पंडितांचा स्वार्थ आणि अतिरेकी स्वधर्माभिमान यामुळे धार्मिक व सांप्रदायिक संघर्ष सुरू झाले. अलीकडील काळात धार्मिक भावना व श्रद्धांच्या आधाराने सत्ता संपादनाचा सहज मार्ग दिसू लागला त्यातूनच जमातवादाचा जन्म झालेला आहे.

**<u>जमातवादाचा अर्थः-</u>**

जमातवाद ही संकल्पना वांशिक राजकारण, धार्मिक कट्टरता, धर्मांधतेचा विशिष्ट समूहाच्या हितसंबंधाच्या बाजूने तर दुसऱ्या समूहाच्या विरोधात स्वच्छ करणारे साधन आहे धर्म आणि राजकारण यांची सांगड घालून सत्तासंपादनासाठी घडवून आणलेला धार्मिक संघर्ष तणाव अशा स्थितीला जमातवाद असे म्हणतात धर्माच्या आधारावर लोकांच्या श्रद्धा भावना यांना आव्हान करून लोकांना संघटित केले जाते दुसऱ्या धार्मिक समाजाच्या विरोधात त्यांना चेतवले जाते. प्रसंगी धार्मिक दंगली घडवून आणल्या जातात. यात बळी गेलेल्यांना शहीद म्हणून घोषित केले जाते. धर्म रक्षणासाठी अशी आहुती द्यावी लागेल अशी मानसिकता तयार केली जाते. इतकेच नव्हे तर धार्मिक संघर्ष व तणाव सातत्याने राहील यासाठी प्रयत्न केले जातात. थोडक्यात सत्तेसाठी लोकांच्या धार्मिक भावना भडकावून त्यांचा राजकारणासाठी वापर करणे म्हणजे जमातवाद होय. जमातवादी राजकारणात धर्मग्रंथ, प्रार्थनास्थळे, मंदिरे, कालबाह्य रुढी, परंपरांचे समर्थन, इतिहासाचे उदात्तीकरण इत्यादींचा उपयोग केला जातो.

धार्मिक संघर्ष जमातवादी राजकारण हा केवळ भारताचा प्रश्न राहिलेला नसून त्याचा संसर्ग जगातील अनेक देशांना होत असून जमात वादाला वैश्विक स्वरूप प्राप्त होत आहे. उदा. श्रीलंकेत सिंहली बौद्ध विरुद्ध मुस्लिम, मुस्लिम देशांमध्ये शिया विरुद्ध सुन्नी म्यानमारमध्ये बौद्ध विरुद्ध रोहिंग्या मुसलमान असे असले तरी भारतातील प्रमुख जमातवादी राजकारणाची तीव्रता आणि प्रभाव अलिकडील काळात सतत वाढत असल्याचे जाणवत आहे. जयंत गडकरी यांनी 'हिंदू-मुस्लीम समाजवादाचा पंचनामा' या पुस्तकात भारतातील जमातवादाचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे. ' मुळात जमातवाद हा सामान्य जनतेच्या धर्मनिष्ठेतून



munotes.in

नव्हे तर वरिष्ठ वर्णिय, वर्गीय उच्चभ्रू मध्यमवर्गीय यांच्या व्यक्तीगत स्वार्थी स्पर्धेतून झालेला आहे. स्वार्थाकरता प्रस्तूत केलेल्या विकृत इतिहासावर, सामाजिक हित संबंधाबाबत निर्माण केलेल्या गैरसमजूतीवर, धार्मीक अस्मितांच्या गैरसमजावर हिंदू-मुस्लीम जमातवाद आधारित आहे. जमातवाद मानव समूहांच्या धार्मिक अस्मितेचा दूरोपयोग करुनच जगू शकतो. जमातवाद हा केवळ धर्म या घटकाला महत्त्व देतो परंतु त्या एकाच धर्मातील विविध घटकांच्या लोकांचे प्रश्न वेगवेगळे असतात या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. असे स्पष्ट करून ते म्हणतात, " सर्वसामान्य जनतेचे पोटापाण्याचे आर्थिक प्रश्न, लोकशाही हक्कांचे स्वातंत्र्याचे आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रश्न यावरचे सर्वसामान्य लोकांचे लक्ष उडविणे हाच जमातवादाचा उद्‌देश्य असतो. या हेतूने धार्मिक परंपरा, चिन्हे, खूना, दंतकथा, वास्तू यांच्याबद्दलच्या प्रचारावर जोर देउन सर्वसामान्य माणसाच्या धार्मिक अस्मिता चेतवने, अहंकारांना जागृत करणे आणि जमल्यास विविध धर्मिय सामान्य माणसात फूट पाडून त्यांना ऐकमेकांविरोधात 'आपण आणि ते' अशा छावण्यात विभागून विरोधी पावित्र्यात उभे करणे हेच हेच जमातवादाचे ध्येय असते. अशा रीतीने पेटवलेला जमातवादाचा अंगार जातीय दंग्याचे स्वरूप घेतो आणि तो सामान्य माणसात पसरतो. बहुसंख्याकाचा जमातवाद लोकशाही, स्वातंत्र्य, मानवतावादी मूल्ये पायदळी तुडवणाऱ्या फॅसिजम कडे जातो. तर अल्पसंख्यांकाचा जमातवाद कोंडीत पकडले भावनेतून सुडबुद्धिने प्रेरित झालेल्या अराजकी कृत्याकडे वळतो. दुसऱ्या धार्मिक समूहाकडे जमातवाद 'माणसे'म्हणूनच पाहायला नाकारतो.

अशाप्रकारे जमातवाद लोकांच्या धार्मिक भावना व श्रद्धांना खतपाणी घालून धार्मिक दंगली घडवून आणतो. त्याचवेळी त्यातून उच्चवर्गीय व वर्णिय लोक सामान्य माणसाच्या हक्क, स्वातंत्र्याबरोबरच जीवन-मरणाच्या प्रश्नाकडे ही दुर्लक्ष करतो. अशी ही समाजवादाची संकल्पना आहे.

भारतात विविध धर्माचे लोक राहत असले तरी हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मातील संबंध सातत्याने तणावपूर्ण राहिलेले आहेत म्हणून भारतात मुस्लिम जमातवाद आणि हिंदू समाजवाद हे दोन प्रकार ठळकपणे दिसून येतात.

**<u>मुस्लिम जमातवाद</u>** :-

भारतात ब्रिटिश राजवटीच्या विरोधात स्वातंत्र्यलढयात हिंदू आणि मुसलमान यांनी परस्परांच्या हातात हात घालून सहभाग घेतला त्यामुळे ब्रिदिशांना या देशावरील दिर्घकाळ सत्ता टिकवून ठेवणे अशक्य वाटू लागले. त्यामुळे त्यांनी 'फोडा आणि झोडा' या धोरणाचा अवलंब करून हिंदू आणि मुस्लिमांमध्ये फूट पाडली. याला जसे मुसलमान बळी पडले तसेच हिंदूही बळी पडले. जी राष्ट्राची संकल्पना मांडली त्यातच या फूटीची बिजे आहेत. जॉन स्टुअर्ट मिल यांनी 'समान वंश, धर्म, भाषा, संस्कृती, इ. कारणावर जेव्हा एखाद्या समूहात ऐक्याची भावना निर्माण होते, तेव्हा समूह म्हणजे राष्ट्र होय. '' अशा अर्थाची व्याख्या केली. याचा आधार घेऊन देशी-विदेशी सर्वच अभ्यासक व लेखकांनी लेखन केले. हिंदु व मुसलमान एक राष्ट्र नसून ही दोन राष्ट्रे आहेत. असे मांडणी १९२३ मध्ये डब्ल्यू होल्डरनेस यांनी केली. भारताच्या संदर्भात ते म्हणतात ऐतिहासिक, वांशिक, भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि स्वाभाविक अशा सर्व दृष्टीने मुस्मिम लोक हे हिंदूंपेक्षा वेगळे आहेत. आपली वेगळी अस्मिता आहे आणि आपले स्वत:चे वेगळे भवितव्य आहे अशी मुसलमानांमध्ये भावना आहे. आणि हिंदू आणि मुस्लीम कधीही एक राष्ट्र म्हणून एकत्र राहिले नाहीत आणि हे दुभंगलेले दोन्ही समाज भविष्यकाळात कधीही एकत्र येऊ शकत नाहीत. भारतातील हिंदू मुस्लिम यांच्यात वांशिक एकात्मता नव्हती. त्याचा ऐतिहासिक वारसाही सारखा नाही, त्यांची भाषाही सारखी नाही. मुस्लिमांची पवित्र स्थाने भारताबाहेर आहेत. म्हणून भारत हे एक राष्ट्र आहे अशी संकल्पना

पवित्र भूमिच्या पायावर उभी राहू शकत नाही. '' होल्डरनेस यांनी हा द्विराष्ट्रवादाच्या मांडलेल्या या सिद्धांताला नंतर वि. दा. सावरकर आणि बॅरिस्टर जीना यांनीही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संमती दिली. हिंदू-मुस्लीम यांच्यातील दरी वाढते गेली. यापूर्वी १९०९ मध्ये ब्रिटिशांनी मुस्लिमांना राजकीय क्षेत्रात स्वतंत्र मतदार संघाबरोबरच काही खास सवलती दिल्या. मुस्लिमांचे वेगळेपण अधोरेखित केले. परंतु १९०६ मध्ये धार्मिक आधारावर स्थापन झालेल्या मुस्लिमांना विशेष सवलती मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या मुस्लिम लीग ला १९३७च्या निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही त्यामुळे १९४० मध्ये बॅरिस्टर जीना यांना स्वतंत्र मुस्लिम राज्याची म्हणजेच पाकिस्तानची मागणी केली. झेड. ए. झुलेरी यांनीही यापूर्वी 'हिंदू गेले हजारो वर्ष होते मुस्लिमांचे गुलाम होते अशा गुलामांवर राज्य सोपवता येणार नाही.' असे ब्रिटिश साम्राज्यवादयांना आवाहन केले होते. याचा अर्थ असा की स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी मुस्लिमांना विशेष दर्जा व सवलती देऊन हिंदूंपासून वेगळे केले. त्याला हिंदू नेत्यांनी पाठिंबाच दिला. आणि शेवटी भारताचे स्वातंत्र्य फाळणीच्या स्वरूपात मिळाले. फाळनी नंतर भारतातील मुस्लिम सतत असुरक्षित राहतील अशी परिस्थिती हिंदु नेत्यांबराबरोच मुस्लिम नेत्यांनी ही निर्माण केली. सातत्याने होणारे हिंदू-मुस्लिम दंगे आहे त्या परिस्थितीत भर टाकत होते. परस्परात द्वेष वाढत होता. बाबरी मज्जिद पाडल्यानंतर झालेले हिंदू-मुस्लीम दंगे हे हिंदू बरोबर मुस्लिम जमातवाद वाढविण्यास कारणीभूत ठरत आहेत. मुस्लिम नेते मुस्लिमांच्या असुरक्षित भावनेचा फायदा घेऊन त्यांना धर्माच्या आधारावर राजकीय दृष्टीने संघटित करीत आहेत. त्यातून मुस्लिम जमातवाद आलात चालना मिळत आहे.

**हिंदू-जमातवादः-**

'फोडा आणि झोडा' या ब्रिटिशांच्या राजकीय तंत्राला जसे मुस्लिम बळी पडले तसेच हिंदू नेतेही या जा जाळ्यात अडकले. ब्रिटिश सरकार मुस्लिमांचा अनुनय करीत असून हिंदूना जाणीवपूर्वक डावलले जात आहे असा आरोप ब्रिटिशांवर करण्यात येऊ लागला. त्यातूनच हिंदूंना धर्म, संस्कृती या आधारावर संघटित करण्याचे प्रयत्न होऊ लागले. त्यातून १९२५ मध्ये बळीराम हेगडेवार यांनी (RSS) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. संघाची स्थापना १९२५ मध्ये असली तरी संघाने कट्टर हिंदुत्ववादी किंवा हिंदू संस्कृतिक राष्ट्रवादाची भूमिका १९३९ नंतर म्हणजे दुसरे सर संचालक गोळवलकर गुरुजी यांच्या कारकिर्दीत घेतली. त्यांनी हिंदुत्ववादी संकल्पनेची प्रेरणा सावरकरांकडून घेतली. १९२३ मध्ये बॅरिस्टर सावरकर यांनी 'हिंदुत्व' पुस्तक लिहून 'हिंदुत्व' विचारधारनेला गतिमान केले. राष्ट्रवादाची संकल्पना जन्मास घातली. हिंदू कोणाला म्हणावे या संदर्भात सावरकर म्हणतात, हिंदू तो की, ज्याला सिंधूपासून समुद्रापर्यंत पसरलेली सर्व भूमी पितृभूमी म्हणून अत्यंत प्रिय आहे. तसेच ते हिंदूचे एक वैशिष्ट्य सांगताना म्हणतात, समान इतिहास, समान वांगमय, समान कला, एकच निर्बंध विधान, एक धर्मव्यवहार शास्त्र सामाजीक यात्रा महोत्सव, सामायिक धार्मिक आचारविधी, सामायिक सन, सामायिक संस्कार, एवं गुण विशिष्ट अशी हिंदू संस्कृती, ती आपली वाटणे होय. '' सावरकरांच्या या व्याखेत धर्मांतरीत मुसलमान, ख्रिश्चन, बोहरी यांना स्थान नाही, ते धर्मांतरीत आहेत हे सावरकर मान्य करतात. परंतु त्याना वरील व्याखेने हिंदूत समाविष्ट करता येत नाही. त्यामुळे ते हिंदु नाहीत. आणि म्हणून त्यांना हिंदू राष्ट्रात जागा देण्यास ते तयार नाहीत. अशा वर्गांनी हिंदू राष्ट्रात रहायवयाचे असेल तर त्यावर गोळवलकर गुरुजी असा तोडगा सुचवितात कि, 'हिंदू नसाणाऱ्या सर्वांनी एक तर हिंदू संस्कृती, हिंदू भाषा, यांचा स्विकार केला पाहीजे'. हिंदू धर्माबद्दल पराकोटीचा आदर बाळगला पाहिजे. हिंदू वंश, हिंदू संस्कृती हयांचे गुणगान केले पाहिजे. हिंदू धर्माबद्दल त्यांच्यात असलेली असहनशिलतेची भावनाा सोडली पाहिजे. हिंदु धर्मियांनी केलेल्या उपकारा बद्दल असणारा अनादर सोडला पाहिजे. या भूमिबद्दल उपकृत राहिले पाहिजे. या भूमितील जुन्या परंपरा आणि संस्कृतीचा

आदर बाळगला पाहिजे. निश्चितपणे प्रेम आणि शरणागतीची, एकरुपतेची भक्तीभावना बाळगली पाहिजे.'' गोळवलकरांच्या या विचारावरुन धर्मांतरीत मुसलमान व इतर धर्मियांबद्धल त्यांच्या मनात तिरस्काराची भावना असून त्यांनी इथल्या हिंदूच्या दहशतीखाली रहावे, इतकेच नव्हे तर ते हिंदूराष्ट्रात दुयम नागरीक म्हणूनच राहतील, हिंदूच्या दयेवर जगतील अशी कट्टर हिंदूत्ववादी भूमिका घेतली होती. पुढील काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या संघटनेचे भारतभर जाळे पसरवून अशाच विचारधारेचा प्रसार केला. हि विचारधारा त्या आधारावर राजकीय सत्ता मिळविण्यासाठी जनसंघ-जनता पक्ष, रामजन्मभूमी, घरवापसी, गोवंश हत्याबंदी, लव्ह जिहाद, इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून हिंदूना संघटित करण्याचा व हिंदूना संघटीत करणे हा हेतू असला तरी मुस्लिम जनसमुदायाविरुद्ध द्वेष र्निमाण करणे हाही छुपा अजेंडा आहे. त्यामुळेच गोमांसभक्षण, गोवंश हत्या या निमित्ताने मुस्लिम समाजाला लक्ष करणे, मॉबलिचिंग सारख्या घटनातून त्यांची हत्या घडवून आणने. ख्रिश्चन धर्मगुरुंवर हल्ले करणे इ. प्रकारांना उत्तेजन दिले जात आहे. वास्तविक मुस्लिम व इतर धर्मियांच्या विरोधाच्या तत्वावरच हिंदू राष्ट्र, हिंदू राष्ट्रवाद, हिंदू सांस्कृतीक वाद आधारलेला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून प्रेरणा घेउनच विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यासारख्या शेकडो संघटना याच दिशेने काम करीत आहेत. आज याच विचारधारेचे प्रतिनिधित्व करणारा भारतीय जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आहे. तसेच २/३ राज्यांमधेही तो सत्तेत आहे. परिणामत: भारतात सातत्याने हिंदू मुस्लिम यात तणाव सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. हाच हिंदू जमातवाद असून भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इत्यादी क्षेत्रावर हिंदू जमातवादयांचा इतका प्रभाव आहे की, हिंदू राष्ट्राच्या निर्मितीसाठी भारताच्या राज्यघटनेलाच आव्हान देत आहेत. धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्कार करणारी ही राज्यघटना विश्व हिंदू परिषदेला मान्य नसून हिंदूत्वावर आधारीत राज्यघटना असावी अशी मागणी केली जात आहे. साधू, संन्याशी यांनी याच उद्देशाने राजकीय क्षेत्रात प्रवेश केला असून केंद्रीय मंत्री व मुख्यमंत्री पदावरही हिंदू साधूंना विराजमान केले आहे. याच्याकडून सातत्याने राजकीय सत्तेसाठी बिगर हिंदूच्या विरोधात वक्तव्ये करुन हिंदूच्या भावना चेतवण्याचे काम केले जात आहे. एकूणच मुस्मिम जमातवादा इतकाच हिंदू जमातवादाचा भारताच्या ऐक्याला व एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे.

**<u>जमातवादाची कारणे:-</u>**

हिंदू जमातवाद आणि मुस्लिम जमातवादावर केलेल्या चर्चेवरून भारतातील जमात वादाची काही प्रमुख कारणे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) **ब्रिटिश सरकारचे धोरण :-** हिंदू आणि मुस्लिम हे भारतातील दोन प्रमुख सांप्रदाय/धर्म असून त्यांचे ऐक्य ब्रिटिश सत्तेला धोका आहे, असा ब्रिटिशांचा निष्कर्ष होता. या शिवाय या दोन्ही धर्मातील आचार-विचारातील विसंगती स्पष्ट दिसत होती. त्याचा फायदा घेउन ब्रिटिश सरकारने हिंदू आणि मुस्लिम धर्मियांमध्ये फूट पाडण्यासाठी साहित्य र्निमितीपासून ते सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांचा उपयोग केला. त्यासाठी प्रथम मुस्लिमांना विशेष सवलतीसह राजकीय सत्तेत अधिक वाटा मिळण्यासाठी स्वतंत्र मतदार संघ र्निमाण केले. त्याला हिंदू धर्मिय संघटना व नेत्यांकडून विरोध होउ लागला. हिंदू आणि मुस्लिम जमातवादाचा उदय याच परिस्थितीतून झाला.

२) **हिंदूत्ववादी संघटना:-** मुस्लिम जमातवाद वाढीस लागण्यास जशी मुस्लिम लीग व तत्कालीन मुस्लिम नेते जबाबदार आहेत त्याचप्रमाणे हिंदू जमातवाद वाढीस लागण्यास तत्कालीन हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटना सह संघ परिवाराशी संबंधीत सर्व हिंदूत्ववादी संघटना कारणीभूत आहेत.

३) **भारताची फाळणी:–** धार्मिक जमातवादाचा अतिरेक झाल्यानेच भारताची फाळणी अटळ झाली. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी करून मुस्लिम धर्मियांना पाकिस्तान दिले त्यामुळे उर्वरित भारत हे हिंदूचे राष्ट्र म्हणजेच ते हिंदूराष्ट्र आहे अशी मांडणी हिंदूत्ववादी संघटनांकडून होउ लागली. याच कारणावरून त्यांचा धर्मनिरपेक्षतेला विरोध आहे. तसेच भारतातील मुस्लिमांबरोबर इतर धर्मियांनीही हिंदू धर्म, संस्कृतीचा आदर केला पाहिजे अशी मागणी या संघटनांकडून होउ लागली. त्यातच जमातवादाची भावना तीव्र होउ लागली. त्याचाच परिणाम इतर धर्मियांना दुय्यम नागरीकत्व राहील अशीही हिंदू जमातवादी संघटनांकडून मागणी केली जाते.

४) **धार्मिक दंगली :–** स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदू मुस्लिम धर्मियांमधे काही तणावग्रस्त परिस्थिती असली तरी दोन्ही धर्मियांमध्ये वाद झाले नाहीत परंतु १८५७ चे बंड आणि १९१९च्या जालियनवाला बाग हत्याकांड यावरील लक्ष हटविण्यासाठी ब्रिटिशांनी जाणिवपूर्वक अपप्रचार करून हिंदू - मुस्लिमांमध्ये दंगली घडवून आणल्या. विशेशत: कोहाट येथील १९२४ ची दंगल हे त्याचे ठळक वैशिष्टय होय. त्यानंतर स्वातंत्र्य व फाळणीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही धर्मियात पराकोटीची कटूता व तिरस्कार र्निमाण होउन दंगल उसळली, त्यानंतर १९६१ मध्ये अलिगढ मुस्लिम विदयापीठ, १९६३ जम्मू काश्मिर, १९६६ वाशिम, १९६८ आसाम, उत्तरप्रदेश, बंगाल, बिहार, अलहाबाद, १९६९ मध्ये अहमदाबाद, १९७० मध्ये मुंबई भिवंडी, १९९२ मुंबई, गुजरात इत्यादी दंगली झाल्या दृ गोहत्या, उर्दू भाषा, धार्मिक प्रार्थना स्थळे इत्यादी कारणावर या दंगली झाल्या व होत आहेत. स्वातंत्र्यानंतर अशा सातत्याने हिंदू - मुस्लिम दंगे होत असल्याने हया दोन्ही धर्मिय लोकांमध्ये परस्पर तिरस्कार, अविश्वासाचे संबंध निर्माण झाले यातूनच आपापल्या धर्मियांना एकत्र आणण्यासाठी व राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी धार्मिक आधारावर संघटना होउ लागल्या त्यातूनच जमातवादाला अधिक खतपाणी मिळू लागले.

५) **सत्तेची लालसा:–**राजकीय सत्तेवर आपले वर्चस्व असले पाहिजे किमान सत्तेत आपला सहभाग असावा असे प्रत्येक जात-जमात व सांप्रदाय समुहाला वाटते. त्यातूनच आपापल्या धर्मातील लोकांना संघटीत करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा वेळी लोकांच्या धार्मिक भावनांना आवाहन केले जाते. दुसऱ्या धर्माविषयी गैरसमज पसरवले जातात. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाच्याही अफवा पसरविल्या जातात. अनेक वेळा जाणीवपूर्वक धार्मिक दंगल घडवून आणली जाते. त्यातूनच सुरक्षिततेसाठी एक धर्मिय लोक एकत्र येतात. त्याचा राजकीय पुढारी गैरफायदा घेतात. सत्तेच्या लालसेसाठी स्वधर्मिय लोकांच्या जीविताचीही काळजी केली जात नाही.

६) **वाढती धर्मांधता:–** आधुनिक विज्ञान युगात विज्ञानवादी व विवेकवादी पीढी निर्माण होणे अपेक्षित आहे, आहे परंतु प्रत्यक्षात आपला धर्म, रूढी, परंपरा, संस्कृती जपण्याच्या नावाखाली राजकीय नेते तरुणपिढीला धर्मांध बनवित आहेत. धार्मिक अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक संस्थांमधून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष धार्मिक बाबींना प्राधान्य दिले जाते. मंदिर मज्जीद किंवा इतर धार्मिक स्थळांवर तणाव संघर्ष निर्माण करणे, साधू-संन्यासी यांचा राजकारणात प्रवेश होणे, धर्मा पुढे संविधानाचे श्रेष्ठत्व व अमान्य करणे, धर्माच्या संदर्भात भडकावू भाषण करणे, प्रसारमाध्यमातून सातत्याने धर्म संरक्षणाचा संदेश देणे, सर्वकाही धर्मच आहे असे वातावरण निर्माण करणे अशातून तरुण पिढी धर्मांधतेकडे वळत आहे त्याचा राजकीय नेते व पक्ष सत्तेसाठी वापर करून घेतात. धर्मांधता आहे जमातवादाचे महत्त्वाचे कारण आहे

७) **गुन्हेगारीचे उदात्तीकरण:-** विशेषत: धार्मिक दंगलीत सहभागी होणारे, घडवून आणणारे यांचे समाजात कौतुक केले जाते. बाबरी मज्जिद पाडली तेव्हा 'ती माझ्याच शिवसैनिकांनी पाडली' असे बाळासाहेब ठाकरे यांनी गर्वाने सांगून शिवसैनिकांची पाठ थोपटली. धर्मांधाने ग्रस्त झालेल्या जमातवादी गुंडानी जर इतर धर्मातल्या नव्हे तर वेळ प्रसंग स्वधर्मातल्या लोकांवर जरी अत्याचार केले तरी आपल्या जमातीच्या रक्षणासाठीच केले असे म्हणून त्या गुंडांना पाठीशी घातले जाते. दंगलीच्या काळात अशा कारवायांना ऊत येतो. थोडक्यात धार्मिक कारणावरून होणाऱ्या गुन्हेगारीचे उदात्तीकरण केले जाते त्यातूनच जमातवादाला प्रोत्साहन मिळते.

८) **प्रार्थना स्थळे:-** हिंदू-मुस्लीम जमातवादाचे भावनीक कारण म्हणजे त्यांची प्रार्थना स्थळे. हिंदू लोकांनी मुस्लिम प्रार्थना स्थळांवर, स्मारकावर सातत्याने संशय निर्माण केला आहे. काशी, मथुरा, आयोध्या इत्यादी ठिकाणीची मुस्लिमांची मस्जिद व धार्मिक स्थळे ही मंदिरे पाडून निर्माण केली आहेत, ताजमहल हा तेजोमहल आहे अशा प्रकारच्या गैरसमजूती पसरवून व धार्मिक भावना चेतवून धार्मिक दंगली घडवून आणल्या जातात. मस्जिद वरील भोंगे काढून टाकावेत, अशी मागणी केली जात आहे. मुस्लिम रस्त्यावर नमाज पडतात म्हणून हिंदूनीही रस्त्यावरच महाआरती करणे इत्यादी प्रकारामुळे लोकांच्या धार्मिक भावना भडकविल्या जातात. त्यांच्या राजकीय सत्तेसाठी फायदा करून घेतला जातो. १९९२ मध्ये रथयात्रा काढून व कारसेवकांना आवाहन करून बाबरी मज्जिद पाडण्यात आली. आणि १९९९ मध्ये भारतीय जनता पक्षाने केंद्रात सत्ता प्राप्त केली. आणि अटल बिहारी वाजपेयी हे पंतप्रधान झाले. जमातवादी राजकारणाचे हे उत्तम उदाहरण आहे. सध्याच्या सरकारने विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक जिंकली असे म्हटले जात असले तरी राम मंदिर उभारले जाईल याच आशाने हिंदुत्ववादी संघटनांनी बीजेपी चा प्रचार केला होता.

९) **हिंदू-राष्ट्र:-** पाकिस्तानच्या निर्मितीनंतर भारत हा हिंदू राष्ट्रच असून हिंदुत्व, हिंदू संस्कृती यांची जोपासना करणारे हिंदूंचेच सरकार सत्तेवर असावे अशी मांडणी हिंदुत्ववादी संघटना करीत आहेत. भारतीय राज्यघटना हिंदुत्वाचा पुरस्कार करणारी असावी अशी अपेक्षा केली जात आहे. "हिंदु राष्ट्राच्या" संकल्पनेच्या आधारावर सत्ता मिळविण्यासाठी हिंदु तरुणांना व मतदारांना संघटित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अशाप्रकारे जमातवादाची विविध कारणे असून जमातवादी नेते व कार्यकर्ते राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी सातत्याने नवनव्या कारणांचा शोध घेत असतात.

**जमातवादाचे परिणाम:-**

वास्तविक "जमातवाद" ही संकल्पना विशिष्ट धर्माची धर्मांधता वाढवणारी व इतर धर्मांचा द्वेष करण्यास शिकवणारी संकल्पना असल्याने तिचे अमर्याद दोष आहेत. जमातवादाचे काही प्रमुख परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) जमात वादामुळे धर्मांधतेत वाढ होऊन समाजात कायम स्वरूपात तणावग्रस्तता निर्माण होते.

२) जमात वादामुळे सामाजिक एकात्मतेला धोका निर्माण होतो.

३) जमात वादामुळे राष्ट्रीय एकता व अखंडता धोक्यात येऊ शकते.

४) धर्मांधता हा जमातवादाचा महत्त्वाचा गाभा असल्याने धार्मिक दंगलींना प्रोत्साहन मिळते व शांतता, कायदा व सुव्यवस्था धोक्यात येते.

५) जमातवादामुळे भारताच्या धर्मनिरपेक्षतेला भारतीय संविधानाला धोका निर्माण झाला आहे.

६) जमात वादामुळे लोकशाही राजकीय व्यवस्था व राजकीय विचारप्रणाली वरील लोकांचा विश्वास कमी होण्याचा धोका आहे.

७) जमातवादामुळे लोकांच्या विकासाच्या मुद्द्याकडे व व्यावहारिक समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. उदा. युवकांची बेरोजगारी, शिक्षण पायाभूत सुविधा इ. बाबींना धर्मांधतेचे पुढे गौन स्थान दिले जाते.

८) सहिष्णुता भारतीय समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्या आहे. आम्ही आमची मते, भावना यांच्याइतकेच दुसऱ्याची मते व भावना यांना महत्त्व देतो त्यामुळे समाजात शांतता व परस्पर सहकार्य सलोखा राखला जातो. जमात वादामुळे त्याला धोका निर्माण होतो.

अशाप्रकारे जमातवादाचे भारतीय समाजावर दीर्घकाळ दुष्परिणाम होऊ शकतात.

**<u>भारतीय राज्यघटना आणि जमातवाद</u>**

भारताला जमातवादी राजकारणामुळे मोठे नुकसान सहन करावे लागले आहे धर्मांधता, धार्मिक संघर्ष यामुळे भारताची फाळणी झाली आहे. या धक्क्यातून भारत सावरत असताना धर्माचा राजकारणासाठी वापर करून राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झालेला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे भारताच्या राज्यघटनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी न होणे हेच आहे.

भारताची राज्यघटना ही भारताच्या प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्यायाची हमी देते. भारतात विविध जाती, जमाती, धर्म, रूढी, परंपरा, संस्कृती, चालीरीती आहेत. त्यांची जपणूक करताना कोणताच धर्म राष्ट्रीय विकासाच्या आड येणार नाही, याची दक्षता घटनाकारांनी घेतली आहे. त्यासाठीच भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारले आहे. त्याप्रमाणे-

१) भारताचा कोणताही अधिकृत धर्म असणार नाही.

२) अल्पसंख्यांक धर्म असो असो किंवा बहुसंख्याकांचा धर्म असो सर्व धर्म समान मानने व सर्व धर्मांना समान वागणूक देणे.

३) बहुसंख्यांक धार्मिक वर्चस्व वादापासून अल्पसंख्यांकांचे संरक्षण करण्यासाठी अल्पसंख्यांकांना विशेष संरक्षण देणे.

थोडक्यात भारतीय राज्य घटनेने सर्व भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे त्यानुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला कायद्याच्या चौकटीत राहून आपल्या धर्माचे पालन करण्याचा, आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार दिलेला आह.े थोडक्यात राज्यघटनेने धर्म ही व्यक्तिगत बाब मांडली असून सार्वजनिक जीवनात व्यक्तीने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे पालन करावे अशी घटनाकारांनी अपेक्षा केली आहे. परंतु अलीकडील काळात धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाकडे दुर्लक्ष करून धार्मिकतेला अधिक महत्त्व दिले जात आहे. अलीकडेच 'हिंदुत्व' हा धर्म नसून जीवनपद्धती आहे असा निकाल दिल्याने काही प्रश्न निर्माण झाले आहेत. उदा. हिंदुत्व जीवनपद्धती असेल तर इस्लाम, ख्रिश्चन ही सुद्धा जीवनपद्धती आहे. त्यामुळेच धर्माच्या आधाराने राजकारणात मते मागण्याची सोय निर्माण झाली आहे. त्याचा धर्माच्या आधारावर राजकारण पक्षानी गैरफायदा घेण्यास सुरुवात केली आहे. धर्म, जात या आधारावर राजकारण करता येणार नाही असे घटनेचे बंधन असतानाही आज उघडपणे धर्माचा राजकारणासाठी वापर केला जात आहे. हे घटनाविरोधी आहे. थोडक्यात जमातवाद मग तो हिंदु असो की मुस्लिम बहुसंख्याकांचा असो तो घटना विरोधीच आहे.

भारतात समता, बंधुभाव, शांतता, सुव्यवस्था, सामाजिक, धार्मिक सलोखा, ऐक्य निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षता हे तत्व अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु स्वार्थी जमातवादी राजकारणाने या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाबरोबरच भारतीय राज्यघटनेलाही आव्हान दिले आहे.

**जमातवादी प्रवृत्ती कमी करण्यासाठी:-**

१) भारतीय राज्यघटने मधील धर्मनिरपेक्ष मूल्यांची जोपासना करण्यासाठी प्रयत्न करणे.

२) धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी व परमत सहिष्णुता वृत्ती वाढीस लागावी या दृष्टीने प्रसार माध्यमांनी महत्त्वाची भूमिका बजावणे आवश्यक आहे.

३) शैक्षणिक संस्था, अभ्यासक्रम इत्यादींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर 'सर्वधर्मसमभाव' या संबंधांचे संस्कार करणे. या दृष्टीने अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक संस्थांमधील शैक्षणिक उपक्रम व अभ्यासक्रम त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर बहुसंख्यांचा जमातवाद रोखण्यासाठी त्यांनी चालविलेल्या शैक्षणिक उपक्रमावर मर्यादा घालणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्थांमधून घटनात्मक मूल्यांवर भर देणे आवश्यक आहे.

४) व्यक्तीच्या जडणघडणीची सुरुवात कुटुंबापासून होते. जमातवादाचे परिणाम आज इतर कुटुंबावर होत आहेत. भविष्यकाळात आपले कुटुंबही जमातवादाचे बळी पडू शकते, याची जाणीव ठेवून आई-वडिलांनी आपल्या मुलांवर धर्मनिरपेक्षतेचे व सर्वधर्मसमभावाचे संस्कार करणे आवश्यक आहे.

५) बेरोजगार युवक जमातवादाच्या प्रचाराला बळी पडतात. म्हणून बेरोजगार, द्रारिद्र यासारख्या समस्या सोडविण्यावर भर देणे आवश्यक आहे.

६) भारतीय राज्यघटनेने जात, धर्म या आधारावर निवडणूका लढविण्यास प्रतिबंध घातला आहे. त्याची योग्य अंमलबजावणी आवश्यक आहे. जात धर्माच्या आधारावर केवळ निवडणूक लढविणेच नव्हे तर त्या आधारावर मते मागणाऱ्या उमेदवाराची उमेदवारीही रद्द करण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

७) सरकारनेही विशिष्ट धर्माचा अनुनय न करता सर्व धर्मांना समानतेची वागणूक देण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. याच दृष्टीने सर्वधर्मीय लोकांशी चर्चा करून " समान नागरी कायद्याची" अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

अशा अनेक उपाययोजना करणे शक्य आहे आहे. त्यासाठी शासन-समाज, राजकीय पक्ष, संघटना यांनी सामंजस्य व सहकार्याने काम करणे आवश्यक आहे.

**सारांश:-**

धर्माला अतिरेकी महत्त्व देणारी, धर्मांधता पसरविणारी व इतर धर्माच्या द्वेषावर आधारलेली, व्यक्तीची आणि समूहाची मानसिक अवस्था म्हणजे 'जमातवाद' होय. याच जमातवादाच्या अतिरेकी पणामुळे भारताची फाळणी झाली आहे. विशेष म्हणजे यातून कोणताही धडा न घेता राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी धर्माचा वापर केला जात आहे. त्यासाठी तरुणांमध्ये धर्मांधता पसरवून दंगली घडवून आणण्याचा प्रयत्न होत आहे. त्याचा राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होत आहे. अशी ही जमातवादी संकल्पना राज्यघटनाविरोधी आहे.

munotes.in

**आपली प्रगती तपासा:-**

१) जमातवादाचा अर्थ व व्याख्या स्पष्ट करा.

२) हिंदू जमातवाद व मुस्लिम जमात वाद या संकल्पना स्पष्ट करून या जमातवादांचा विकास कसा झाला ते लिहा.

३) भारतातील जमातवादाची कारणे कोणती?

४) समाजवादाचे परिणाम स्पष्ट करा.

५) 'जमातवाद आणि भारतीय राज्यघटना'यावर भाष्य करा.

## ३.३ लिंगभाव (राजकीय सहभागाच्या संदर्भात)

**उद्दिष्टे:-**

भारताने राज्यघटनेच्या माध्यमातून संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. संसदीय लोकशाहीत लोकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण संसदीय लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेच्या हातात असते. भारतीय राज्य घटनेने प्रत्येक स्त्री-पुरुष नागरिकाला सर्व प्रकारचे हक्क समानतेने दिले आहे. असे असले तरी भारतात आजही स्त्रियांचा राजकारणातील सहभाग आहे. यादृष्टीने स्त्रियांच्या अल्प सहभागाची कारणे कोणती? स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारांनी केलेले प्रयत्न, स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, या सर्व बाबींचा आढावा घेणे हे या प्रकरणाचे उद्देश आहेत.

**प्रस्तावना:-**

जगातील बहुसंख्यांक देशांप्रमाणे भारतातही पुरुष प्रधान संस्कृती आहे. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातही पुरुषांचे वर्चस्व आहे भारतात स्त्रीला देवी आणि सामर्थ्याचे प्रतीक मानले जात असले तरी व्यवहारात रूढी-परंपरांच्या माध्यमातून स्त्रियांना पुरुषांपेक्षा निम्न स्तरावर ठेवून तिला दुय्यम दर्जा दिला आहे. मनुस्मृती या ग्रंथांमध्ये स्त्रियांना परावलंबी व पुरुषांच्या मर्जीवर अवलंबून राहण्याचा सल्ला दिला आहे. स्त्रिला कोणत्याही प्रकारचे नाही असे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. धर्मग्रंथ आणि सामाजिक, धार्मिक चालिरीतींनी स्त्रीयांना पराधीन बनविले आहे. त्यामुळे स्त्रियांना शिक्षणासह विकासाच्या सर्व क्षेत्रापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले आहे.

स्वातंत्रपूर्व काळात व स्वातंत्र्यउत्तर काळात अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्याचा, स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबविण्याचा, रूढी-परंपरांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, राजाराम मोहन राय, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी इ. समाजसुधारकांचा समावेश होतो. त्यांनी सती पद्धती, बालविवाह, स्त्रियांचे केशवपन, विधवा पुनर्विवाहाला विरोध इत्यादी स्त्रियांना गुलाम बनविणाऱ्या व त्यांच्या अमानुष छळ करणाऱ्या रूढी-परंपरा यांना विरोध करून स्त्रियांच्या शिक्षणाबरोबरच सर्वच क्षेत्रात विकासाची संधी मिळवून देण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम म्हणजे स्त्रिया शिक्षण घेऊन स्वावलंबी होऊ लागल्या. सार्वजनिक क्षेत्रात समाजाचे प्रतिनिधित्व करू लागल्या.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याात सहभाग घेऊन स्त्रियांनी आपण पुरुषांपेक्षा कमी नाही हे सिद्ध केले परंतु देश सेवा आणि सार्वजनिक क्षेत्रात स्त्रिया कार्यक्षमतेने कार्य करू शकतात हेही सिद्ध केले. स्वातंत्र्याच्या चळवळीत उच्चवर्गीय स्त्रियांबरोबरच मध्यमवर्गातील स्त्रियांनीही सहभाग घेतला होता. यात ॲनी बेझंट, अवंतिकाबाई गोखले, सरोजिनी नायडू, कमला देवी चटोपाध्याय, कॅप्टन लक्ष्मी सहगल, कल्पना दत्त, अरुणा असफ अली, उषा मेहता इ. अनेक महिला स्वातंत्र्यसेनानींचा समावेश होतो.

स्वातंत्र्याच्या चळवळी बरोबरच सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही त्यांनी सहभाग घेतला होता. अर्थातच याची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्यापासून होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या सुधारणेच्या चळवळीत स्त्रीयांनी सहभाग घेतला होता. यात सीताबाई गायकवाड, शांताबाई दानी, रमाबाई जाधव यांचा उल्लेख करता येईल.

स्वातंत्र्या बरोबरच सामाजिक चळवळीत स्त्रियांचा सहभाग उल्लेखनीय आहेच परंतु स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच स्त्रियांनी संघटितपणे कार्य करण्यासाठी काही संघटना स्थापन केल्या होत्या. उदा. यात महिला समिती. विमेन्स क्लब, विमेन्स इंडियन असोसिएशन इ. संघटनांचा उल्लेख करावा लागेल. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांचा सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश झाला होता परंतु सत्ता स्पर्धेच्या राजकारणात स्त्रियांचा सहभाग आजही अपेक्षित प्रमाणात नाही. आजही राजकारण हे पुरुषांचे क्षेत्र आहे असे मानले जात आहे.

**<u>महिलांचा राजकारणातील सहभाग</u>**:-

ब्रिटन ही लोकशाहीची जननी मानले जाते. भारतावर याच ब्रिटिशांचे १५० वर्षे राज्य होते. परंतु तरीही लोकशाहीवादी ब्रिटीशांचा भारतातील स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यास विरोध होता. ब्रिटीशकालीन भारतात निवडणुका मर्यादित स्वरूपात होत्या. ज्यात धार्मिक, सामुदायिक आणि व्यावसायिक बाबींना आधारभूत समजून वर्गिकरण केलेल्या जागांवर उमेदवार उभे केले जात असत. त्यासाठी निवडक लोकांना मतदान करण्याची परवानगी असे. भारतातील महिलांना मतदानाचा मिळण्यासाठी संघटित लढा दिला. १९२१साली मुंबई आणि मद्रास (आताची मुंबई आणि चेन्नई )या प्रांतातील महिलांना प्रथम मतदानाचा अधिकार मिळाला. त्यानंतर १९२३ ते १९३० या दरम्यान सात प्रांतांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. १९३५च्या कायदयाने या अधिकाराचा विस्तार करण्यात आला. १९३७च्या प्रांतिक निवडणुकांमध्ये विविध प्रांतातून ५६ महिला निवडल्या गेल्या तर केंद्रीय कायदे मंडळात ३० महिलांची निवड झाली.

**<u>स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणात महिलांचा सहभाग</u>**:-

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ नुसार भारताच्या प्रत्येक नागरिकाला समतेचा अधिकार दिला आहे. त्यानुसार जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, लिंग इत्यादी कारणावरून व्यक्ती व्यक्ती भेदभाव करता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद केली आहे. त्यामुळे प्रत्येक स्त्री-पुरुष नागरिकांना सर्व अधिकार समानतेनेच दिले आहेत. म्हणूनच राजकीय क्षेत्रातही स्त्रियांना त्याच्या लिंगभेदाच्या आधारावर उमेदवारी किंवा मतदानाचा अधिकार नाकारता येत नाही. अर्थात भारतीय राज्य घटनेने महिलांना समान अधिकार दिला असला तरी पुरुषप्रधान संस्कृती आणि पुरुषसत्ताक व्यवस्था यामुळे राजकारणात महिलांचा अपेक्षित सहभाग वाढला नाही.

१९५९ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या शिफारशीवरून लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी 'पंचायत राज' व्यवस्था लागू करण्यात आली. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तीनही स्तरावर प्रत्यक्ष निवडणूका घेण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात १९६१ पासून "पंचायत राज" अमलात आले. आणि स्त्रियांच्या

munotes.in

राजकारणातील सहभागाला चालना मिळाली. परंतु सुरुवातीच्या काळात राजकीय वारसा असलेल्या कुटुंबातील स्त्रियांचाच सहभाग अधिक होता. १९९० मध्ये राजकारणातील महिलांचा सहभाग वाढावा म्हणून महाराष्ट्रात ५ एप्रिल १९९० रोजी मा. शरद पवार यांच्या सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना ३० टक्के जागा राखीव देण्यात आल्या, व महाराष्ट्रात १९९२च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ३०टक्के महिला स्थानिक सत्तेत सहभागी झाल्या.

नंतर अशाच प्रकारचा निर्णय केंद्रीय पातळीवर १९९२ मध्ये घेण्यात आला. भारतीय संसदेने २२ डिसेंबर १९९२ रोजी ७३ वी घटनादुरुस्ती मंजूर करून संपूर्ण भारतात एकसमान पंचायत राज व्यवस्था लागू केली व भारतात सर्व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतिशांश जागा राखीव ठेवल्या. त्यामध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांसाठी राखीव असलेल्या जागाचाही समावेश केला आहे. अशा जागा पंचायतीच्या विविध निर्वाचन क्षेत्रामध्ये चक्राकार पद्धतीने विभाजीत केल्या जातात. इतकेच नव्हे तर सरपंच, सभापती या पदावर ही महिलांना चक्राकार पद्धतीने राखीव जागा दिली जाते. या घटनादुरुस्तीने राजकारणाचा वारसा नसलेल्या कुटुंबातील व सर्व जाती धर्मातील महिलांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रातील निर्णयप्रक्रियेत महिलांना सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

पंचायत राज्यात ३३ टक्केपेक्षा अधिक महिलांचा सहभाग वाढावा यासाठी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी संसदेला सुचविले त्यानुसार २७ ऑगस्ट २००९ रोजी पंचायत राज संस्थामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक लोकसभेत मांडले. परंतु ते आजही मंजूर झालेले नाही. तरी अनेक राज्यांनी पुढाकार घेऊन आपल्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना राखीव जागा दिलेल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था प्रमाणेच लोकसभेत आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे यासाठी लोकसभेत विधेयक मांडून ते मंजूर करण्यात आले. परंतु या विधेयका प्रमाणे महिलांना मिळणाऱ्या राखीव जागांमध्ये अनुसूचित जाती जमाती व अन्य मागास प्रवर्गातील महिलांनाही राखीव जागा मिळाव्यात, अशी अनेक पक्षांच्या सदस्यांनी मागणी केल्याने आजही हे विधेयक मंजूर झालेले नाही. हे विधेयक मंजूर झाले तर लोकसभेतील महिलांची संख्या १८१ होईल याशिवाय प्रत्येक राज्याच्या विधानसभेत १/३ महिला सदस्य असतील.

अशा प्रकारे भारत सरकारने व राज्य सरकारांनी राजकारणातील महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले आहेत. अर्थात प्रत्यक्ष व्यवहारात आज महिलांचा राजकीय सहभाग अपेक्षित प्रमाणात वाढलेला नाही. महाराष्ट्राच्या आजपर्यंतच्या विधानसभा निवडणूकीचा आढावा आढावा घेतल्यास असे स्पष्ट होते की, १९३७ ते २०१४ या कालावधीत स्त्री सदस्यांचा आढावा घेतला असता १९५७च्या विधानसभेत सर्वात जास्त महिला प्रतिनिधींची संख्या ३० होती. विधानसभेत १२. ३७ टक्के प्रतिनिधित्व होते. १९९०च्या विधानसभेत महिला प्रतिनिधींची संख्या सर्वात कमी म्हणजे फक्त सहा होते त्यांच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाण केवळ २. ७ टक्के होते. यात ७३ व्या घटना दुरुस्ती नंतर वाढ दर्शवत असली तरी २००४ मध्ये १२ तर २००९ मध्ये केवळ ११ महिला महाराष्ट्राच्या विधानसभेत होत्या.

**महिलांच्या अल्प राजकीय सहभागाची कारणे:-**

महिलांचा राजकीय सहभाग वाढावा म्हणून सातत्याने प्रयत्न होत असले तरी अपेक्षित सहभाग वाढत नाही त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे:-

१) पुरूषप्रधान संस्कृती व पुरूषप्रधान सामाजिक व्यवस्था हे महिलांनी राजकारणापासून दूर राहण्याचे प्रमुख कारण आहे.

२) कौटुंबिक जबाबदारी ही स्त्रियांनीच सांभाळावी अशी आजही बहुसंख्य लोकांची मानसिकता आहे. राजकारण आणि कुटुंब अशी दुहेरी जबाबदारी पार पाडणे शक्य होत नाही. संसदीय कार्यपद्धती राजकीय सहभागासाठी दयावा लागणारा वेळ यामुळे महिला शक्यतो सक्रिय राजकारणात सहभाग घेत नाहीत.

३) राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा महिलांचा राजकीय सहभागातील महत्वाचा अडथळा आहे. राजकारणात गुंडगीर, दहशत, भ्रष्टाचार, अशा प्रवृत्तींनी प्रवेश केल्या मुळे राजकीय वारसा नसलेल्या कुटुंबातील महिला राजकारणात सक्रिय होण्यास नकार देतात.

४) भारतातील खर्चिक निवडणूका पद्धती हे महिलांच्या राजकीय सक्रिय सहभागावर मर्यादा घालणारे प्रमुख कारण आहे. निवडणूकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहताना अनामत रक्कम भरने, प्रचार करणे, कार्यकर्त्यांच्या जेवणाचे सोय करणे, प्रचाराची साधने भाडयाने घेणे, पोस्टर बॅनर, इत्यादीसाठी प्रचंड खर्च होतो. म्हणून निवडणूक ही श्रीमंताची चैन मानली जाते. अशा परिस्थितीमुळे स्त्रिया राजकारणापासून दूर राहतात.

५) विधिमंडळ, संसद, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यपद्धतीबद्धल असलेले अज्ञान यामुळेही राजकीय क्षेत्रात सहभाग घेतला जात नाही.

६) राजकारणातच नव्हे तर समाजकारणातही सहभागी असणाऱ्या स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित असतो. अशा परिस्थितीमुळे महिला राजकारणापासून दूरच राहतात.

**<u>महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी उपाय योजना:</u>**

१) राजकीय क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या महिलांना प्रशासन, राजकीय संस्थांची कार्यपद्धती याविषयी महिला प्रतिनिधिंना प्रशिक्षण देणे.

२) निवडणूक पद्धतीत बदल करून महिलांना राजकिय सहभागासाठी प्रोत्साहित करणे त्यासाठी महिला उमेदवारांच्या अनामत रक्कमेत घट करणे. निवडणूका सहज-सुलभ मुक्त वातावरणात पार पाडल्या जातील याबद्दल जनतेत विश्वास निर्माण करणे.

३) महिलांच्या साक्षरतेबरोबर उच्च शिक्षणावर भर देणे.

४) महिला उमेदवारांना विशेष संरक्षण देणे.

५) महिलां प्रति आदर व्यक्त केला जाईल अशा मुल्यांची शिकवण शिक्षण व प्रसार माध्यमांतून दिली पाहिजे.

६) पुरूषांनी पुरूषी अहंकार सोडून स्त्रियांच्या राजकिय सहभागाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

७) विशेषत: अनुसूचित जाती-जमातीच्या महिलांकडे जातीय दृष्टीकोनातूनच पाहिले जाते. या महिलानां पुरूष कार्यकर्त्याकडून, प्रशासकिय अधिकाऱ्याकडून अपमानास्पद वागणूक दिली जाते. उदा. दलित मागास स्त्री सरपंच पदावर असली तरी केवळ दलित आदिवासी म्हणून प्रजासत्ताक दिन स्वातंत्र दिनाच्या वेळी राष्ट्रध्वज फडकावू दिला जात नाही. किंवा सरपंच महिलेचा आदेशांचे पालन केले

जात नाही. म्हणून अशा मागास वर्गातील महिलांचा आदर राखलाच पाहिजे व जाणिवपूर्वक अवमान करणाऱ्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे.

८) अनेक वेळा महिला राखीव जागा म्हणून एखादया गावात महिला सरपंच पदावर विराजमान होते परंतू कामांचा अनुभव नसल्याने आपल्या पतीचा सल्ला घेते यातून त्या महिलेचा पती हाच अप्रत्यक्षपणे सरपंच म्हणून काम करतो. परंतू अशा परिस्थितीत महिलांनी खंबीरपणे स्वबळावर निर्णय घेतले पाहिजेत व इतर ग्रामपंचायत सभासदांनी अशा महिलेला प्रामाणिक सहकार्य केले पाहिजे.

अशा उपाययोजना केल्यास महिलांचा राजकिय सहभाग वाढण्यास मदत होवू शकते.

## ३.४ सरावासाठी प्रश्न

१) भारतीय लोकशाही राजकिय व्यवस्थेतील महिलांच्या सहभागाची चर्चा करा.

२) राजकारणातील महिलांच्या अल्प सहभागाची कारणे कोणती ?

३) राजकारणातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी उपाय सुचवा.

## ३.५ सदर्भसूची

❖❖❖

munotes.in

# ४

## राष्ट्रीय सुरक्षेपुढील आव्हाने

**प्रकरणाची रचना -**

४.१. राजकारणाचे गुन्हेगारीकरण

४.२. सुरक्षेपुढील अंतर्गत धोके (नक्षलवाद आणि विद्रोहा-संदर्भात)

४.३. जागतिक दहशतवाद

४.४ सरावासाठी प्रश्न

४.५ संदर्भसूची

## ४.१ राजकारणाचे गुन्हेगारीकरण

### प्रस्तावणा

कोणत्याही देशाचा राष्ट्रीय सुरक्षा हा अत्यंत महत्वाचा विषय असतो. अंतर्गत व बाहय अथवा दोन्हीही सुरक्षा प्रकारात देशाच्या नेतृत्वाला बारकाईने लक्ष घालावे लागते. देशाची सुरक्षा यंत्रणा नेहमीच सतर्क ठेवावी लागते. सुरक्षा व्यवस्था मजबुत असेल तरच देशातील नागरी समाजाला जीवन जगण्यात आत्मविश्वास वाटत असतो व त्यामुळे निर्भयपणे समाजातील सर्व व्यवहार होत असतातत्र विकसति व समृध्द जीवन शैलीसाठी देशाची अंतर्गत, बाहय सुरक्षा हा भाग अत्यल्प महत्वाचा आहे. भारतात गेल्या ३ दशकांपासून अंतर्गत व बाहय सुरक्षा विषयक अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. दहशतवाद व नक्षलवाद याद्वारे देशांतील विविध घटक राज्ये, राजधानी दिल्ली त्रस्त आहेत. सुरक्षा विषयाशी कोणीही तडजोड करु शकत नाही किंवा करु नये.

आजच्या स्थितीत देशांतील राजकारणाशी संबंधित गुन्हेगारी, अंतर्गत विघातक चळवळी (नक्षलवादी, विघटनवादी) व परदेशस्थ पुरस्कृत दहशतवाद यामुळ भारतीय प्रशासनाची व नागरी समाजाची शक्ती अधिकच खर्ची पडत आहे.

या प्रकरणामध्ये अभ्यासक्रमातील उपघटकानूसार आपण ४.१ राजकारणातील गन्हेगारीकरण, ४.२ सुरक्षेला अंतर्गत धोके नक्षलवाद व बंडखोरीच्या संदर्भात, ४.३ जागतिक दहशतवाद यांचा तपशीलवार अभ्यास करीत आहोत.

### राजकारणाचे गुन्हेगारीकरण

भारत देश पारतंत्र्यात असताना भारतातील तमाम जनतेसमोर त्यातल्या त्यात युवा पिढीसमोर भारताला स्वातंत्र्य मिळविणे हे एकमेव ध्येय, उद्दिष्टे होते. लोक या ध्येयाने भाारावलेले होते. तन, मन, धनाने अथक प्रयत्न करुन भारताला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठीचे झटत होते. म्हणजेच स्वातंत्रपुर्व काळात भारतापुढील प्रश्न निराळे होते. आज स्वातंत्र प्राप्तीनंतर भारतापुढे गुन्हेगारीकरण, बंडखोरी, दहशतवाद वगैरे विषयांनी डोके वर काढले आहे. आणि विशेष म्हणजे या तिन्ही विषयांमध्ये तरुण वर्गच जास्त गुरफटलेला आहे. त्याच्या जोडीला व्यसनाधिनता जडली आहे. ऐकेकाळी युवकांनी देश स्वतंत्र केला.

आता स्वतंत्र देशतील युवक अशा बेकायदेशीर कृत्यांच्या माध्यमातून स्वतंत्र देशाला विघातक मार्गाने असुरक्षिततेकडे घेवून चालला आहे. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षिततेला पहिले महत्वाचे आव्हान या राजकारणातील गुन्हेगारीचे दिसत आहे. लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष, नेते आपल्या व्यक्तीगत व कार्याच्या माध्यमातून निवडणुकीद्वारे विविध राजकिय संस्थामध्ये समाजसेवा करण्यासाठी प्रवेशित होत असे किंवा हे अपेक्षित आहे. पण गेल्या काही वर्षापासून स्वच्छ व निष्कलंक प्रतिमा असलेले नेते अभावानेच सापडत आहेत. निवडणूका मध्ये प्रभाव टाकुन सत्ता प्राप्तीसाठी व विरोधकांमध्ये दहशत पसरविण्यासाठी कधीकाळी काही राजकारण्यांनी गुन्हेगारी जगतातील टोळयाची, म्होरक्यांची मदत घेणे पसंत केले. या प्रकाराद्वारे गुन्हेगारांना राजकारण्यांशी सलगी सुरु झाली. परिणामी गुन्हेगारांना आपण स्वच्छ धुतल्या तांदळासारखे वाटु लागले कालांतराने हेच गुंड या राजकारण्यांना निवडणूकीत आव्हान देवू लागले असून गुजरातीसारखा अभ्यासू नेता या निवडणुकांत पराभूत होतो व अरुण गवळी सारखा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला टोळीप्रमुख त्याच निवडणूकीत विजयी होतो हे चित्र पहायला मिळू लागले. तेव्हा मात्र सर्वांनाच राजकारण व गुन्हेगारी या विषयांबाबत चिंता वाटू लागली. राजकारणाच्या शुध्दीकरणाची गरज वाटु लागली. पण हे सर्वांनीच चळवळ म्हणून हाती घ्यावी लागेल.

### राजकारणाचे गुन्हेगारीकरण अर्थ

राजकारणाचे गुन्हेगारीकरण याचा सरळ अर्थ म्हणजे गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना राजकारणात पाउल ठेवून भक्कम उभे राहण्यास संधी देणे किंवा गुन्हेगार लोकाचा राजकारणत प्रभाव वाढविण्यास कारणीभूत होणे असा अर्थ आहे.गुन्हेगार म्हणजे गुन्हा करणारी व्यक्ती, गुन्हा करण्यास तरप्रस्थापित कायदयान्वये मनाई केली जाते. गुन्हेगारांमध्ये चोरटा व्यापार करणारे, आमली पदार्थांचा व्यापार करणारे लहान मोठे तस्कर यांचा समावेश होतो. अशा प्रकारचे व्यवसाय करणारे लोक गुन्हयामध्ये आढहतात. गुन्हेगारांच्या टोळयांच्या ठराविक जागा व प्रदेश असतात व त्या ठराविक अडयात त्यांचच साम्राज्य असते. उदा. हातभट्टी चालविणारे, झोपडपट्टी दादालोक यांचे आपल्या परिसरावर संपूर्ण नियंत्रण असते. तेथील मतदारांवर या दादांचा वचक किंवा प्रभाव असतो. या दादा लोकांचे संबंध आमदार, खासदार, नगरसेवक वगैरेशी असल्याने तो निवडणुक काळात या राजकारण्यांशी सौदेबाजी करतो.

### राजकारणाचे गुन्हेगारीकरणाचे स्वरुप

राजकारणाचे गुन्हेगारीकरण सध्या भारतीय राजकिय व्यवस्थेतील महत्वाचा चर्चेचा विषय बनला आहे. राजकारणी लोक गुन्हेगार, स्मगलर्स, दादा लोकांच्या मदतीने निवडणूक निवडून येत आहेत. राजकारण्यांकडून वेळोवेळी आर्थिक सौदेबाजी करणे हा प्रकार सर्रास होताना दिसत आहे. सध्या तर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले काही लोक थेट निवडणुकीत निवडून येत आहेत. अशा गुन्हेगारांना मान सन्मान, मा मरातब मिळू लागला आहे. त्यामुळे हळु हळु जनाताही त्यांच्या गुन्हेगारी, काळया कारनाम्यास विस्मृतीत टाकत आहे. कालांतराने हेच गुन्हेगार ग्रामपंचायतीपासून संसदे पर्यंतच्या निवडणुकांत आघाडी घेताना दिसत आहेत. गुन्हेगारी जगतात, माफिया, हातभट्टीवाले, मटकाकिंग, टोळीवाले, बेकायदेशीर कृत्यांची सुपारी घेणारे, वाळू माफिया, प्राण्यांची शिकार करुन तस्करी करणारे, स्त्रीयां, मुले यांचा व्यापार करणारे, अमली पदार्थ बनविणारे, विक्रीची साखळी बनविणारे व त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार करणारे असे नियमबाहय व्यवहार करणारे व त्यांची पोलीसांमध्ये लागे बांधे ठेवणाऱ्याची संख्या वाढत आहे. विशेष म्हणजे हे गुन्हेगार राजकिय पक्ष, नेत्यांवर सत्तेत सहभाग मिळविण्यासाठी दबाव आणत आहेत. राजकिय संस्थात स्विकृत म्हणून घेण्यासाठी लॉबिंग करीत असतात.

munotes.in

### राजकारणाचे गुन्हेगारीकरणाची कारणे:-

**अ.** सामाजिक कारणे: भारताच्या विविध भागत आज सक्रीय होत असलेले गुन्हेगार बहुतांशी सामाजिक हक्का मागे रहिलेले आढळतात. शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत मागसालेले पुढेही सामाजिक सुधारणांपासून वंचित राहिलेले काही लोक अथवा समाज विघातक विषयांकडे लवकर आकृष्ट होतात. पिढयान पिढया राहणीमानातही मागासलेपणा असलेले युवकांमध्ये हया नियमबाहय व्यवसायांचे आकर्षण वाढते. कारण या शॉर्टकट मार्गाने जावून आपण समाजातील विविध क्षेत्रात पुढारलेल्यांवर अंकुश ठेवू शकू असे वाटते. त्यामुळे गुन्हेगारी क्षेत्रात दाखल होतात. तसेच कालांतराने विविध राजकारण्यांशी संपर्क वाढण्याचे राजकारणात शिरकाव होताना दिसतात.

**ब. राजकिय कारणे**

राजकारणात असलेल्यांना पुढेही सत्ता प्राप्तीसाठी व जे सत्तेच्या प्रतिक्षेत आहेत त्यांनाही गुन्हेगारांच्या मदतीची गरज भासू लागली आहे. तेथेही राजकारण्यांची स्पर्धा दिसत आहे. सत्ता हस्तगत करण्यासाठी साम, दाम, दंड, वगैरे नितींचा वापर केला जातो. विशेष म्हणजे राजकारणात सक्रिय असलेले लोक सत्ताा मिळवण्यासाठी याही मार्गाचा वापर करतात किंवा या मार्गातही आपण मागे राहू नये असा प्रयत्न करतात. परिणामी गुन्हेगारांचा राजकारणातील वावर वाढताना दिसतो.

**क. आर्थिक कारणे**

साधारणत: आर्थिक दृष्टया चिंतीत असणारा युवा वर्ग या गुन्हेगारी विश्वामध्ये लवकर सामिल होतो. त्यासाठी नैतिकता, सदाचरण वगैरे विषयांमध्ये त्यांना स्वरस्य नसते. गुन्हेगारी टोळया आपल्या कळपात अश्या आर्थिक चणचण असणाऱ्यांना हेरुन विविध बेकायदा उदयोंगात गुंतवतात. हेच गुन्हेगार कालांतराने पैशाच्या हव्यासापोटी राजकारण्यांशी सौदेबाजी करतात. त्यातूनच पुढे राजकारणात या गुन्हेगारांचा शिरकाव व नित्याचा वावर होतो.

काही वेळा प्रशासनाकडुन, समाजाकडुन, समाजातील काहींना हिन, तुच्छ वागणूक मिळते. या घटनांचा परिणाम म्हणजे हे युवक नाईलाज म्हणून गुन्हेगारी जगत व नंतर राजकारणात संबंधितांचा बदला घेण्यासाठी प्रवेशित होतात.

### राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे विविध परिणाम

अ. राजकारणाच्या वाढत्या गुन्हेगारीकरणामुळे देशातील विविध भागातील कायदा व सुव्यवस्था यामध्ये खंड पडून समाजपूढे एक प्रचंड व गंभीर आव्हान उभे राहिले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे अनेक लोक हे लोकशाहीविरोधी मार्गाने प्रतिनिधिक संस्थावर, नगरपरिषदा, नगरपालिका, विधानसभा इत्यादी संस्थांवर राजरोजसपणे निवडून येतात. एकदा का ते निवडून आले की, हे लोक लोकशाही मार्गानेच लोकशाहीचा गळा घोटण्यास कमी करणार नाहीत अशी ही गुड, राजकारणी, पोलीस, शासकीय अधिकारीवर्गाची अपवित्र युती सामाजिक व राजकीय स्तरांवर लोकशाहीची पुरेपुर घात करेल यात शंका नाही. गुंडांच्या आरेरावीमुळे व पोलीस यंत्रणेने तिकडे दुर्लक्ष केल्याने देशात लोकशाहीचा आधार असलेल्या घटनात्मक कायदेशिर शासनाला धोका निर्माण झाल्यासारखे होत असते.

ब. देशात प्रतिनिधीक संसदीय शासन हवे असेल तर वेळोवेळी सार्वत्रिक प्रौढ मतदान पध्दतीने मुक्त, स्वतंत्र व नि:पक्षपाती निवडणुका होणे आवश्यक आहे. तथापि मतदानावर दहशत निर्माण करणे, उमेदवारांना पळविणे, मतदारांना मोफत दारु पाजणे, पैसे चारणे, मतपेटया पळविणे, वेळप्रसंगी

निवडणूकीतील उमेदवाराचे व अन्य कार्यकर्त्यांचे मुडदे पाडणे या कामासाठी संपत्तीचा व शक्तीचा वापर केला जाऊ लागला तर स्वतंत्र व नि:पक्षपाती निवडणुका म्हणजे दिवास्वप्नच ठरणार.

क. सामान्य मनुष्य राजकीय प्रक्रियेला विटुन गेला आहे. राजकारणाकडे तो एक शब्द घाणेरडा खेळ म्हणून पाहू लागला आहे. राजकारणी या शब्दाला पर्यायी शब्द म्हणजे भ्रष्टाचार व गुन्हेगारी. स्वामीनाथन एस. अंकलेश्वरीया म्हणतात, ''राजकारणी लोक काळया पैशात लोळत पडलेले दिसतात, ते मतदार केंद्राचा ताबा घेतात, गुन्हेगारी टोळी प्रमुखाबरोबर वावरतात ही काही आता नविन गोष्ट नाही''. नुकत्याच मिळालेल्या अहवालानूसार सुमारे ८३६ लोकांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असूनही उत्तर प्रदेशातील निवडणुका लढविल्या. त्यापैकी बहुतेकांनी निवडणुकांची नियमही मोडले आहेत.

ड. समाज विघातक प्रवृत्तीचे लोक व गुन्हेगारी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यात यश मिळविले आहे. कित्येक जण महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती इत्यादी ठिकाणी निवडून आलेले आहेत.

महत्वाचे म्हणजे दहशतवादाने व राजकारणाच्या गुन्हेगारीमुळे हळुहळु देशातील राजकारणावर गुंड-पुंडांची, भ्रष्टाचारी लोकांची व माफिया टोळयांची सावली पडू लागली आहे. राष्ट्रीय नेत्यांच्या, पंतप्रधानांच्या, मुख्यमंत्र्यांच्या, आमदार खासदारांच्या जीवावर दहशतवादी आज उठलेले दिसुन येतात. हे राष्ट्रविघातक लोक इंदिरा गांधी, राजीव गांधी, रामदास नायक, प्रेमकुमार शर्मा, पंजाबचे मुख्यमंत्री बिआंत सिंग, रमेश मोरे, विठ्ठल चव्हाण इत्यादींची हत्या करतात व चक्क नाहीसे होतात. त्याचा पोलीसांना कधीही थांगपत्ताही लागत नाही. दहशतवादी गुंड न्यायालयाच्या आवारात, जे. जे. रुग्णालयात किंवा विधान सभेत देखिल बहुतेक सर्व प्रमुख आरोपी वावरतात तर काही केव्हाच देशाबाहेर पसार झाले आहेत. दाउद इब्राहिम, पप्पू कलानी, हितेंद्र ठाकूर, भाई ठाकुर, जयवंत सुर्यभान, अरुण गवळी, अश्विन नाईक, थापा या सर्वांचे चारित्र्य जनतेला व पोलिसांना देखिल ज्ञात आहे. तथापि राजकारणी व सत्ताधारी यांच्यावर आणि पोलिस यंत्रणेवर गुन्हेगारांची जबरदस्त पकड व धाक असल्याने सडलेली पोलीस यंत्रणा, दबलेलेप्रशासन आणि बोटचेपी राजकारणी मंडळी यांच्याकडे हताशपणे पाहत राहणे एवढेच आत नागरिकांच्या नशिबी उरलेले आहे काय असा प्रश्न सामान्य जनलेला पडत आहे.

## राजकीय गुन्हेगारी वृत्तीला प्रतिबंध घालण्यासंबंधीच्या सुधारणा

संसदेच्या आणि विधानसभांच्या विदयमान सदस्यांपैकी अनेक सदस्य फौजदारी गुन्हेगारी स्वरुपाच्या खटल्यात किंवा आरोपात गुंतलेले आहेत असे निर्वाचन आयोगाला आढळून आलेले आहे. राजकीय गुन्हेगार वैयक्तिक संपत्ती, दादागिरी किंवा अन्य वाम मार्गाचा वापर करुन विधिमंडळात प्रवेश करताना दिसतात तेव्ह अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्याा लोकांचा राजकारणात प्रवेश होवू नये म्हणून निर्वाचन आयोगाने विविध उपाय आणि सुधारणा केलेल्या आहेत. यासंदर्भात निर्वाचन आयोगाने वेळोवेळी आदेश काढलेले आहेत.

निर्वाचन आयोगाने २८ ऑगस्ट, १९९७ रोजी असा आदेश काढला की, अपराधी व्यक्तीने जरी उच्च न्यायालयात अपील केले असेले तरीही त्याचा अपराध सिध्द झाला असेल तर त्या दिवसापासून ती व्यक्ती निवडणुकीस अपात्र ठरविण्यात येईल. निर्वाचन आयोगाने निर्वाचन अधिकाऱ्यांना असा आदेश दिला की, त्यांनी उमेदवारांकडून शपथपत्रे करुन घ्यावीत. त्यामध्ये अपराध सिध्द झाला असल्यास त्याची तारीख, अपराधाचे स्वरुप, झालेली शिक्षा आणि तुरुंगवासाची मुदत इत्यादी माहिती स्पष्ट असावी. फौजदारी गुन्हा सिध्द झाल्यास ती व्यक्ती सहा वर्षे निवडणुकीस अपात्र समजण्यात येईल. २००२ साली सर्वोच्च न्यायालयाने नागरिकांच्या माहितीचा अधिकार व निर्वाचन आयोगाचा आदेश काढण्याचा अधिकार मान्य केल्यामुळे

निर्वाचन आयोगाने असा आदेश काढला की, प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीचा अर्ज भरताना शपथेवरील पुढील माहिती देणे बंधनकारक राहणार आहे.

अ. उमेदवाराला एखादया गुन्हयाखाली शिक्षा झाली आहे काय? शिक्षा झाली असल्यस तिचे स्वरुप देणे आवश्यक आहे.

ब. उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी जर सहा महिन्यांच्या काळात गंभीर स्वरुपाच्या गुन्हयांचा आरोप त्या उमेदवारावर ठेवला असेल की, ज्यामध्ये त्याला दोन वर्षाहून अधिक शिक्षा होवू शकेल या सबंधीची माहिती अर्जात भरली पाहीजे.

क. उमेदवारांच्या नातलगांच्या किंवा पती पत्नी यांच्या नावावर असणारी मालमत्ता, पैसा यांची माहिती देणे बंधनकारक असते.

ड. बॅंका, संस्था यांची देणी, थकीत रकमा यांचा तपशील प्रत्येक उमेदवाराने दिला पाहिजे.

इ. उमेदवाराचे शिक्षण किती आहे हे स्पष्टपणे लिहिले पाहीजे.

थोडक्यात

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना लोकशाहीतील प्रत्येक निवडणुकांपासून दुर ठेवले पाहिजे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. माध्यमे, मतदार, राजकीय पक्ष व न्यायालये यांनी एकत्रितपणे राजकारणात शिरलेल्या गुन्हेगारी प्रवृत्ती विरुध्द चळवळ हाती घेणे आवश्यक आहे.

**राजकारणातील गुन्हेगारीला प्रतिबंध घालण्यासाठीचे काही उपाय**

१. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्य राजकारण्यांवर कारवाई केली जात असेल तर त्यांना निवडणुक लढविण्यास बंदी घालावी.

२. सध्याच्या कायदयामध्ये सुधारणा केल्या जाव्यात जेणेकरुन गुन्हेगारांना निवडणुक लढविण्यास प्रतिबंद केला जाईल व त्यांचा राजकारणात प्रवेश रोखला जाईल.

३. निवडणुक आयोगातील अधिकाऱ्यांची निवड नि:पक्षपातीपणे आणि पारदर्शन पध्दतीने केली जावी.

४. ज्यांना ७ वर्षापेक्षा जास्त तुरुंगवास भोगावा लागला त्यांना निवडणुक लढविण्यास परवानगी देवू नये.

५. जे राजकिय पक्ष गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्यांना पक्षाचे निवडणुक तिकिट देतील त्यांच्यावरही कारवाई केली जावी.

६. देशातील प्रसिध्द माध्यमांनी नि:पक्षपातीपणे अशा गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकाची वास्तव स्थिती समाजासमोर आणली पाहिजे.

७. मतदारांनी आपला सुज्ञपणा आतातरी दाखविला पाहिजे. त्यांनी अश्या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीस मते न देता त्याांची योग्य जागा दाखविली पाहिजे.

८. जागृतपणा दाखवून मतदारांनी अमिशाला बळी न पडात, पैसे, लाच न घेता मतदानाचे कर्तव्य बजवावे.

९. न्यायालयांनी निवडणुक विषयक खटल्यांचा निकाल जलद गतीने लावावा.

सरांश: भारताची लोकशाही फक्त राज्यघटनेमध्येच न ठेवता प्रत्यक्षात आणावयाची असल्याने निवडणुका नि:पक्षपणे व्हाव्यात व महत्वाचे म्हणजे समाजाच्याा सर्वच घटकांनी राजकारणाचे गुन्हेगारीकरण या प्रवृत्ती चळवळ हाती घेतली पाहिजे.

## ४.२ सुरेक्षेपुढील अंतर्गत धोके (नक्षलवाद आणि विद्रोहा-संदर्भात)

सर्वच देशांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नाला प्राधान्य दिले जाते. सर्वसाधारणपणे राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे देशातील गुपितांचे व तेथील नागरिकांचे संरक्षण करणे होय. राष्ट्रांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी राष्ट्र सुरक्षेच्या दृष्टीने मजबूत असणे गरजेचे असते. प्रत्येक राष्ट्राला इतर राष्ट्राच्या बाहेरील धोक्याबरोबर काही अंतर्गत धोक्याचाही सामना करावा लागतो. या अशा अंतर्गत धोक्याचा एक घटक म्हणून नक्षलवाद आणि विद्रोहाकडे पाहीले जाते.

ब्रिटिश साम्राज्याच्या काळात उदयास आलेली संरजामशाही व जमीनदारी पद्धती, आदिवासीचे जंगलावरील आणि शेतजमीनीवरील संपुष्टात आलेले हक्क आणि भारतीय समाजव्यवस्थेतेतील आदिवासी आणि गरिब लोकांच्या शोषणाची व द्वेषाची प्रवृत्ती या परिस्थितीत नक्षलवादी चळवळीची बीजे आहेत या परिस्थितीच्या विरुद्ध अदिवासी, दलित, शोषित यांनी जमिनदार, सावकार यांच्या विरोधात हिंसात्मक पद्धतीने केलेली चळवळ म्हणजे नक्षलावादी चळवळ होय. या चळवळीची सुरवात पश्चिम बंगालमधील दार्जिलींग जिह्यातील 'नक्षलवादी' या गावातून म्हणूनल त्याला नक्षलवादी चळवळ असे म्हणतात.

### नक्षलवादी चळवळीचे ध्येय धोरण व भूमिका

१. नक्षलवाद्यांच्या मते भारताला केवळ नाममात्र स्वातंत्र्य मिळाले आहे ब्रिटिश गेले आणि वसाहती, सरंजामी सदृश्य व्यवस्था आली ही व्यवस्था बदलण्यासाठी क्रांतिकारी उठावाशिवाय पर्याय नाही.

२. भारताचे परराष्ट्र धोरण हे अमेरिका या भांडवलशाही राष्ट्राला अनुसरुन आहे.

३. जमिनीचे केंद्रीकरण, मालकी हक्क मूठभर लोकांच्या हाती, शेतमजुरांची पिळवणूक, बेरोजगारी, सावकारी व भरमसाठ व्याजाद्वारे शोषण, दलित, आदिवासीचे शोषण ही सरंजामशाही व्यवस्थेची वैशिष्टये भारतात दिसून येतात.

४. नोकरशाही, भांडवलशाही सरंजामशाही अमेरिकन, साम्राज्यवादाला पूरक आहे.

५. वरील परिस्थितीमूळे क्रांतिक्राती घडविणे आवश्यक आहे.

६. संघर्ष आणि परिवर्तनाचे साधन सशस्त्र संघर्षाचा पुरस्कार करणे.

७. प्रस्थापित शासनास जनपाठिंबा नाही ते शासन लष्काराच्या सहाय्याने टिकून आहे. प्रतिनिधिक व्यवस्था कूचकामी व दिखावू स्वरुपाची आहे.

८. ग्रामपातळीवरील सत्ता श्रीमंत शेतकरी, जमिनदार वर्गाकडून काढून शेतकऱ्याच्या स्वाधीन केली जाईल व त्याद्वारा लाल दहशत निर्माण केली जाईल.

### ध्येय धोरणांचा अंमलबजावणीचा मार्ग किंवा कार्यक्रम

१. सावकारावर धाडी घालणे.

२. पोलिसांना ठार मारणे, सरकारी पोलिस यंत्रणेला आव्हान दिले.

३. जमीनदार वर्ग शत्रु मानून त्यांच्या हत्या करणे व त्यांच्याकडील धान्य व अन्य वस्तू गरिबांना वाटणे.

४. वन जमिनीचा ताबा घेवून त्या शेतकऱ्यांना देणे.

५. निवडणुक प्रक्रियेवर घाला घालणे.

अशा प्रकारे आपली ध्येय धोरणे अंमलात आणण्यासाठी हिंसक मार्गाचा अवलंब करणे व त्यात शेतकरी, कामगार, विद्यार्थी यांना सहभागी करुन घेणे.

### नक्षलवादाची कारणे

१. कायद्याने जमीनदारी पद्धती नष्ट केली असली तरी कायद्याचे योग्य अंमलबजावणी न झाल्याने छुप्या अवस्थेत ती आजही आहे जमीनदारी पद्धतीत छोटे शेतकरी, कुल, मजूर यांचे आर्थिक, मानसिक शारिरीक शोषण केले जाते. हेच या चळवळीच्या उगमाचे प्रमुख कारण आहे.

२. स्वातंत्र्यानंतरही आदिवासी बहुतेक भागात रस्ते, वीज, पाणी, दवाखाने, शिक्षण या मुलभूत सुविधा शासन निर्माण करु शकले नाही. त्यामुळेच अज्ञानी निरक्षर लोकांचे शोषण जमीनदार व प्रस्थापित वर्गाकडून केले जाते.

३. पोलिस सरकारी अधिकारी यांच्याकडून हे आदिवासी दलित जमातीतील गरिबी अज्ञान निरक्षरतेचा फायदा घेवून त्यांचे सर्व बाजूंनी होणारे शोषण इ. कारणे आहेत.

### नक्षलवादांवरील नियंत्रणाचे प्रकार/उपाययोजना

१. आदिवासींना न्याय मिळवून देणे.

२. उद्योगपती, बहुराष्ट्रीय कंपन्या, सावकारी, जमीनदार खनिज संपत्तीची लुट करणारे माफिया शोषण करणारी यंत्रणा इ. नायनाट करणे.

३. जमीन सुधारणा कायद्याची योग्य अंमलबजावणी करुन त्यांना त्यांच्या जमिनी व त्यावरील हक्क मिळवून देणे.

४. विकासाच्या योजना त्यांच्यामार्फत पोहचविणे.

५. रोजगार निर्मिती करुन युवकांना मुख्य प्रवाहात आणणे.

६. पोलिसी करावायांपेक्षा त्यांच्या प्रबोधनावर मत परिवर्तनावर भर देणे.

७. आदिवासी बहुत भागात पायाभूत सुविधा निर्माण करणे.

८. वनहक्क कायद्याची योग्य अमंलबजावणी करणे.

### नक्षलवादी समस्या सोडविण्यातील अडथळे व आव्हाने

१. शासनाच्या कोणत्याही कृतीवर नक्षलवाद्यांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळेच शासनाने नक्षलवादी भागात रस्ते, वीज, मोबाईल टॉवर्स इ. सुविधा उभारण्याचा प्रयत्न केल्यास त्या नक्षलवाद्याकडूनच उध्वस्त केल्या जातात.

२. नक्षलवादी प्रस्थापित व्यवस्थेंविरुद्ध लढण्याची प्रेरणा आहे. ती त्यांना लढण्यास नेहमी प्रवृत्त करते याउलट सुरक्षा रक्षकांकडे त्याची उणीव आहे इ. अनेक अडथळे आहेत.

३. नक्षलवाद्याची गुप्तचर यंत्रणा प्रभावी आहे.

शेतकरी दलित शोषित समाजात शासकीय यंत्रणेबद्दल विश्वास निर्माण करुन ही समस्या सोडविणे शक्य आहे. तसेच हा अंतर्गत धोका काही सकारात्मक उपाय करुन आपण सोडवू शकतो व राष्ट्रीय अंतर्गत सुरक्षेचे कवच मजबूत बनवू शकतो.

## ४.३ जागतिक दहशतवाद

### दहशतवाद

प्रास्ताविक तीन दशकापूर्वी काही विशिष्ठ कारणांमुळे समस्यांमुळे जगाच्या काही जगाच्या काही भागात उदयास आलेला दहशतवाद सध्या सर्वत्र पसरु लागला आहे. प्रत्येक देश या प्रश्नासंदर्भात चिंतीत असून अनेक देशांतील जनता भयग्रस्त जीवन जगत आहे. भारतासारख्या देशात तर सध्या दहशतवाद हा गंभिर प्रश्न निर्माण झाला आहे. ११ सप्टेंबर, २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या घातक दहशतवादी हल्याने दहशतवादाच्या समस्येचे गांभिर्य आंतरराष्ट्रीय समुदायाला पटु लागले आहे. आता ही समस्या केवळ भारतासमोरील राहील नाही. अेमरिका, ब्रिटन, फ्रान्स, जपान, इस्त्रायल वगैरे विकसित देशातही दहशतवादाचे आव्हान मिळत आहे.

### दहशतवाद म्हणजे काय?

दहशतवाद या शब्दात शेवटी वाद असा शब्द आहे. हा शब्द समाजवाद, साम्यवाद प्रमाणे त्यामुळे दहशतवाद ही देखिल एखादी विशिष्ट विचारपुर्वक असेल असे वाटते. परंतू तसे नाही. कारण यामध्ये विचार, चर्चा यावर विश्वास नाही. मात्र सर्व दहशतवादी संघटनांचा विचारपुर्वक अभ्यास केल्यास असे दिसून येते की, प्रत्येकाचे साध्य वेगळे असले तरीही मार्ग मात्र या सर्वांचे दहशतीचेच आहेत. ढोबळमानाने त्यांची व्याची करावयाची झाल्यास ''हिंसेच्या किंवा दहशतीच्या मार्गाने आपले ईप्सित साध्य करुन घेणे म्हणजे दहशतवाद होय''.

### दहशतवादाची संकल्पना - अर्थ:

दहशतवादाचा उल्लेख हा प्रामुख्याने नकारात्मक दृष्टी केला जात असल्यामुळे स्वत:स दहशवादी संबोधून घेण्यास शक्यतो कोणी तयार नसतो. या शब्दाचा अर्थ गुंतागुंतीचा आहे. राजकिय उद्ध्दीष्टपर्तीसाठी हिंसाचाराचा अवलंब करणाऱ्या व्यक्तींना एक राष्ट्र दहशतवादी म्हणून संबोधले तर दुसरे राष्ट्र यंचा उल्लेख स्वातंत्र्यसैनिक म्हणून करते. तरीही ढोबळमानाने दहशतवाद म्हणजे 'राजकीय उध्दीष्टांसाठी हिंसेच्या साधनाचा वापर' अशी दहशतवादाची व्याख्या करता येईल. राज्यशास्त्र शब्दकोशानुसार ''अमुलाग्र राजकिय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे'' अशी दहशतवादाची व्याख्या केली आहे. थोडक्यात ''सरकार विरोधी कृती'' असे या संकल्पनेचा उल्लेख केला असला तरी आज अनेक राष्ट्रांमधील सरकारे दहशतवादी संघटनांच वापर इतर राष्ट्रांविरुध्द किंवा अंतर्गत विरोधकांचा बिमोड करण्यासाठी करीत आहेत. त्यामुळे याचा गुंता आपल्याला जाणवत आहे.

**दहशतवादाची उद्दिष्टे:-**

**१. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट:-**

राजकिय स्वातंत्र्यासाठी हिंसाचाराचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. विसाव्या शतकामध्ये अशा हिंसाचाराचे प्रमाण वाढले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात काही नेत्यांकडुन आणि संघटनांकडुन ब्रिटीशांविरुध्द हिंसाचाराचा वापर केला गेला. हा दहशतवाद प्रखर राष्ट्रवाद, धार्मिक प्रेरणा तसेच विचारसरणींच्या प्रभावाने प्रेरित झाला होता. या प्रकारास क्रांतीकारी दहशतवाद असेही संबोधतात.

**२. स्वतंत्र व सार्वभौम राज्यनिर्मिती:-**

दहशतवादी कारवाईच्या माध्यमातून स्वतंत्र व सार्वभौम राज्याच्या निर्मितीसाठी अनेक दहशतवादी संघटना प्रयत्शील आहेत. श्रीलंकेतील एल.टी.टी.ई. पॅलेस्टाईन मधील हमास, जम्मू काश्मिर राज्यातील हिजबुल मुजाहिद्दीन, लष्कर ए तोयबा, जैश ए महंमद सारख्या कडव्या दहशतवादी संघटना स्वतंत्र राज्याच्या निर्मितीच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी काम करतात.

**३. धार्मिक व वांशिक प्रेरणा**

धार्मिक व वांशिक प्रेरणेतून हिंसाचाराचा वापर आज अनेक दहशतवादी संघटनाकडुन होताना दिसतो. समाजातील बहुसंख्यांकाकडून, अल्पसंख्यांकाकडून होणाऱ्या अन्यायाचा सुड घेण्यासाठी, धार्मिक अधिकाराच्या प्राप्तीसाठी, स्वतंत्र धार्मिक व वांशिक ओळख जपण्यासाठी काही दहशतवादी संघटना व्यस्त असतात. अल कायदा, सशस्त्र इस्लामिक संघ, कुछ इस्माईल वगैरे.

**४. राजकिय, सामाजिक परिवर्तनवादी**

आक्रमक, अमुलागृ राजकिय व सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टासाठी काही दहशतवादी संघटना सक्रिय आहेत. जगातील सर्व मुस्लीम राष्ट्रांना एकत्र करुन इस्लाम धर्मावर अधारित राजवटीची स्थापना करणे हे अल कायदा सारख्या संघटनेचे उद्दिष्ट आहे.

**५. अन्यायाचा सूड किंवा बदला घेण्याच्या उद्दिष्टासाठी-**

राजकिय, सामाजिक किंवा धार्मिक स्वरुपाच्या अन्यायाचा, अत्याचाराचा सुड घेणे हे काही दहशतवादी संघटनांचे उद्दिष्ट आहे. अशा संघटना क्रिया - प्रक्रियाद्वारे प्रत्यक्षात येतात. अल कायदा सारख्या काही संघटना अमेरिका किंवा त्यांच्या सहकारी देशांवर सूड घेण्यासाठी प्रयत्नशिल असतात. त्यातूनच अमेरिकेवर ११ सप्टेंबर, २००१ रोजी दहशतवादी हल्ला झाला होता

**६. आक्रमकपणे उद्दिष्ट साध्य करणे:-**

अशा दहशतवादी संघटनांचा लोकशाही मार्गावर विश्वास नसतो. प्रश्न सोडविण्यासाठी दिर्घकालीन प्रक्रिया नको असते. त्यांना त्वरीत व क्रांतीकारी बदल हवे असतात. पॅलेस्टाईनचा मुक्तीचा प्रश्न लोकशाही मार्गाने सोडविण्यासाठी इस्त्राइल नेते व यासर अराफत यांचे प्रयत्न चालू होते. पण हा संथपणा नको असल्याने हमास संघटनेला हिंसाचाराच्या माध्यमातून त्वरीत समाधान अपेक्षित होते. पण त्यामुळे मुळ प्रश्नात गुंता वाढला.

**दहशतवाद निर्मितीची कारणे:-**

१. **ऐतिहासिक घटक –** काश्मिर, पॅलेस्टाईन सारख्या भागात इतिहासातून निर्माण झालेले प्रश्न दहशतवाद निर्माण करतात.

२. **आर्थिक घटक –** ब्रिटीशांच्या राजवटीपासून जमिनदारी हा प्रकार अधिक विकसित झाला. त्यातून स्थानिक जनतेच्या जमिनी बळकाविण्याचे प्रमाण वाढले. त्यातून नक्षलवाद व पुढे दहशतवाद वाढीस लागले.

३. **सामाजिक घटक –** बिहार, उत्तर प्रदेश सारख्या राज्यांत सामाजिक स्थितीमुळे सवर्ण विरुध्द दलीत अशी परिस्थीती दहशतवादास पाठबळ मिळण्यास मदत झाली.

४. **धार्मिक –**

जगात विविध धर्म अस्तित्वात असले तरी त्यातील एखादा धर्म स्वत:ला उच्च समजतो किंवा सिध्द करण्याचा प्रयत्न करतो. या प्रचारासाठी हिंसेचा वापर केला जातो किंवा एखादया धर्मावर अन्याय झाल्यास त्यातून दहशतवाद उदयास येतो.

५. **जनतेची वृत्ती –** दिवसेंदिवस लोक स्वयंकेंद्रीत बनत आहेत. इतरांचा ते विचार करीत नाहीत.

**दहशतवादाचे स्वरुप, तंत्रे –**

१. **अपहरण**

एखादया महत्वाच्या व्यक्तीचे किंवा व्यक्ती समुहाचे अपहरण करुन त्यांना ओलीस ठेवले जाते. शासन किंवा विरोधी गटाकडुन मागण्या मान्य करण्यासाठी सतत दबाव, धमक्या दिल्या जातात. केंद्रीय गृहमंत्री, मुक्ती मंहमद सईद यांची कन्या मेहबुब मुक्ती सध्या त्या जम्मू काश्मिरच्या मुख्यमंत्री आहेत. यांना दहशतवादांनी ओलीस ठेवून पाच दहशवादयांची सुटका करुन घेतली होती.

२. **स्वैर गोळीबार**

रेल्वे स्थानके, बाजार, धार्मिक स्थाने किंवा अन्य गर्दींच्या ठिकाणी अतिरेकी पाठवून मुक्त, स्वैर गोळीबार केला जाते की, ज्यामध्ये सामान्य, निरापराध लोक शेकडोने मारले जातात. भारतात मुंबई, पुणे, बेंगलोर, गुजरात वगैरे ठिकाणी विविध अतिरेकी संघटना या तंत्राचा अधुन मधुन वापर करतात.

३. **बॉम्बस्फोट**

एखादया महत्वाच्या ठिकाणी बॉम्ब ठेवून दुरवर नियंत्रणाद्वारे वेळ निश्चित करुन बॉम्बस्फोट घडविले जातात. १९९३ मधील बॉम्बस्फोट मालिका ही जगप्रसिध्द आहे.

४. **आत्मघातकी हल्ले (मानवी बॉम्बस्फोट)**

धर्माची गोळी तरुणांना देवून त्याच्या गुंगीमध्येच त्यांच्याकडून अश्याप्रकारे आत्मघातकी हल्ले अतिरेकी संघटना करुन घेतात. किंवा काही आक्रमक सघटना सुशिक्षित तरुणांचाही याकामी वापर करु लागल्या आहेत. ईस्त्राईल, श्रीलंका, भारतात असे अनेक प्रयोग झाले आहेत. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या मानवी बॉम्बच्या साहयानेच केली गेली. श्रीलंकेचे अध्यक्ष प्रेमदासा यांचाही अंत असाच झाला. या दोन्ही आत्मघातकी हल्ल्याची जबाबदारी एल.टी.टी.ई. ने स्विकारल्याचे समजते.

munotes.in

### ५. जैविक हल्ले

या नविन विकसीत केलेल्या दहशवादी हल्यामध्ये अतिसुक्ष्म जिवाणूंचा वापर करुन शत्रू गटात सोडले जातात. त्याच्या प्रादुर्भावाने हजारो लोक मृत्युमुखी किंवा अपंग होवू शकतात. सध्या हया प्रकारची भिती आंतरराष्ट्रीय समुदायाला ग्रासली आहे.

### ६. सायबर हल्ला

सायगर गुन्हेगारी ही अलीकडच्या काळात मोठया प्रमाणात वाढली आहे. छोटया प्रकारातून आता मोठया प्रमाणात उग्र स्वरुप धारण केले आहे. विरोधी गटातील, दोघांतील, संगणक, इंटरनेट यंत्रणाामध्ये व्हायरस घुसविणे, त्यातील माहिती इप्सित करणे किंवा त्याचे अपहरण करणे वगैरे या प्रकारच्या हल्ल्यातून करण्याचा अतिरेकी संघटनांचा प्रयत्न असतो.

### जागतिक दहशतवादी कारवायांची उदाहरणे.

दहशतवादाचे स्वरुप दिवसेंदिवस उग्र बनत चालले आहे. तसेच दहशतवादाला कोणतीही सिमा राहिली नाही. दहशतवादी संघटनांची संख्याही व त्याची यादीही मोठी झाली आहे. विशिष्ट अश्या धर्माद्वारेच तो निपजला जातो असेही नाही.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आतापर्यंत घडलेल्या ठळक दहशतवादी घटना.

| | | |
|---|---|---|
| १. | १२ मार्च, १९९३ | मुंबई साखळी बॉम्बहल्ले |
| २. | ०८ जून, १९८० | त्रिपूरा मार्केट |
| ३. | २१ मे, १९८७ | तामिळनाडू राजीव गांधी हत्या. |
| ४. | ०८ ऑगस्ट, १९९३ | आर.एस.एस. च्या तामिळनाडूच्या कार्यालयावर हल्ला. |
| ५. | १ ऑक्टोबर, २००१ | जम्मू काश्मिर च्या विधिमंडळावर हल्ला. |
| ६. | १३ डिसेंबर, २००१ | दिल्लीच्या पार्लमेंट हाउसवरील हल्ला |
| ७. | २४/०९/२००२ | गुजरातच्या अक्षरधाम मंदीरावरील हल्ला. |
| ८. | २६/११/२००८ | मुंबई मधील महत्वाच्या ठिकाणावर आतंकवादी हल्ले. |
| ९. | ७ मार्च, २०१७ | उज्जैनच्या पॅसेंजर ट्रेनवरील हल्ला. |
| १०. | ११ मार्च, २००४ | ................ ट्रेनवरील हल्ला |
| ११. | २ नोव्हेंबर, २००४ | नेदरलॅन्डमधील व्हॅनवरील हल्ला |
| १२. | ५ जुलै, २००५ | इंग्लंडच्या ट्रेन व बसवरील हल्ले |
| १३. | ३० जून, २००७ | इंग्लंडच्या विमानतळावरील हल्ला. |
| १४. | ११ डिसेंबर, २०१० | स्विडन स्टॉकहोम मार्केट. |
| १५. | २ मार्च, २०११ | जर्मनी विमानतळावरील बेझूट हल्ले |
| १६. | ११ डिसेंबर, २०१४ | फ्रान्सच्या पोलीस स्टेशनवरील हल्ला |
| १७. | १६ जुलै, २००५ | बगदाद येथे अतिरेक्यांचा बॉम्बस्फोट. |

munotes.in

याशिवाय भारतात, शेजारील देशांत व जगातील विविध खंडांच्या प्रमुख देशांत अतिरेक्यांच्या कारवायांमध्ये खूप वाढ झाली आहे. आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रमुख देशांच्या प्रशासन, सुरक्षा व्यवस्था कोलमडून टाकुन दहशत पसरविण्याचाच काही दहशतवादी संघटना कसून प्रयत्न करीत आहेत. २६ नोव्हेंबर, हा भारतात राष्ट्रीय कायदादिन म्हणून साजरा होत असतानाच येथिल आर्थीक राजधानीच/ मुंबई असुरक्षित करण्याचा दहशवादयांनी १० वर्षापूर्वी घातक प्रयत्न केला. त्यातून मुंबई लवकरच सावरली पण या दहशतवादास बळ देणाऱ्या शेजारील देशांतील व्यवस्था याच दहशतवादामुळे त्रस्त आहे.

पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, इराण, इराक, इस्त्राईल, पॅलेस्टाईन, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आखाती देशातही दहशतवादाने आपली पाळेमुळे घट्ट करण्यास सुरुवात केली आहे.

**दहशतवादाचे परिणाम**

दहशतवादाद्वारे समाजात अनेक वाईट परिणम घडत आहेत. मानवी मनांवर, समाज स्वास्थ्यावर, व्यवस्थेच्या सर्वांगीण विकासावर दहशतवादामळे परिणाम होत आहे.

## १. राजकिय परिणाम

दहशतवादाचा उपयोग कधी विशिष्ट प्राप्तीसाठी केला जातो. राजकिय व्यवस्था व तिची कार्यप्रणाली उध्वस्त करण्याचा हेतू दहशतवादयांनी ठेवून त्यांनी तंत्रे वापरण्याने राजकिय व प्रशासन व्यवस्था आपल्या निर्धारित काळात विविध प्रकल्प पूर्ण शकत नाही. नागरी समाजाचे प्रशासन प्रश्न सोडविण्यात मोठा अडथळा निर्माण होतो. शिवाय दहशतवादी कारवायांमुळे पुढे नव्याने प्रश्न तयार होतात. प्रशासन यंत्रणावर, पोलीस लष्करावर अतिरिक्त ताण पडतो. विकासाला खिळ बसते.

## २. सामाजिक परिणाम

दहशतवादी कारवायांमुळे शाळा, महाविदयालये, कार्यालयीन कामकाज पूर्ण बंद पडले. संबंधित नागरी समाजात एक प्रकारची भिती युक्त दहशत निर्माण होते. जनतेतील आपासातील विश्वसार्हता कमी होते. सामान्यता हिंदू - मुस्लीम यांच्यामध्ये कलह, दंगे सूरु होतात. परिस्थिती सामान्य बनविण्यामध्ये प्रशासन, समाजसेवक प्रयत्नशील असतात पण दहशतवादाची तिव्रता आधिक असल्याने स्थिती पूर्ववत होण्यास कालावधी लागतो. मनुष्यहानी न भरुण येणारी आहे.

## ३. आर्थिक परिणाम

आर्थिक परिणाम खूपच गंभिर असतात कारण दहशतवादयांचा मूळ हेतूच असा असतो की, मनुष्य व वित्तहानी भरपूर व्हावी. हॉस्पीटल, स्टेशन, उपहारगृह धार्मिक स्थळे, बाजार या व्यवस्थाना त्यांनी लक्ष केलेले असते. परिणामी मनुष्य व वित्त हानी मुळे अर्थ व्यवस्थेला, नव गुंतवणुक व्यवस्थेवर परिणाम होतो. देशाची, राज्याची अर्थ व्यवस्था कमकुवत बनते.

## ४. सुरक्षा यंत्रणेवरील परिणाम

देशाच्या व राज्याच्या अंतर्गत व बाहय सुरक्षा यंत्रणांवर अशा दहशतवादी हल्ल्यामुळे अधिकचा ताण, काम येते. सुरक्षा व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या पोलिस, लष्करी जवान, मोहिमेवरील कमांडो यांचे मनोबर खच्ची होण्याची शक्यता असते. दुसरीकडे या या सैनिकांचे कौटुंबिक जीवन अधिच स्थिर, संपन्न नसले. अशात या अतिरेकी कारवायांच्या काळात कुटुंबाचे सदस्यही पूर्णपणे दडपणाखाली भितीच्या छायेत असतात. याशिवाय देशाला सुरक्षा या विषयांवर प्रचंड वेळ व पैसा खर्च करावा लागतो. महत्वाचे म्हणने लोकशाही व्यवस्थेवर विपरित परिणाम होतो.

**दहशतवादाविरुध्दचे प्रयत्न (उपाययोजना) –**

शीतयुद्धाच्या राजकारणामुळे दहशतवाही चळवळी वाढत गेल्या. १९८० च्या दशहत धार्मिक मुळ तत्ववादयांनी या दहशतवादामध्ये भर टाकली. शीत युध्दामुळे संयुक्त राष्ट्र संघाला या दहशतवादा विरुध्द उपाययोजना करणे अवघड होते. तरीही युनोचे विभागीय, द्विपक्षपातळीवरील कराराद्वारे प्रयत्न चालू होते. दहशतवाराविरुध्द युनोने एकूण ३५ पेक्षा जास्त ठराव पास केले आहेत.

**१. दहशतवादाविरुध्द सामूहिक प्रयत्नांसाठी आमसभेचा ठराव**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १८ डिसेंबर, १९७२ रोजी दहशवादाविरुध्द बहुमताने एक ठराव मंजूर केला. यामध्ये निष्पाप लोकांची हत्या, मूलभूत मानव आधिकारांच्या उल्लंघनासाठी जबाबदार दहशतवादी कृत्य, संघटना निषेध केला.

**२. संयुक्त राष्ट्र संघटनेची दहशतवाद विरोधी समिती –**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील दहशतवादी कारवायांची नोंद घेवून त्यावर उपाययोजना करण्यासाठी युनोच्या सुरक्षा समितीला सुचविण्यासाठी १९७३ मध्ये एक दहशतवाद विरोधी समिती गठीत करण्यात आली.

**३. ओलीस ठेवण्याविरुध्द ठराव:**

दहशतवादी संघटनांकडून निष्पाप नागरिक, मुले, परराष्ट्र प्रतिनिधी वगैरेंना पळवून नेवून ओलीस ठेवले जाते. या निंदनिय कृत्याचा युनोच्या १९७८ च्या आमसभेने निषेधाचा ठराव मंजूर केला. असे कृत्य आंतरराष्ट्रीय गुन्हा म्हणून नोंद करण्यात येईल.या विरुध्द देशांनी सामुहिक कारवाईसाठी अवाहन करण्यात आले.

**४. दहशतवाद निर्मुलनाच्या उपयांची घोषणा –**

सन १९८९ व १९९० साली युनोच्या आमसभेने दहशतवादी कारवायांमुळे वाढ झाल्याने, निरापराध नागरिक, महिला व लहान लहान मुलांचे अपहरण हे प्रकार वाढल्याने तसेच आम्ली पदार्थांचा व्यापार, बॉम्बस्फोट या घटना वाढल्या कारणाने या भस्मासुराला रोखण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे ९ डिसेंबर, १९९४ च्या आमसभेमध्ये ठरावाद्वारे घोषणा झाली. तसेच याविरुध्द सदस्य देशांनी देशांतर्गत कडक कायदे करुन त्याचीअंमलबजावणी करण्याचे ठरले.

**५. दहशतवादाला मिळणाऱ्या आर्थिक सहकार्याविरुध्द ठराव–**

दहशतवादी संघटनांना काही राष्ट्रांकडून समर्थन तसेच आर्थिक पाठबळ मिळत असल्याचे आंतरराष्ट्रीय समुदायास स्पष्टपणे जाणवू लागल्याने ९ डिसेंबर, १९९९ रोजी युनोने एक ठराव संमत केला. ज्यानूसार दहशतवादी संघटनांना मिळणारे आर्थिक सहकार्य त्वरीत थांबविण्याचे अवाहन करण्यात आले.

**भारताचे दहशतवादाविरुध्दचे प्रयत्न–**

जगात सर्वात अधिक झळ व अनेक वर्षापासून भारत व त्यानंतर इस्त्राईलला दहशतवादी कारवायांची बसत आहे. भारतातील अतंर्गत दहशतवाद, बाहय दहशतवाद यामुळे येथील प्रशासन व्यवस्था कोलमडत असते. जम्मू किश्मिर, पंजाब, मुंबई, दिल्ली, गुजरात, बेंगलोर, पुणे, हैद्राबाद, चेन्नई अशा विविध महानगरांमध्ये हा दहशतवाद पसरत आहे. त्यातील सक्रिय असणाऱ्या दहशतवादी संघटनांना शेजारील देशांचे सहकार्य

लाभले आहे. ते भारताने अनेक वेळा युनोमध्ये, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये मुद्दे मांडले आहेत. हा दहशतवाद भारतातील केवळ जम्मू काश्मिर पुरता आता मर्यादित राहिला नाही तसो तो जगात भारतापूरताही मर्यादित राहीला नाही. त्याने वैश्विक स्वरुप धारण केले आहे. म्हणून भारताने दहशतवादविरुध्द जागतिक समुदायाने आघाडी उघडावी अस प्रयत्न केले आहेत. भारतात सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी त्या शासनाने राज्य, देश व जागतिक पातळीवर या दहशतवादाविरुध कडक उपाय योजना केल्याने व त्याच बरोबर संबंधित संघटना, समुदाय यांच्या बरोबर चर्चा, विचार विनिमय करुन सुरु ठेवल्याने महत्वाचे म्हणजे शांतता वादावर विश्वास ठेवून काम केल्याने कांही प्रमाणात तरी हा दहशतवाद कमी झाल्याचे जाणवत आहे. यामध्ये पोलिस, जवान, नेते, प्रशासन व नागरी समुदाय यांचाही सहभाग महत्वाचा आहे. तसेच सहिष्णूता व परस्पर आदरभाव आवश्यक आहे.

## सारांश

दहशतवादाला कोणताही रंग नाही, धर्म नाही, त्याच्या कोणत्याही विचाराचे, कृत्याचे कधीच कोणीही समर्थन करु शकत नाही. दहशतवादी विचार व संघटन आणि त्यातून अमानूष हल्ले होवू नयेत यासाठी वैश्विक सामुदायिक प्रयत्नांची गरज आहे. याविषयी भारतीय पंतप्रधान राजीव गांधी, अटलबिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग, नरेंद्र मोदी व परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी विविध स्थरावर यथार्थ प्रयत्न केले. पण त्यास युनो व युनोच्या सुरक्षा समितीने निपक्षपाती साथ देणे गरजेचे आहे. अमेरिकेच्या इराकवरील आक्रमणानंतर दहशतवाद हा जागतिक स्तरावर पसरला. छोटया मोठया देशप्रमुखांनी स्वत:च्या स्वार्थासाठी, गटाच्या हितासाठी कोणत्याच मुळ तत्ववादी, दहशतवादी विचार - कृतीस पाठींबा न दिल्यास दहशवादाचा बिमोड होणे अशक्य आहे. जगातील शांततावादी चळवळींना जागतिक समुदायाने प्रतिसाद देणे गरजेचे आहे. अमेरिकेतील फ्रेंडस सर्विस कमिटी, कॅनडातील कॅनडियन्स पीस अलायन्स, इंग्लंडस्मित नॅशलन पीन कौन्सील, जर्मनीतील ग्रीन पार्टी, इस्त्राईल मधील पीस नाउ वगैरे शांततवादी संघटना दहशतवादांच्या विरुध्द तसेच पर्यावरण रक्षण, पाणी वाचवा, जंगल बचाव, नि:शस्त्रीकरण, निरंतर शेती व विषारी रसायनावर निबंध अशा उपक्रमाद्वारे वश्विक विचार मंथन घडवित आहेत. अश्याप्रकारे भारतातही चळवळी विकसित होवू शकतात कि ज्या जागतिक आतंकवादी वृत्तींवर दबावतंत्र म्हणून परिणामकारक ठरु शकतील.

## सरावासाठी प्रश्न

१. राजकारणाचे गुन्हेगारीकरण याचा अर्थ सकल्पना लिहा.

२. राजकारणाचे गुन्हेगारीकरण कश्या स्वरुपात आढळते?

३. राजकारणाचे गुन्हेगारीकरण होण्याची विविध कारणे सांगा.

४. राजकारणाचे गुन्हेगारीकरणाचे विविध परिणाम स्पष्ट करा.

५. राजकारणाच्या गुन्हेगारीकरण रोखण्यासाठीच्या विविध संघटनांची चर्चा करा.

६. राजकारणातील गुन्हेगारीकरणाला अटकाव घालण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या उपाययोजना सूचवाल?

७. नक्षलवाद म्हणजे काय? नक्षलवादाच्या विचारसरणींची चर्चा करा.

८. भारतातील नक्षलवादाचा उदय व विकास याची महिती दया.

९. नक्षलवादाच्या निर्मितीची विविध कारणमिमांसा करा.

१०. नक्षलवादी संघटना व त्यांच्या कारवायाबाबत माहिती दया.

११. नक्षलवाद कारवायांचे विविध परिणाम स्पष्ट करा.

१२. नक्षलवाद रोखण्यासाठीच्या विविध उपाययोजना स्पष्ट करा.

१३. दहशतवाद म्हणजे काय? संघटना व उद्दिष्टे लिहा.

१४. दहशतवाद निर्मितीची कारामिमांसा करा.

१५. दहशतवादाचे स्वरुप व तंत्रे याबाबत महिती लिहा.

१६. जागतिक दहशवादी कारवायांची उदाहरणे लिहा.

१७. दहशतवादी कारवायांचे परिणाम लिहा.

१८. दहशतवाद रोखण्यासाठीच्या विविध उपाययोजना स्पष्ट करा.

## ४.५ सदर्भसूची

**पेपर I, Sem-I च्या प्रकरण क्रमांक ३ व**
**पेपर I, च्या Sem-II प्रकरण क्रमांक ४ साठी संदर्भ**


१. भारतीय राजकीय व्यवस्था — डॉ. अशोक जैन

२. भारतीय राजकीय व्यवस्था — डॉ. छाया बकाणे

३. भारतीय राजकीय व्यवस्था — डॉ. महश भागवत

४. साधना साप्ताहिक — फेब्रुवारी, २०१३

५. स्पर्धा परिक्षा, स्टडी सर्कल — ऑगस्ट, २००५

६. स्वयंम चिंतनातून संदर्भ — लेखक: डॉ. संदीप घोडके


❖❖❖

munotes.in